# विभागीय अहवाल

# राष्ट्रीय सेवा योजना

## वार्षिक अहवाल : २०१७-१८

राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने योग दिन कार्यक्रम, वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. रक्षाबंधन निमित्ताने मोर्शी येथील खुल्या कारागृहामध्ये बंदीजनांना रा.से.यो. स्वयंसेविकांनी राख्या बांधून समाजहिताची जोपासना केली. याशिवाय महापुरुषांच्या जयंती व पुण्यतिथींच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी डॉ.संदीप राऊत यांनी अहमदनगर येथे संपन्न झालेल्या 'रिफ्रेशर कोर्स' करिता उपस्थित राहिले. तसेच उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव येथे संपन्न झालेली 'राज्यस्तरीय प्रेरणा युवा नेतृत्व शिबीर' या ८ दिवसीय शिबीरामध्ये डॉ. संदीप राऊत यांना विद्यापीठीय चमूचे 'चमू व्यवस्थापक' म्हणून सहभागी झाले होते. तसेच त्याच शिबीरामध्ये महाविद्यालयातील कु. दिव्या खरबडे (बी.ए.भाग-१) ही विद्यार्थिनी देखील सहभागी झाली होती.

रा.से.यो. विभागाच्या वतीने स्वयंसेवकांमध्ये सामाजिक दायित्वाची जाणीव व्हावी म्हणून 'प्रश्नचिन्ह? आदिवासी आश्रमशाळे'स स्वयंसेवकांनी व महाविद्यालयातील प्राध्यापक व कर्मचाऱ्यांनी १० क्विंटल धान्य व ५००० रुपये रोख श्री. मतीन भोसले यांना देण्यात आले. त्याच बरोबर 'राज्यस्तरीय अंध शिबीरास' स्वयंसेवकांनी ३००० रुपये जमा करून त्यांना मदत करून सामाजिक दायित्वाचा परिचय करून दिला.

रा.से.यो. स्वयंसेवकांनी रविवार, दि.१३ ऑगस्ट २०१७ रोजी महाविद्यालय, बसस्थानक, उपजिल्हा रुग्णालय येथे 'स्वच्छता मोहिम' राबविण्यात आली. दि.२ ऑक्टोबर रोजी 'गाधी जयंती' निमित्ताने 'स्वच्छता शपथीचे फलक' महाविद्यालय, बसस्थानक, तहसील कार्यालय, उपजिल्हा रुग्णालय व गांधी स्मारक येथे फलकाचे अनावरण व स्वच्छता मोहिमेचे आयोजन करण्यात आले होते.

दि.१७-१-२०१८ ते २३-१-२०१८ दरम्यान दत्तक ग्राम लाडकी येथे 'विशेष श्रम संस्कार शिबीरा'चे आयोजन करण्यात आले होते. शिबीराचे उद्घाटक मा.डॉ. रमेश बिजवे (अध्यक्ष, भारतीय विद्यामंदिर, अमरावती) यांनी केले. या शिबीरामध्ये ११५ स्वयंसेवक सहभागी झाले होते. या शिबीराअंतर्गत भूमिगत बंधारा, ग्रामसफाई, बौद्धिक व्याख्याने व मनोरंजनातून समाजप्रबोधन कार्यक्रमायाचे आयोजन करण्यात आले होते. शिबीराच्या समारोपीय कार्यक्रमास मा.अनंतराव सोमवंशी (उपाध्यक्ष, भारतीय विद्यामंदिर, अमरावती) व सुखदेवराव राऊत (सदस्य, व्यवस्थापन समिती), प्राचार्य जी.एस.मेश्राम आदी मान्यवर उपस्थित होते.

विद्यापीठस्तरीय रा.से.यो. शिबीर शेडगाव येथे संपन्न झालेल्या ७ दिवसीय शिबीरात महाविद्यालयाचे २ स्वयंसेवक व २ स्वयंसेविका सहभागी झाले होते. रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी म्हणून प्रा.डॉ.संदीप राऊत, सहा. कार्यक्रम अधिकारी म्हणून प्रा.डॉ. सावन देशमुख तर महिला कार्यक्रम अधिकारी म्हणून प्रा.डॉ.जे.एल.रामटेके कार्य करीत आहे.

**प्रा.डॉ.संदीप राऊत**

रा.से.यो. कार्यक्रम अधिका

भारतीय महाविद्यालय, मो

# सहकारी विद्यार्थी ग्राहक भांडार

महाविद्यालयात गेल्या पंधरा वर्षांपासून विद्यार्थी सहकारी ग्राहक भांडाराची सुरुवात झाली आहे. या ग्राहक भांडाराचे पदसिद्ध अध्यक्ष, प्राचार्य जी.एस.मेश्राम असून एकुण नऊ पदाधिकारी ग्राहक भांडाराच्या कामकाजावर नियंत्रण ठेवतात. ग्राहक भांडाराचे महाविद्यालयातील सर्वच प्रवेशित विद्यार्थी सदस्य असून महाविद्यालयात प्रथमच प्रवेश घेणाऱ्या बी.ए. व बी.कॉम. प्रथम वर्ष आणि वर्ग ११ च्या विद्यार्थ्यांकडून ग्राहक भांडाराचे सदस्यत्व शुल्क आकारल्या जाते. त्यात प्रवेश शुल्क एक रुपया आणि सभासद शुल्क दहा रुपये असे एकूण ११ रुपये एकदाच घेण्यात येतात. प्रत्येक वर्षी साधारणतः सहा हजार रुपयाचे भांडवल जमा होते. प्रवेश शुल्क आणि भाग भांडवलातून हे ग्राहक भांडार चालविल्या जात आहे.

विद्यार्थ्यांच्या सहकार्याने सदरचे ग्राहक भांडार चालविल्या जात असून महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसोबतच महाविद्यालयास लागणारी पेन, पेन्सील, प्रॅक्टीकल्स बुक्स व नोटबुक्स इत्यादी स्टेशनरी ग्राहक भांडारातून ना नफा ना तोटा या तत्त्वावर उपलब्ध करून दिल्या जात असल्यामुळे बाजार भावापेक्षा वस्तुंचे भाव कमी असतात. विद्यार्थ्यांच्या हिताच्या या योजनेला दरवर्षी विद्यार्थ्यांकडून मोठा प्रतिसाद मिळत आहे. ग्राहक भांडाराचे सचिव एस.एस.पाटणकर व व्यवस्थापन श्री.आर.एस.बागवतकर सांभाळतात.

अध्यक्ष – **प्राचार्य जी.एस.मेश्राम**
सरचिटणीस – **एस.एस.पाटणकर**
व्यवस्थापक – **आर.एस. भागवतकर**

# सांस्कृतिक विभाग

## वार्षिक अहवाल : २०१७-१८

महाविद्यालयातील सांस्कृतिक विभागाअंतर्गत थोर महापुरुषांची जयंती व पुण्यतिथी साजरी करण्यात आली. याशिवाय विद्यार्थ्यांच्या सुप्तगुणांना वाव मिळावा या हेतूने विविध उपक्रमांचे आयोजनही करण्यात आले होते.

बुधवार, दि.२१ जून २०१७ रोजी 'आंतरराष्ट्रीय योग दिना'चे औचित्य साधून योगाभ्यासाचे आयोजन करण्यात आले होते. प्राचार्य जी.एस.मेश्राम व महाविद्यालयातील प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी वृंद सहभागी झाले होते. तर शुक्रवार, दि.२१-७-२०१७ रोजी मोर्शी विधानसभा मतदार संघ तथा उपविभागीय अधिकारी, मोर्शी आयोजित 'मतदार जनजागृती प्रचार अभियान' हा विशेष उपक्रम राबविण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य जी.एस.मेश्राम तर मार्गदर्शक म्हणून श्री. मनोहरजी कडू (एस.डी.ओ.), तहसीलदार बक्षी साहेब, डॉ.एस.बी.बिजवे व महाविद्यालयातील प्राध्यापक, कर्मचारी वृंद व विद्यार्थी उपस्थित होते. मंगळवार, दि.१-८-२०१७ रोजी 'स्पर्धा परीक्षा : तंत्र आणि मंत्र' या विषयावर श्री. अक्षय वानखडे, भूमिपुत्र स्पर्धा परीक्षा ॲकेडमी, मोर्शी यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. हिन्दुस्थानी प्रचार सभा, मुंबई अंतर्गत ''राष्ट्रीय एकता की ऐतिहासिक एवं वर्तमान स्थिति और उसको मजबूत करने का उपाय'' या विषयावरील राष्ट्रीय निबंध स्पर्धेमध्ये महाविद्यालयातील एकूण ११ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवित निबंध सादर केले. तर मराठी विभागातर्फे संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती येथे कवी केशवसुत स्मृती दिनानिमित्य आयोजित काव्यस्पर्धेमध्ये कु. श्रृती महल्ले (बी.ए.भाग-२) व कु. तृप्ती चौधरी (बी.ए.भाग-२) या विद्यार्थिनींनी सहभाग नोंदविला.

महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना अध्यापनासोबतच आर्थिक बचतीचे धडे मिळावेत या हेतूने दि.२९-९-२०१७ रोजी ''आर्थिक शिक्षण व जागृती'' या विषयावर डॉ. प्रशांत पिसोळकर, कॉमर्स विभाग प्रमुख, शंकरलाल खंडेलवाल महाविद्यालय, अकोला यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. तर दि.६ ते १२ ऑक्टोबर २०१७ ला 'माहिती अधिकार सप्ताह' निमित्ताने दि.७-१०-२०१७ रोजी 'माहिती अधिकाराची उपयुक्तता' या विषयावर निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. मंगळवार, दि.२८ नोव्हेंबर २०१७ रोजी 'भारतीय संविधान दिना'निमित्त डॉ. वामन गवई यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य जी.एस.मेश्राम हे उपस्थित होते. सोमवार, दि.४-१२-२०१७ रोजी नेहरू युवा केंद्र, अमरावती अंतर्गत 'राष्ट्रभक्ती एवं राष्ट्र निर्माण' या विषयावर तालुकास्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य जी.एस.मेश्राम तर प्रमुख अतिथी म्हणून श्री.अशोक महल्ले, समन्वयक नेहरू युवा केंद्र, अमरावती हे उपस्थित होते. मंगळवार, दि.६-१२-२०१७ रोजी भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या 'महापरिनिर्वाण दिना'निमित्त डॉ.आशीष लोहे, रेडिओलॉजिस्ट, वरूड यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य जी.एस.मेश्राम उपस्थित होते. दि.७-१२-२०१७ रोजी 'एडस् जनजागृती सप्ताह' निमित्ताने श्री.श्रीकांत गोहाड यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.

स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) पंचायत समिती, मोर्शी आयोजित तालुकास्तरीय 'स्वच्छता मित्र वक्तृत्व करंडक स्पर्धा २०१७' चे आयोजन शनिवार, दि.९-१२-२०१७ रोजी करण्यात आले होते. अध्यक्षस्थानी डॉ.एस.बी.बिजवे तर प्रमुख अतिथी म्हणून श्री.शंकरजी उईके (सभापती, पं.स.मोर्शी) व श्री.एन.एम.सुपते (विस्तार अधिकारी, पं.स.मोर्शी) आदि मान्यवर उपस्थित होते. सदर स्पर्धेमध्ये महाविद्यालयातील कु.शुभांगी खुजे (बी.ए.भाग-१) हिने द्वितीय तर कु. निलीमा मगर्दे (बी.कॉम.भाग-३) हिने तृतीय पारितोषिक प्राप्त करून जिल्हास्तरीय स्वच्छता मित्र वक्तृत्व करंडक स्पर्धेसाठी निवड झाली. दि.२० डिसेंबर २०१७ रोजी कर्मयोगी गाडगे महाराज स्मृती दिन तर दि.२७ डिसेंबर २०१७ रोजी डॉ.भाऊसाहेब पंजाबराव देशमुख जयंती निमित्ताने व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. दि.३ जानेवारी २०१८ रोजी सावित्रीबाई फुले जयंती तर दि.१२ जानेवारी २०१८ रोजी स्वामी विवेकानंद यांच्या जन्मदिन 'युवा दिन' म्हणून व राजमाता जिजाऊ यांच्या जन्मदिनाच्या औचित्याने व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.

महाविद्यालयात दि.२ ते ४ फेब्रुवारी २०१८ दरम्यान वार्षिक स्नेहसंमेलन 'मृदगंध-२०१८' चे आयोजन करण्यात आले होते. शनिवार, दि.३ फेब्रुवारी २०१८ रोजी स्नेहसंमेलन उद्घाटन समारंभाच्या अध्यक्षस्थानी मा.प्रा.डॉ.आर.बी. बिजवे (अध्यक्ष, भारतीय विद्यामंदिर, अमरावती) तर उद्घाटक म्हणून मा.सौ.शिलाताई रोडे (अध्यक्षा, नगरपरिषद, मोर्शी) व विशेष अतिथी व मार्गदर्शक म्हणून मा.श्री.चंद्रकांत वानखडे (सुप्रसिद्ध विचारवंत व शेतकरी आंदोलक, नागपूर) उपस्थित होते. तसेच प्रमुख अतिथी म्हणून मा.डॉ.सतीश कुळकर्णी (सरचिटणीस, भारतीय विद्यामंदिर, अमरावती), मा.श्री. सुखदेवराव राऊत (सदस्य महाविद्यालयीन विकास समिती, भा.म.वि., मोर्शी), स्नेहसंमेलनाचे आयोजक प्राचार्य जी.एस.मेश्राम व डॉ.एस.बी. बिजवे उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य जी.एस.मेश्राम यांनी केले. सूत्रसंचालन प्रा.डॉ.भगवान साबळे यांनी तर आभार प्रदर्शन प्रा.व्ही.व्ही. खांडेकर यांनी मानले. कु.पूजा राऊत (छात्रसंघ सचिव) हिने महाविद्यालयाच्या 'वार्षिक अहवाला'चे वाचन केले. याप्रसंगी गुणवंत विद्यार्थ्यांचा अतिथी मान्यवरांच्या हस्ते रोख बक्षिस व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आला हे विशेष.

तीन दिवसीय स्नेहसंमेलन प्रसंगी क्रीडा स्पर्धा, रांगोळी व पुष्परचना स्पर्धा तसेच आनंद बाजार, काव्य संमेलन, वन मिनीट शो, एकांकिका, नृत्य स्पर्धा व सुरसंगम आदी सांस्कृतिक कार्यक्रमामध्ये महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. कु.पूजा राऊत (छात्रसंघ सचिव), गणेश राऊत (सांस्कृतिक प्रतिनिधी), कु. नेहा पवार (रासेयो प्रतिनिधी), पियुष खोडे (क्रीडा प्रतिनिधी), कु. शिवानी शिरभाते व कु. श्वेता पुंडकर (महिला प्रतिनिधी) तसेच सर्व वर्गप्रतिनिधींनी स्नेहसंमेलन यशस्वितेसाठी परिश्रम घेतले.

सांस्कृतिक विभाग प्रमुख म्हणून प्रा.डॉ. भगवान साबळे, प्रा.स्नेहा जोशी, डॉ. एल.आर.टेंभुर्णे व प्रा.व्हि.व्हि. खांडेकर आदी प्राध्यापक कार्य करीत आहे.

**प्रा.डॉ.भगवान जा. साबळे**

**सांस्कृतिक विभाग प्रमुख**

**भारतीय महाविद्यालय, मोर्शी**

# इंग्रजी विभाग

## वार्षिक अहवाल : २०१७-१८

महाविद्यालयातील इंग्रजी विभागाच्या वतीने 'इंग्रजी अभ्यास मंडळा'चे गठन करण्यात आले. त्या अंतर्गत विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. याशिवाय बी.ए. व बी.कॉम. च्या वर्गात चर्चासत्राचे व गटचर्चाचे आयोजन करण्यात आले होते.

इंग्रजी विभाग आयोजित "Humanism in Indian English Literature" या विषयावरील 'एक दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्र' शनिवार, दि.२४ फेब्रुवारी २०१८ रोजी संपन्न झाले. सदर चर्चासात्राच्या उद्‌घाटकीय समारंभाच्या अध्यक्षस्थानी मा.प्रा.रामरावजी बिजवे (माजी सरचिटणीस तथा सदस्य, भारतीय विद्यामंदिर, अमरावती) तर उद्‌घाटक म्हणून मा.प्रा.डॉ.सतीश कुळकर्णी (सरचिटणीस, भारतीय विद्यामंदिर, अमरावती) व प्रमुख अतिथी म्हणून मा.डॉ.ए.जी.वैद्य (कोषाध्यक्ष, भारतीय विद्यामंदिर, अमरावती), मा.प्रा. मोहम्मद फारुक उल्लाह, अमरावती तसेच चर्चासत्राचे आयोजक प्राचार्य जी.एस.मेश्राम व समन्वयक डॉ.एस.बी. बिजवे, महाविद्यालयातील प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी आदी मान्यवर उपस्थित होते.

सदर चर्चासत्राचे बीजभाषक मा.डॉ.प्रांतिक बॅनर्जी (उपप्राचार्य, हिसलॉप कॉलेज, नागपूर) तर दुसऱ्या सत्रामध्ये अध्यक्ष म्हणून डॉ.आर.ए.उमेकर (प्राचार्य, बी.एस.पाटील महाविद्यालय, परतवाडा) व तज्ज्ञ मार्गदर्शक म्हणून मा.डॉ. अर्चना बोबडे (श्री.शिवाजी कॉलेज, अमरावती) आदी मान्यवरांनी मार्गदर्शन केले. सदर सत्रामध्ये विविध विद्यापीठातील व महाविद्यालयातील संशोधक प्राध्यापकांनी शोधनिबंध सादर केले. सदर शोधनिबंध ''विद्यावार्ता'' या आंतरराष्ट्रीय बहुभाषिक शोधपत्रिकेमध्ये प्रकाशित झाले.

इंग्रजी विभाग प्रमुख डॉ. एस.बी. बिजवे व प्रा.स्नेहा जोशी यांचे आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय चर्चासत्राच्या स्मरणिकेत शोधनिबंध प्रकाशित झाले असून सदर चर्चासत्रांमध्ये सहभागी झाली होते.

**प्रा.डॉ. एस.बी. बिजवे**
इंग्रजी विभाग प्रमुख
भारतीय महाविद्यालय, मोर्शी

# भूगोल विभाग

## वार्षिक अहवाल : २०१७–१८

(१) भूगोल विभागातील ७ विद्यार्थ्यांची मेळघाट व्याघ्र प्रकल्पाने घेतलेल्या स्पर्धेत व्याघ्रदूत म्हणून निवड झाली. त्यांनी भारतीय महाविद्यालय, मोर्शीचे प्रतिनिधीत्व केले. सदर विद्यार्थ्यांचा दि.२९ जुलै २०१७ रोजी 'जागतिक व्याघ्रदिन' या दिवशी अभियंता भवन येथे प्रशस्ती पत्र देवून सत्कार करण्यात आला.

(२) कार्स,अमरावती आणि लाईफ ट्रेड, नागपूर या संस्थांनी भूगोल विभागाचे पर्यावरण रक्षणाचे कार्य बघून त्यांना एक शिलाई मशीन भेट दिली. कापडी पिशव्या बनविण्याच्या उद्देशाने दिलेल्या या शिलाई मशीन मार्फत भूगोल विभागातील २२ विद्यार्थ्यांनी मिळून १२०० कापडी पिशव्या तयार केल्या आणि मोफत वाटल्या.

(३) भूगोल विभाग, कार्स अमरावती आणि वाइल्ड कॅट तसेच भूगोल विभाग निसर्ग मित्र मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने 'एक दिवसीय निसर्ग भ्रमंती'चे आयोजन मेळघाट व्याघ्र प्रकल्पातील कलालकुंड आणि बकादरी येथे करण्यात आले होते. या सहलीत महाविद्यालयातील ६७ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.

(४) भूगोल विभागाचे ९ विद्यार्थ्यांनी मेळघाट व्याघ्र प्रकल्प येथे आयोजित आंतरराष्ट्रीय चर्चासत्रात सहभागी होवून भारतीय महाविद्यालयाचे प्रतिनिधित्व केले आणि आपले संशोधन कार्य प्रदर्शित केले.

(५) प्रा.डॉ.सावन देशमुख यांना मेळघाट व्याघ्र प्रकल्प येथे झालेल्या प्राणीशास्त्र विभाग, जे.डी.पाटील सांगळुदकर महाविद्यालय, दर्यापूर द्वारे आयोजित आंतरराष्ट्रीय चर्चासत्रात विषय तज्ज्ञ व बीजभाषक म्हणून आमंत्रित करण्यात आले होते.

(६) प्रा.डॉ.सावन देशमुख यांना महाराष्ट्र भूगोलशास्त्र परिषद धनवटे कॉलेज नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित आंतरराष्ट्रीय चर्चासत्रात विषय तज्ज्ञ व बीजभाषक म्हणून आमंत्रित करण्यात आले होते.

(७) प्रा.डॉ.सावन देशमुख यांची महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक मंडळाद्वारे इयत्ता ७ वी, ९ वी च्या 'भूगोल विषया'च्या नवीन पाठ्यक्रमाकरिता विषय तज्ज्ञ म्हणून निवड झाली.

(८) प्रा.डॉ. सावन देशमुख यांनी जिल्हा परिषद, नागपूर विभाग, नागपूर येथे इयत्ता ७ आणि ९ वी च्या नवीन पाठ्यक्रमाकरिता विषय तज्ज्ञ आणि मार्गदर्शक म्हणून कार्य केले.

(९) प्रा.डॉ.सावन देशमुख यांनी जिल्हा परिषद, अमरावती विभाग, अमरावती येथे इयत्ता १० वी च्या नवीन पाठ्यक्रमाकरिता विषय तज्ज्ञ आणि मार्गदर्शक म्हणून कार्य केले.

(१०) भूगोल विभाग, भापवि, मोर्शी व कार्स, अमरावती आणि 'विद्यावार्ता' प्रकाशन यांच्या संयुक्त विद्यमाने एक दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राचे यशस्वी आयोजन "Recent Trends in Geography for Wildlife and Environment Conservation" या विषयावर चर्चासत्रात मान्यवरांनी मौलिक विचार मंथन केले.

(११) प्रा.डॉ. सावन देशमुख यांची संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावतीच्या तलवारबाजी (मुले आणि मुली) चमूच्या चयन समितीच्या अध्यक्षपदी नेमणूक झाली.

(१२) प्रा.डॉ.सावन देशमुख यांची संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावतीच्या उन्हाळी परीक्षा २०१८ करिता सहाय्यक केंद्रधिकारी म्हणून श्री. आर.आर. लाहोटी महाविद्यालय, मोर्शी येथे नियुक्ती करण्यात आली.

(१३) प्रा.डॉ. सावन देशमुख यांनी सत्र २०१७-२०१८ मध्ये २ आंतरराष्ट्रीय, २ राष्ट्रीय चर्चासत्रात आपले शोधनिबंध प्रकाशित केले.

(१४) भूगोल विभागाची शैक्षणिक सहल मेळघाट व्याघ्र प्रकल्पातील 'तरुबंदा' या ठिकाणी आयोजित करण्यात आली होती. सदर ४ दिवसीय शैक्षणिक सहलीमध्ये भूगोल विभागाचे एकूण ६४ विद्यार्थी सहभागी झाले होते.

(१५) प्रा.डॉ. सावन देशमुख यांची महाराष्ट्र राज्य वन विभागाने अमरावती जिल्ह्याच्या 'मानद वन्यजीव रक्षक' पदी पुढील ३ वर्षासाठी नेमणूक करण्यात आली.

**प्रा.डॉ. सावन एम. देशमुख**
भूगोल विभाग प्रमुख
भारतीय महाविद्यालय, मोर्शी

# राज्यशास्त्र विभाग

## वार्षिक अहवाल : २०१७-१८

राज्यशास्त्र विभागाच्या वतीने दि. १९-९-२०१७ रोजी 'राज्यशास्त्र अभ्यास मंडळा'चे उद्घाटन व त्या अंतर्गत विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. त्यात प्रामुख्याने दि.२६ नोव्हेंबर २०१७ रोजी 'संविधान दिना'निमित्त 'भारतीय संविधान' या विषयावर डॉ. वामन गवई यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. तसेच दि.२५ जानेवारी २०१८ रोजी 'राष्ट्रीय मतदार दिवस' साजरा करण्यात आला.

प्रा.डॉ.आर.जी. बांबोळे यांचे आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय चर्चासत्राच्या स्मरणिकेत शोधनिबंध प्रकाशित झाले असून सदर चर्चासत्रांमध्ये त्यांनी सहभाग नोंदविला. विशेष म्हणजे डॉ. रजनिश बांबोळे यांना २०१७-१८ मध्ये संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाने आचार्य पदवी बहाल करण्यात आली. त्यांच्या संशोधनाचा विषय ''गोंदिया जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्थेतील महिलांच्या राजकीय नेतृत्वाचे चिकित्सक अध्ययन'' हा होता.

**प्रा.डॉ.आर.जी.बांबोळे**
राज्यशास्त्र विभाग प्रमुख
भारतीय महाविद्यालय, मोर्शी

# वाणिज्य व अर्थशास्त्र विभाग

## वार्षिक अहवाल : २०१७-१८

वाणिज्य व अर्थशास्त्र विभागाअंतर्गत 'वाणिज्य अभ्यास मंडळा'चे उद्घाटन मा.श्री.शैलेश चोरवट यांच्या हस्ते संपन्न झाले. प्रमुख अतिथी म्हणून मा.श्री. अक्षय वानखडे उपस्थित होते. वाणिज्य व अर्थशास्त्र विभागाअंतर्गत राबविण्यात आलेले कार्यक्रम खालीलप्रमाणे;

(१) अतिथी व्याख्यान - प्रा.डॉ. पिसोळकर सेबी अतंर्गत इन्व्हेसमेंट या विषयावर व्याख्यान.

(२) मा.डॉ. लोहे- व्याक्तिमत्व विकास या विषयावर व्याख्यान.

(३) 'स्पर्धा परीक्षा पूर्व तयारी' या विषयावर मार्गदर्शन मा.अक्षय वानखडे (मोर्शी) तसेच स्पर्धा परीक्षेत विजयी विद्यार्थ्यांना बक्षिस वितरण करण्यात आले.

(४) बालाजी कॉटन मिल, मायवाडी येथे बी.कॉम. भाग-३ व एम.कॉम.भाग-२ च्या विद्यार्थ्यांनी भेट दिली.

(५) सेंट्रल बँक ऑफ इंडिया, मोर्शी येथे बी.कॉम.भाग-३ च्या विद्यार्थ्यांनी भेट दिली.

(६) कुक्कुटपालन उद्योग, येरला तसेच मयुर गृहउद्योग, मोर्शी येथे विद्यार्थ्यांची भेट.

(७) ग्रॅज्युएशन नंतर कॉर्मसच्या विद्यार्थ्यांसाठी असलेले कोर्सेस व सी.ए. तसेच स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन या विषयावर मा.पांडे सर यांच्या व्याख्यानाचे आयोजन केले.

(८) बी.कॉम. भाग-३ व एम.कॉम.भाग-२ च्या विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षा, पूर्वतयारी व मुलाखत या विषयावर मा. जीवन देशमुख, मा. अक्षय वानखडे, मा. पांडे सर आदि मान्यवरांनी मार्गदर्शन केले.

विशेष म्हणजे वाणिज्य विभाग आयोजित "Current Trends in Commerce" या विषयावरील तर अर्थशास्त्र विभाग आयोजित "Impact of Demonetization on Indian Economy" या विषयावरील 'एक दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्र' शनिवार, दि.२४ फेब्रुवारी २०१८ रोजी संपन्न झाले. सदर चर्चासत्राच्या उद्घाटकीय समारंभाच्या अध्यक्षस्थानी मा.प्रा.रामरावजी बिजवे (माजी सरचिटणीस तथा सदस्य, भारतीय विद्यामंदिर, अमरावती) तर उद्घाटक म्हणून मा.डॉ.सतीश कुळकर्णी (सरचिटणीस, भारतीय विद्यामंदिर, अमरावती) व प्रमुख अतिथी म्हणून मा.डॉ.ए.जी.वैद्य (कोषाध्यक्ष, भारतीय विद्यामंदिर,

अमरावती) तसेच वाणिज्य विषयाचे बीजभाषक डॉ.दिनेश निचीत (प्राचार्य, एस.जी.एम. कॉलेज, वलगाव) व अर्थशास्त्र विषयाचे बीजभाषक म्हणून मा.डॉ. श्रीनिवास खांदेवाले (Eminent Economist) याशिवाय चर्चासत्राचे आयोजक प्राचार्य जी.एस.मेश्राम तसेच वाणिज्य विषयाच्या समन्वयक डॉ.जे.एल.रामटेके, अर्थशास्त्र विषयाच्या समन्वयक डॉ. एल.आर.टेंभुर्णे आदी मान्यवर उपस्थित होते.

वाणिज्य विषयाच्या दुसऱ्या सत्राचे सत्राध्यक्ष मा.डॉ.प्रवीण देशमुख तर तज्ज्ञ मार्गदर्शक म्हणून मा.डॉ.मिलिंद गुल्हाणे व मा.डॉ. रामेश्वर पाटेकर उपस्थित होते. तसेच अर्थशास्त्र विषयाच्या दुसऱ्या सत्राचे सत्राध्यक्ष मा.डॉ.एस.एस.नाईक तर तज्ज्ञ मार्गदर्शक मा.डॉ. ज्ञानेश्वर जांभुळे, मा.डॉ. संतोष कुटे, मा.डॉ. आर.बी. भांडवलकर आदी मान्यवर उपस्थित होते. याशिवाय विविध विद्यापीठ अंतर्गत महाविद्यालयातील संशोधक प्राध्यापकांनी शोधनिबंध सादर केलेत. सदरचे शोधनिबंध ''विद्यावार्ता'' या आंतरराष्ट्रीय बहुभाषिक शोधपत्रिकेमध्ये प्रकाशित झाले.

डॉ.जे.एल.रामटेके, प्रा.व्हि.व्हि.खांडेकर, प्रा.डी.एन.काळे, डॉ.एल.आर.टेंभुर्णे यांनी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय चर्चासत्रामध्ये सहभाग घेतला व त्यांचे शोधनिबंध प्रकाशित झाले.

**प्रा.डॉ.जे.एल.रामटेके**
वाणिज्य विभाग प्रमुख
**प्रा.डॉ. एल.आर.टेंभुर्णे**
अर्थशास्त्र विभाग प्रमुख

# गृहअर्थशास्त्र विभाग

**वार्षिक अहवाल : २०१७-१८**

गृहअर्थशास्त्र विभागाअंतर्गत विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात येते. तसेच विविध सप्ताहाअंतर्गत विद्यार्थिनींच्या कलागुणांना वाव मिळावा यासाठी कार्यक्रमाचे आयोजन केल्या जाते.

दि.१ ते ७ ऑगस्ट २०१७ दरम्यान 'जागतिक स्तनपान सप्ताहा'अतंर्गत डॉ.मंजुषा पवार यांचे 'स्तनांचा कर्करोग' या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. तर दि.१ ते ७ सप्टेंबर २०१७ या काळात विविध स्पर्धा आयोजित करण्यात आल्या. दि.११ -९-२०१७ रोजी रांगोळी स्पर्धा, दि.१२-९-२०१७ रोजी पुष्परचना स्पर्धा, दि.१४-९-२०१७ रोजी पदार्थ सजावट स्पर्धा व वेषभूषा स्पर्धाचे आयोजन करण्यात आले होते.

वरील सर्व स्पर्धांमधून विद्यार्थिनींच्या सुप्त गुणांचा विकास होतो तसेच स्वयंरोजगार मार्गदर्शन मेळावे यासाठी 'आनंद बाजार' हा कार्यक्रम महाविद्यालयामधील स्नेहसंमेलनामध्ये आयोजित केला जातो. या विभागाअंतर्गत गृहउद्योगाला भेट, शासकीय अंगणवाडी मधील बालकांना पौष्टिक पदार्थ वाटप तसेच व त्याचा केस स्टडी केला जातो.

बी.ए.भाग १ अंतर्गत प्रांतीय भरतकला, विविध प्रांतातील प्रसिद्ध असलेल्या कलांचा अभ्यास घेतला जातो तर बी.ए. भाग-२ मध्ये विविध प्रांतातील वैशिष्ट्यपूर्ण पदार्थ आणि त्यातील घटक व पोषणमूल्य यांचा अभ्यास घेतला जातो आणि बी.ए. भाग-३ मध्ये विद्यार्थिनींना संपूर्ण गर्भावस्था यावर मार्गदर्शन केल्या जाते.

गृहअर्थशास्त्र हा विषय विद्यार्थिनींना संपूर्ण माहिती आणि सुगृहिणी बनवितो.

**प्रा.अश्विनी हुड**
गृहअर्थशास्त्र विभाग प्रमुख
भारतीय महाविद्यालय, मोर्शी

# विज्ञान विभाग

## वार्षिक अहवाल : २०१७-१८

महाविद्यालयातील विज्ञान शाखेअंतर्गत विविध उपक्रम राबविण्यात आले. दि.१२ ऑक्टोबर २०१७ रोजी विज्ञान विभागातील बी.एस्सी. भाग-१ व बी.एस्सी. भाग-२ च्या विद्यार्थ्यांची प्राणीशास्त्र (बॉयलॉजी) विभागातील पक्षी निरीक्षणाकरिता सिंभोरा येथील नलदमयंती सागरला भेट आयोजित करण्यात आली होती. ही भेट प्रा. सीमा पाबळे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आली.

दि.२० सप्टेंबर २०१७ रोजी विज्ञान विभागातील बी.एस्सी. भाग-१ व बी.एस्सी. भाग-२ वनस्पतीशास्त्र (बॉटनी) विभागाच्या विद्यार्थ्यांची प्रा.कु.तृप्ती चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली Plant Collection करण्यासाठी सालबर्डी येथे भेट देण्यात आली.

दि.३० डिसेंबर २०१७ ला भौतिकशास्त्र विभागाची इयत्ता ११ वी व १२ वी (विज्ञान) विद्यार्थ्यांकरिता Seminar Competation प्रा.कु.अश्विनी खैरकर यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आली होती. या कार्यक्रमासाठी परिक्षक म्हणून प्रा.ठाकरे मॅडम व प्रा.मोरे मॅडम होत्या. या सेमीनारसाठी विद्यार्थ्यांचा सुद्धा उत्तम प्रतिसाद मिळाला.

दि.१२ जानेवारी २०१८ रोजी विज्ञान विभागातील विद्यार्थ्यांसाठी स्वामी विवेकानंद जयंती निमित्य वर्कृत्व स्पर्धा व निबंध स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेचे आयोजन प्रा. गुंजन कारंजेकर व प्रा.दिक्षिता मानकर यांनी केले आणि विद्यार्थ्यांचा सुद्धा योग्य तो प्रतिसाद मिळाला.

दि.१७ जानेवारी २०१८ रोजी इयत्ता १२ वी या विद्यार्थ्यांसाठी इयत्ता ११ वी विज्ञान शाखेच्या विद्यार्थ्यांनी निरोप समारंभाचे आयोजन केले होते. या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून डॉ.टोपरे सर, डॉ.साबळे व डॉ. देशमुख मॅडम व समस्त विज्ञान विभागातील प्राध्यापक व प्राध्यापिका उपस्थित होत्या. महाविद्यालयाचे प्राचार्य जी.एस.मेश्राम सर व डॉ. बिजवे सर यांच्या सहकार्याने सदर उपक्रम यशस्वीरित्या पार पडला.

दि.३१ जानेवारी २०१८ ला डॉ.सावन देशमुख सरांनी आयोजित केलेल्या मेळघाट येथील रायपूर भेटीत विज्ञान विभागाच्या कु. तृप्ती चौधरी व बी.एस्सी. भाग-१ व बी.एस्सी. भाग-२ चे विद्यार्थ्यांनी यशस्वी सहभाग नोंदविला.

**विज्ञान विभाग**
भारतीय महाविद्यालय, मोर्शी

# क्षणचित्रे : भारतीय महाविद्यालय, मोर्शी



भारतीय महाविद्यालय, मोर्शी येथे भुगोल व मराठी
विषयाच्या राष्ट्रीय चर्चासत्राचे उद्‌घाटनपर भाषण करताना
डॉ. सतीश व्ही. कुळकर्णी (सरचिटणीस,भा.वि.मं, अम.),
अध्यक्ष श्री. अनंतराव सोमवंशी (उपाध्यक्ष,भा.वि.मं, अम.),
डॉ. प्रकाशजी राठोड, डॉ. सुनीलजी आखरे,
श्री. चितरंजन दवे, श्री. अजीतजी भटकर,
डॉ. देशमुख मॅडम, प्राचार्य जी.ए.मेश्राम.



वार्षिक स्नेहसंमेलन २०१८ प्रसंगी
काव्य संमेलनामध्ये कविता सादर करताना
प्राचार्य जी.एस.मेश्राम समवेत
डॉ. प्रफुल्ल गवई, डॉ. चंदु पाखरे
व डॉ. एस.व्ही. टापरे.



वार्षिक स्नेहसंमेलन २०१८ प्रसंगी मार्गदर्शन करताना
प्रमुख अतिथी मा.चंद्रकांतजी वानखडे
(शेतकरी आंदोलन, नागपूर)
व उपस्थित मान्यवर.



आंतरराष्ट्रीय योगदिना निमित्त आयोजित
कार्यक्रमाप्रसंगी उपस्थित
मा. सौ. शिलाताई रोडे (नगराध्यक्ष, मोर्शी),
मा., श्री. मनोहरजी कडू (एस.डी.ओ., मोर्शी),
मा.श्री. अनिरुद्ध बक्षी (तहसीलदार, मोर्शी),
मा.श्री. डॉ. दिपक ढोले
मा. श्री. जी.एस. मेश्राम (प्राचार्य)
मा. श्री. शर्मा साहेब (ठाणेदार, मोर्शी)
(दि.२१-६-२०१७)

# क्षणचित्रे : भारतीय महाविद्यालय, मोर्शी



भारतीय महाविद्यालय, मोर्शी येथे इंग्रजी, वाणिज्य व अर्थशास्त्र या विषयाच्या राष्ट्रीय चर्चासत्रात अध्यक्षीय भाषण करताना प्रा.रामरावजी विजवे (माजी सरचिटणीस, भारतीय विद्यामंदिर, अमरावती), उद्घाटक डॉ. एस.व्ही. कुळकर्णी, प्रमुख अतिथी डॉ.आराधना वैद्य, प्रा. मोहम्मद फारूकउल्लाह, डॉ. प्रतीक बॅनर्जी, डॉ. श्रीनिवास खांदेवाले, डॉ.दिनेश निचीत व प्राचार्य जी.एस.मेश्राम.



रा.से.यो. शिबीर दत्तकग्राम लाडकी येथे मार्गदर्शन करताना मा.डॉ. आर.बी. विजवे (अध्यक्ष, भारतीय विद्यामंदिर,अमरावती), मा.श्री. नवीनकुमारजी पेठे, सौ. सुनंदाताई भुयार (सरपंच), मा.डॉ. दिगांबरराव दुरंगे (उपसरपंच), मा. दिलीपराव वानखडे,मा. राजूभाऊ वानखडे व प्राचार्य जी.एस. मेश्राम.



वार्षिक स्नेहसंमेलन प्रसंगी अध्यक्षीय भाषण करताना प्रा.डॉ. रमेशजी विजवे (अध्यक्ष,सरचिटणीस, भारतीय विद्यामंदिर,अमरावती), डॉ. सतीश व्ही. कुळकर्णी, (सरचिटणीस, भारतीय विद्यामंदिर,अमरावती), श्री. चंद्रकांतजी वानखडे (शेतकरी आंदोलक,नागपूर), श्री. सुखदेवराव पाऊत (सदस्य, महाविद्यालय विकास समिती), श्री. नितीनजी उमाळे (अध्यक्ष,माजी विद्यार्थी संघ) व प्राचार्य जी.एस.मेश्राम



भारतीय महाविद्यालय, मोर्शी येथे भुगोल व मराठी विषयाच्या राष्ट्रीय चर्चासत्रात अध्यक्षीय भाषण देताना श्री.अनंतराव सोमवंशी (उपाध्यक्ष, भारतीय विद्यामंदिर, अमरावती), उद्घाटक डॉ. सतीश व्ही. कुळकर्णी (सरचिटणीस, भारतीय विद्यामंदिर, अमरावती), डॉ. प्रकाशजी राठोड, डॉ. सुनीलजी आखरे, श्री. चित्तरंजन दवे, श्री. अजीतजी भटकर, डॉ. देशमुख मॅडम, प्राचार्य जी.एस.मेश्राम.

# ग्रंथालय विभाग

**वार्षिक अहवाल : २०१७-१८**

**(वाचाल तर वाचाल)**

वाचन हा यशाचा आरंभ आहे. आपल्या विद्यार्थ्यांनी यशाचे शिखर पूर्ण करावे म्हणून आपल्या ग्रंथालयात विविध ग्रंथ सामुग्री उपलब्ध करून दिल्या जाते. यामध्ये पाठ्यपुस्तके, संदर्भ ग्रंथ, नियतकालिके, व्यक्तीमत्व विषयक ग्रंथ आणि सर्वात महत्वाचे म्हणजे सर्व स्पर्धा परीक्षा विषयक ग्रंथ महाविद्यालयीन ग्रंथालयामध्ये उपलब्ध आहेत. त्यांचे मोठ्या प्रमाणात वाचन करून विद्यार्थ्यांनी अपेक्षित ध्येय गाठावे अशा अपेक्षेने ग्रंथपाल अरविंद एस. पाझारे यांनी प्राचार्य मेश्राम साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली नवनवीन उपक्रम सुरु केले आहे.

(१) ग्रंथालय फेसबुक पेज BMVLibary & Knowledge Resource Centere, Morshi या नावाने सुरु केले. यामध्ये नोटीस, एक्टीव्हीटी फोटो, नवीन ग्रंथाची माहिती 'न्यू अरायवल' या नावाने दिली जाते.

(२) 'एम ओपॅक' २०१६-१७ या मागील सत्रापासून सुरु केले आहे. यामध्ये आपल्या ग्रंथालयात असलेली पुस्तके कधीही मोबाईलवर शोधता येतात.

(३) दर शनिवारला 'सेल्फ वर्क ॲक्टीव्हीटी' सुरु करण्यात आली. यामध्ये विद्यार्थ्यांना ग्रंथालयात मुक्त प्रवेश देवून ग्रंथाची देवाण-घेवाण स्वतःच करावयाची अस्ते. याद्वारे विद्यार्थ्यांमध्ये स्वतःच ग्रंथालयाचे कामकाजाबद्दल जाणीव जागृती केली जाते.

(४) पुढील शैक्षणिक सत्रापासून विविध विषयाच्या प्रश्न पतपेढी (Question Bank) तयार करून विद्यार्थ्यांना LCD Projector वर डिस्प्ले करून देण्याचा मानस ग्रंथापाल अरविंद पाझारे यांचा आहे.

(५) ग्रंथालयाचे संपूर्ण संगणकीकरण झालेले असून विद्यार्थ्यांना 'उत्कृष्ट वाचक पुरस्कार' देण्यात येतो. आजपर्यंत हा पुरस्कार ४ मुलींना व ३ मुलांना देण्यात आला.

**प्रा.अरविंद एस. पाझारे**
ग्रंथपाल
भारतीय महाविद्यालय, मोर्शी

# क्रीडा विभाग

## वार्षिक अहवाल : २०१७-१८

क्रीडा विभागाअंतर्गत महाविद्यालयातील विद्यार्थी क्रिकेट, कबड्डी व अथेलेटिक्स आदी आंतरमहाविद्यालयीन स्पर्धेत सहभागी झाले होते. यात प्रामुख्याने संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती विद्यापीठस्तरीय कबड्डी स्पर्धेमध्ये महाविद्यालयाचा कबड्डी संघ अंतिम सामन्यात पोहोचला. तर सागर दाभोळ, बी.ए.भाग-१ या विद्यार्थ्याची आंतरविद्यापीठ बेसबॉल स्पर्धेत निवड झाली व त्याला कलर कोट प्राप्त झाला. विशेष म्हणजे महाविद्यालयात तालुकास्तरीय कबड्डी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेमध्ये एकूण २२ मंडळे सहभागी झाले होते. तसेच महाविद्यालयात विद्यापीठस्तरीय आंतरमहाविद्यालयीन हॅन्डबॉल मुले या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

डॉ.एस.व्ही.टोपरे यांनी अ.भा. आंतरविद्यापीठ स्पर्धेमध्ये विद्यापीठाच्या जलतरण संघाचे प्रशिक्षक आणि पश्चिम विभागीय हॉकी संघाचे प्रशिक्षक म्हणून कार्य केले. त्यांचे आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय चर्चासत्राच्या स्मरणिकेत शोधनिबंध प्रकाशित झाले व सदर चर्चासत्रांमध्ये त्यांनी सहभाग नोंदविला.

**डॉ. एस.व्ही.टोपरे**
शारीरिक शिक्षण संचालक
भारतीय महाविद्यालय, मोर्शी

# मराठी विभाग

# एकविसाव्या शतकातील युवकांपुढील आव्हाने

रामकृष्ण भैयालाल युवनाते, बी.ए.भाग-३

एकविसाव्या शतकातील युवक हा अत्यंत जागरूक आणि काही प्रमाणात बेजबाबदार बनत चाललेला आहे. एकीकडे आपण भारत हा तरुणांचा, युवकांचा देश म्हणून संपूर्ण जगापुढे आपल्या देशाचे गुणगौरव गात असतो. परंतु हे गुणगौरव गाण्यापेक्षा ते कितपत साध्य करता येईल यावर विशेष भर देणे अत्यंत गरजेचे आहे. एकविसाव्या शतकातील युवकांच्या सामर्थ्यावर हा देश २०२० पर्यंत या जगात एक महासत्ता म्हणून उदयास येईल असे स्वप्न मा.प्रधानमंत्री यांनी पाहिले त्याची परिपूर्ती तरुणांनी केली पाहिजे.

भारत देश जगामध्ये लोकसंख्येच्या दृष्टीने जरी दुसऱ्या क्रमांकाचा देश असला तरी या देशामध्ये तरुणांची संख्या ही सर्वात जास्त आहे आणि हीच युवाशक्ति भारताला एका उच्च शिखरावर नेईल अशी पंतप्रधानांची आशा आहे. भारत देशामध्ये युवकांची संख्या ही एकुण लोकसंख्येच्या ६० ते ७० टक्के आहे. या तरुणांच्या भरवश्यावरच मा. प्रधानमंत्री जगातील इतर देशांच्या दौऱ्यावर गेले असता तेथे आपल्या देशातील युवाशक्तीचा उल्लेख करतात. प्रधानमंत्र्यांनी पाहिलेले हे स्वप्न साकार करण्यासाठी आपण तरुणांनी एकत्र येवून या देशाच्या विकासासाठी आपआपल्यापरिने सहभाग दाखविला पाहीजे. तेव्हाच हे स्वप्न पूर्ण होईल.

एकविसाव्या शतकात काही युवकांच्या बाबतीत वेगळेच चित्र दिसत आहे. आजचा तरुण हा आपल्यापासून, कुटुंबापासून, समाजापासून एकंदरित या देशापासून कुठेतरी दूर जाताना दिसत आहे. त्याला कुटुंब, समाज हे परके वाटायला लागले आहे. त्यामुळे त्यांच्यात हवे ते संस्कार घडत नाहीत. अशा दूर गेलेल्या तरुणांना वाईट सवंगड्यांची साथ मिळते. त्यामुळे तो ही त्यांच्या बरोबर वाईट बनू लागतो. त्याला नको असलेल्या वाईट व्यसनांच्या आहारी तो सवंगड्यामुळे जातो. अशा युवकांचा देशाच्या विकासाला हातभार लागत नाही. उलट त्यांच्या कृत्यामुळे देशाच्या विकासाला कुठेतरी तडा जातो.

मुल जन्माला आले की, तेव्हापासून त्याच्यावर शासनाचा खर्च सुरु होतो. मुल जसजसा मोठा होत जातो तसतसा त्याच्यावर शासनाचा होणारा खर्च वाढत जातो. हा खर्च तरुणांनी मोठे झाल्यानंतर स्वत:च्या पायावर उभा राहून आपल्यावर झालेल्या खर्चाची परतफेड म्हणून त्याने आपल्याकडून जसे होईल तसे देशाची सेवा करावी. ती मग नोकरी, व्यवसाय किंवा संशोधन करून त्याची परतफेड करावी.

भारतामध्ये लिंग गुणोत्तरात तफावत दिसून येते. भारतात १००० पुरुषामागे ९२७ स्त्रिया आहे. म्हणजेच या देशात पुरुषांची संख्या जास्त आहे. आपल्या या देशाची ताकत, शक्ती ही या देशाचा तरुण आहे.

आजचे युग हे स्पर्धात्मक युग आहे. स्पर्धात्मक युगात टीकाव धरण्यासाठी त्याच्यासमोर अनेक प्रश्नचिन्हे आहेत. या प्रश्नांना सर्वच युवकांना सामोरे जाणे सहजासहजी जमत नाही. एवढेच नाही तर या प्रश्नांना घाबरून अनेक तरुण आपले ध्येय सोडून देतात. त्यांच्यामध्ये आत्मविश्वास हा फारच कमी होतो. परंतु ज्या युवकांना लहानपणापासून योग्य संस्कार व मार्गदर्शन मिळाले ते पुढे येणाऱ्या कोणत्याही समस्यांना डगमगत नाही ते त्यांच्यापुढे ताठ उभे राहून सामना करतात आणि आपल्या ध्येयापर्यंत पोहोचतात.

आजचे युग हे विज्ञानाचे युग आहे या विज्ञानाने तरुणाला अनेक अविष्कार दिलेले आहेत. याचा उपयोग योग्य केला तर त्याचा नक्कीच विकास होईल व देशाचाही विकास होईल. या विज्ञानाचे मानवाच्या विकासात अत्यंत मोलाचे स्थान आहे परंतु आजचा तरुण विज्ञानाचा उपयोग चांगल्या गोष्टी बरोबरच वाईट गोष्टीसाठी करीत आहे. उदा. अणुबॉबचा शोध विज्ञानानेच लावला याचा उपयोग जागतिक शांतता टिकवून ठेवण्यासाठी केला जातो परंतु अमेरिका

या देशाने जपानवर, हिरोशिमा व नागासाकी या शहरावर बॉम्ब टाकून बेचिराख केले अशी अनेक उदाहरणे येईल. जसे मोबाईल, इंटरनेट इत्यादी.

आजचा युवक तासन्तास फेसबुक, व्हॉटसॅप यावर वेळ घालवत असतो त्यामुळे तो आपल्यासाठी कुटुंबासाठी वेळ देऊ शकत नाही. आजचा युवक हा योग्य विकासाच्या प्रवाहापासून दूर चालला आहे. आजचे तरुण हे वाईट मार्गाकडे जास्त प्रमाणात वळत आहे याला अनेक गोष्टी कारणीभूत आहेत. उदा. आजची शिक्षण पद्धती, त्याच्यावर होणारे संस्कार, मार्गदर्शन इत्यादी.

एकविसाव्या शतकातील युवकांपुढे अनेक आव्हाने तर आहेतच परंतु या आव्हानांना सामोरे जाण्यासीठी युवकांना सामर्थ्य मिळावे हिच सदिच्छा !

I I I

## खेळ जीवनाचा

स्पर्श हवा मज दवबिंदूचा
अलगद घेईन माझ्या ओंजळीत
त्यास विचारीन का भावे मजला ?
रुप तुझे गोंडस, भाव तुझा निरागस,
तुझे आगमण देई चैतन्य,
मनास वाटे प्रसन्न, परंतु....
हाती घेता विरुण जाई,
शोधूनही हरवत जाई
क्षण जसा दवबिंदूपरी
हातात, परी न उमजे मजला
तोच क्षण, तोच दवबिंदू
कधी भेटलीस मजला ?

**कु. शितल म. नांदणे**
एम.ए. भाग-१ (इतिहास)

## जैवविविधता

जागतिक तापमान वाढ, थंडी भयानक,
अतिवृष्टी महापूर, बहु जल अभाव,
अनाढायी प्रदुषण- राक्षस
यास्तव पृथ्वी ग्रासली आहे ।।१।।

युगायुगाने पर्यावरण परी
नैसर्गिक संपत्ती समृध्दी बरी,
मानवी वापर अति अवेळी,
जैवविविधता नष्ट होत आहे ।।२।।

वर्षानुवर्षे नगदी पिकांची लागवड
कृत्रिम खतांचा बेसुमार वापर
झाडांची मानवी हत्यास
जमीन निकस होते आहे ।।३।।

निसर्गाचा समतोल राखनारी जंगल
अन्नसाखळ्या चा करतात नियमन
प्राणी वनस्पतीचं फुलत सहजीवन
माणूस उध्वस्त करतो आहे ।।४।।

खनिज, वायु, प्रवाळ, शैवाल
थापरी, सागरी स्त्रोत संपले
प्रदुषण व मानवी आक्रमणात
सागरसंपदेचा हाल होत आहे ।।५।।

यांत्रिकी बोटीद्वारा खाद्य मासेमारी
डॉलफीन, व्हेल, सील पडतात बळी
वैविद्यपूर्ण परिसंस्था सागरी
प्रजातीची वाढ ढासळते आहे ।।६।।

देवराई देवतळी श्रध्देस या सम
सह्याद्री, सातपुड्यात व्हावा पर्यावरण संवर्धन
माती, जल बचाव अभियान
लोकसहभागातून शक्य आहे ।।७।।

**कु. रेश्मा र. पवार**
बी.ए. भाग-२

# शेतकऱ्यांचे भविष्य

कु. ज्योती पंजाबराव मरकाम, बी.ए.भाग-३

भारत हा कृषीप्रधान देश आहे. या देशातील ७०% जनता शेती करते. प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे प्रत्येकांचे पूर्वायुष्य शेतीशी जुळलेले आहे. आज उच्च पदस्थ बरेचसे अधिकारी शेतकाऱ्यांची मुले आहेत. कारण घरची बिकट परिस्थिती प्रेरणादायक ठरते शेतामध्ये बाप आणि बैल सारखीच मेहनत करताना दिसतो. भर उन्हात सूर्य आग ओकत असताना डोक्याला फाटके कापड गुंडाळलेला शेतकरी शेतात नांगर चालवितो. त्याच्या शरीरावरून घाम एखाद्या झऱ्यासारखा वाहू लागतो. गटागटा पाणी पिऊन झाल्यावर तेवढ्याच जोमाने कामावर लागतो. अगदी लहानपणी पाहिलेले हे चित्र विचार करायला लावते. कळत नकळत मन त्या व्यवस्थेविरुद्ध पेटून उठते. मग परिस्थिती बदलविण्याचा एकच ध्यास लागतो.



मेहनत, अभ्यास आणि नोकरी हेच समीकरण जीवनात पक्के होते. बघता बघता परिस्थिती बदलते. साहित्यांच्या भाषेत अशुद्ध बोलत असलेला शेतकरी जीवनाचे शुद्ध तत्त्वज्ञान शिकवितो. इतरांचे पोट भरणाऱ्या त्या शेतातल्या पिकाला पोटच्या पोराएवढे महत्त्व देतो. आपले वडील शेतकरी आहेत याचा अभिमान प्रत्येकाला असायला पाहिजे. एकमात्र परिस्थितीशी संघर्ष व त्यात मिळविलेल्या यशाचा एक इतिहास असतो. शेतकरी हा कोणत्याही पदवीविना उत्तम शेती करतो. कामात आळस वा कामचुकारपणा करीत नाही. सकाळ-सायंकाळ फक्त मेहनत आणि मेहनतच . भ्रष्टाचाराच्या या जगापासून आमचे शेतकरी कितीतरी लांब आहेत मग देशाविषयी खरा प्रामाणिक कोण? तीस हजार रुपये पगार कमविणारा लाखोची इस्टेट जमवितो व प्रामाणिक शेतकरी प्रसंगी घरावरचे कवेलूही विकतो मग कुणाचा मुलगा-मुलगी म्हणेल माझा बाप प्रामाणिक आहे?

गबाळ्यासारखे मळकट कपडे घालणारा शेतकरी आपल्या मुला-मुलींना म्हणतो, बेटा घाबरु नकोस, तू इंजिनिअरींग कर, म्हणे तुझा बा जिवंत आहे उपाशी राहीन, पण तुले शिकविल तेव्हा कुणांचे डोळे पाणवणार नाहीत?

शेतकरी म्हणजे जीवनाची जिवंत होळी आहे. जी मेहनतीच्या लाकडावर आपल्या पिलांना उब देत असते. त्यांनी मँगो, पिझ्झा कधीही नाही चारलं पण ठेचा, कुचला यांचा स्वाद विरघळू दिला नाही. एसी मधल्या गारव्यापेक्षा शेतातल्या झाडाखाली शीतलता विसरता येत नाही. शेतकऱ्याचे शब्द हे एखाद्या मॅनेजमेंट गुरुपेक्षा कमी नसतात स्वत:च्या आवरणातून ते बऱ्याच गोष्टी शिकवितात. जबान म्हणजे जबान, मग मेलो तरी पर्वा नाही, हे त्याच्या जिवनाचे तत्त्वज्ञान!

*घेतो अंगावर चिंध्या, खातो मिरची भाकर*
*काठी उसाची पाचार, जगी मिळाया साखर*
*काटा त्याच्याच पायी का , काय तेन केलय पाप ?*
*तिथे राबतो, कष्टतो, माझ्या शेतकरी बाप !*

भारत हा कृषीप्रधान देश असल्याने येथील प्रमुख व्यवसाय शेती

हाच आहे. शेकडो पंच्याऐंशी लोक आपला उदरनिर्वाह शेतीच्या धंद्यावरच चालवितात. या व्यवसायाची हल्लीच्या काळात फार हेळसांड होत आहे. त्यामुळे शेतकरी वर्ग अत्यंत हवालदिल बनला आहे.

शेतकरी सुखी तर देश सुखी, या म्हणीप्रमाणे शेतकऱ्यांच्या सुखसमृद्धीवरच देशाची भरभराट अवलंबून आहे. परंतु आजचा शेतकरी हा स्वतःच सुखी नसल्याने देश सुखी व संपन्न असणे संभवतच नाही देशाची भरभराट, वैभव, संपन्नता हे शेतकऱ्यांच्या अन्नधान्य समृद्धीवरच अवलंबून असते. त्यामुळे सर्वप्रथम त्यांच्या आर्थिक विकासाकडेच व त्यांच्या परवडीकडे अधिक लक्ष पुरविणे अत्यावश्यक ठरते. सध्याच्या शेतकऱ्यांची अवस्था अंत्यत वाईट होत आहे? आज शेतकऱ्याची काय अवस्था आहे? रात्रंदिवस राबून राहाला लागणारे अन्नधान्य पिकवूनही त्याला अंगभर कपडा घालायला मिळत नाही. तसेच एकरस्या कापसाची लागवड करूनही त्याला अंगभर कपडा घालायला मिळत नाही. इच्छा असूनही त्यांच्या मुलाबाळांना आर्थिक संपन्नतेअभावी उच्च शिक्षण देता येत नाही. आजारपणामध्ये त्याला औषध पाण्याची सोय करता येत नाही म्हणूनच त्याला पोटभर अन्न, अंगभर कपडा, राहण्यास निवारा, त्याचा मुलाबाळांस शिक्षण प्रसंगी औषधोपचाराची सोय इत्यादी गोष्टींकडे लक्ष पुरविणे आवश्यक आहे.

तुकडोजी महाराजांनी भारतीय शेतकऱ्यांचे चित्र अगदी चेतक शब्दात रेखाटले आहे. ते म्हणतात, सर्व प्राणांसि सुखी करावे। अन्न वस्त्र यांसि द्यावा परी स्वतः दुःखाचि भोगावे। भूषण तुझे प्रामन्यासी। कष्ट करोनी बहुत बोजासी। परी झोपडीही नाही नेटकीशी, स्वातंत्र्याकरीता रुखी होसी। प्रजा भोगती इतरांचि।।

याचे एकमेव कारण जर कोण असेल तर शेतकऱ्यांचे अठराविश्वे दारिद्र्य, विनोबाजी म्हणतात, त्याचप्रमाणे आपल्या खेड्यातील सारी लक्ष्मी येऊन शहरात जाते. शेतात घाम गाळून पाळणाऱ्या अधिक शेतकऱ्यांना त्यांच्या व्यवसायातील विकासाची संधीच उपलब्ध झाली नाही. शेवटी म्हणावे लागेल की 'जगाचा पोशिंदा सुखी तर देश सुखी, जग सुखी!'

। । ।

## सुखी संसाराचा महामार्ग

एका कविने म्हटले आहे
जगायचं म्हणून जगायचं नसतं
केवळ धडप्यासाठी मरायचं नसतं
वादळातल्या दिव्यानेसुद्धा
प्रकाशासाठीच जळायचं असतं ।।

अडचणीवर मात करुन
एकमेकांनी एकमेकांना सावरायचं असतं।
कितीही संकट आली तरी
डगमगेल कधीही व्हायचं नसतं।।

छोट्या मोठ्या कारणावरुन
कधीच कुणीच रागवायचं नसतं।
आपले दोष आपणच सुधारुन
दुसऱ्यालाही समजून घ्यायचं असतं।।

मिळेल त्यात समाधान मानून
नेहमी आनंदात राहायच असतं ।
वेळ प्रसंगी चटणी, भाकरीसुद्धा
खायला तत्पर व्हायच असतं।।

तरच टिकेल तुमच्या संसाराची नौका
कितीही मोठ्या संकटात।
वाटणार नाही कधीच चिंता
सुखच सुख मिळेल जिवनात।।

प्रेम मजबूत करील त्यात
तुमच्या या एकोला जोडीला।
प्रसाद मिळ तुमच्यासाठी
प्रार्थना करीत देवाला ।।

**अंकित चंद्रकात कडू**
बी.ए भाग ३

# माँ जिजाऊ

कु. श्रुती रामदास महल्ले, बी.ए.भाग-२

मराठ्यांनी आपल्या मनावर कोरुन ठेवण्यासारखा दिवस म्हणजे १२ जानेवारी राजमाता ह्या स्वराज्य साकार जाधवांची मुलगी भोसल्यांची सुन अशा जिजाऊंचा जन्म १२ जानेवारी १५९७ मध्ये सिंदखेड येथे झाला. जिजामाता ज्या काळात जन्मल्या तो काळ होता परतंत्रतेचा. लहानपणी जिजाऊ फार खोडकर हत्ती पाहण्याचा व घोड्यावर बसण्याचा फार हट्ट. जिजाबाई कराव्याच्या राम रावणाच्या युद्धाच्या गोष्टी त्यांना ऐकायला आवडत असे. त्यांच्या प्रश्न विचारण्याने जिजाबाईंचे बालपण निघुन गेले. शहाजी राजे व जिजाबाईंचा विवाह इ.स १६०५ मध्ये मोठ्या धुमधडाक्यात झाला. जिजाबाई आपल्या सासरी गेल्या पण सासरी त्यांना धावपळ, संकटे, कष्टांना सामोरे जावे लागले. माहेरची माणसे त्यांच्यापासुन तुटलेली होती. त्याचे फार मोठे दुःख जिजाऊंना झाले. जिजाऊचे जीवन म्हणजे ऊन पावसाचा खेळ, क्षणात सुख तर क्षणात दुःख.



दि.१९ फेब्रुवारी १६३० रोजी जिजाबाईंना मुलगा झाला. शिवाईदेवी नवसाला पावली म्हणून पुत्राचे नाव शिवाजी ठेवले. अंधार फार झाला आता दिवा पाहिजे. राष्ट्राला पुन्हा एकदा जिजाऊचा शिवा पाहिजे प्रत्येक मराठ्यांचा रक्तात स्वाभिमान घडविला. जिने प्रत्येक मावळ्यात शिवबा घडविला, ज्या वेळोवेळी शहाजीच्यां पाठीमागे उभ्या राहल्या.

माता एकप्रकारे शिल्पकार असते तिने दिलेले ज्ञान बोध प्रत्येक ग्रंथापेक्षा श्रेष्ठ असते. ती आपल्या आपत्यांना घडवण्याची कामगीरी करत असते अशीच कामगीरी जिजाबाईंनी केली. जिजाबाई शिवबाला रामायणाच्या व महाभारताच्या गोष्टी सांगत त्यांनी शिवबाला पराक्रमी बनवले.

परंतु आताच्या स्त्रिया रामायणाच्या गोष्टी सांगु शकत नाही. त्यावेळी मुगल बादशाहा आपल्या मावळ्यांचा लेकीवर वाईट नजरा ठेवत असे म्हणून मला त्याच्या बद्दल म्हणावेसे वाटते की, नका ठेवू वाईट नजरा महाराष्ट्राच्या लेकीवर, पेटून उठेल महाराष्ट्र सारा महाराष्ट्राचा ऐकोवर.

तेव्हा जिजाऊंनी शिवबाला सांगितले पाहा शिवबा तुम्ही शत्रुंचा, स्त्रियांचा आदर करा. तुम्ही त्यांना रयतेसाठी लढा द्या व आपल्या मानाचे राज्य निर्माण करा. पण आजची आई म्हणते आपल्या मुलाला बेटा कोणाच्या भानगडीत पडु नको आपल्याला काय करायचं. कोणाच आजची आई ही आत्मकेंद्रीत बनत आहे.

जर जिजाऊंनी असा विचार केला असता तर आज आपण इथे असतो का? परंतु जिजाबाईंची इच्छा होती की आपले राज्य निर्माण झाले पाहीजे.

''जिजाऊ तुम्ही नसता तर नसते झाले शिवराय नि शंभु छावा<br>
जिजाऊ तुम्ही नसता तर नसते मिळाला स्वराज्याचा ठेवा<br>
जिजाऊ तुम्ही नसता तर नसते लढले जिद्दीने मावळे<br>
जिजाऊ तुम्ही नसता तर नसते दिसले विजयाचे सोहळे''

जिजाऊ ही प्रत्येक स्त्रीमध्ये असते पण तिला जागवण्याचे काम आपण केले पाहीजे व जेव्हा मुलींमधील जिजाऊ जागेल तेव्हाच आपली प्रगती होईल. इतिहास निर्माण करणे म्हणजे आपल्या चुकांना जागुन नवा इतिहास निर्माण करणे म्हणजे इतिहास होय.

।।।

## स्त्रीशक्ती

भान असूदे संस्कृतीचे
पालन कर कर्तव्याचे
रस्तोरस्ती अन्यायाचे राडे
लक्ष्य असूदे तू याकडे
विसरुन जा लज्जेला,
शिक धैर्याने वागायला
पदर खोचून कमरेला
शिक धैर्याने वागायला
पदर खोचुन कमरेला
संकटाचा कर मुकाबला
हुंड्याच्या राक्षसाला करुन गुलाम
ठेव, तुझ्या हाती त्याचा लगाम
कारण त्याने केला पाहिजे तुला सलाम
आणि दाखव समाजाला
स्त्री शक्तीचा परिणाम
होऊ दे स्वत:ला झाशीच्या राणीची आठवण
तिच्या प्रमाणे वागुन तुला
करायची आहे उत्तम समाजाची जडण-घडण
समजु नको स्वत:ला
दीन दुबळी अबला नारी
कारण, लक्ष्यात असूदे
तू आहे एक चिंगारी
तू आहे एक चिंगारी.

**कु. चंचल विश्वासराव इखे**
बी.ए. भाग -२



## सावित्रीबाई फुले

कार्य आठवताना जिचे
डोळे येते भरूनी
अशी आपुली सावित्री
पूण्यवान होती ॥धृ॥

जिच्यामुळे शिकली
अनंत स्त्री अन् मुली
अशी पुण्यवान ती सावित्री होती ॥१॥

कितीही कार्य जरी
आठविले तिचे
तरी अपुरे पडती
सर्व कष्ट सहन करूनी
जिने केली स्त्रीमुक्ती
अशी पुण्यवान ती सावित्री होती ॥२॥

क्रांती घडवूनी
पेटविली ज्योत शिक्षणाची
करूनी प्रणाम तिला
आठवावे नेहमीसाठी ॥३॥

**कु. कल्याणी ज्ञा. काळे**
बी.ए. भाग ३

## जीवन आणि शिक्षण

जीवन आणि शिक्षण
काय यांचे मिश्रण
शिक्षण आहे शिक्षण
मात्र जीवनात आवश्यक
आहे शिक्षण,
नाही तर व्यर्थ आहे जीवन....

सामान्य माणसाचा हक्क आहे शिक्षण
आपला मान आहे शिक्षण
आपली शान आहे शिक्षण
जीवनाचा अभीमान आहे जीवन.....

ज्ञानाचे आहे मिश्रण
ज्ञानाचा आले संगम
दोन नात्यांचे जसे बंधन
नाहीतर व्यर्थ आहे जीवन.....

शिक्षण आहे ज्ञानाचा घडा
जीवन आहे ध्येयपूर्तीचा लढा
म्हणूनच तर शिक्षण आहे जीवन
आणि जीवनच तर शिक्षण
नाहीतर व्यर्थ आहे जीवन
व्यर्थ आहे जीवन...

**कु. संजीवनी पंढरीपंत खंडारकर**
बी.ए. भाग३

# ग्रामीण स्त्री

कु. निकिता राधेश्यामजी चौधरी, बी.ए.भाग-२

आजचा काळ संगणकाचा आहे असे म्हणणारे आपणचं पण मग आजच्या या जगात असे विचित्र चित्र का बरं आढळून येते? ग्रामीण स्त्रियांचे अंधश्रध्दा निर्मुलन, रुढी-परंपरातून सुटकेची शिकवण व आत्मविश्वास या दृष्टीने प्रबोधन होते. ते कसे जरुरीचे आहे ते पुढील उताऱ्यावरुन स्पष्ट होते.

संसार म्हणजे सुख-दु:खाचे मिश्रण, अमृताचे व विषाचे प्याले. मात्र ग्रामीण स्त्रियाच्या वाट्याला दु:ख, उपेक्षाच येते. रात्रंदिवस कष्ट, अज्ञान, अंधश्रध्देच्या भोवऱ्यात सापडलेल्या मुलाचा जन्म हा कुटुंबाच्या काळजीचा विषय असतो.



परक्याचे धन असेच मुलीला समजले जाते, शिकलेली मुलगी, घर पुढे नेईल।।

असे म्हणणारे आपण व समाजात राहणारे इतर लोकही सांगतात की, मुलीला जास्त शिक्षण नको, कामापुरते शिक्षण खुप झाले. शेवटी त्याचे काम हे 'चुल आणि मूल' हेच असते पण असा विचार ठेवूनच ग्रामीण भागात शिक्षणाचे प्रमाण कमी आहे. ग्रामीण स्त्रियांना विज्ञान तंत्रज्ञानाच्या युगात पाऊल टाकण्यासाठी अगोदर आजुबाजूची विचार प्रणाली सुधारित केली पाहिजे.

*मुलगी वाढते । जशी चंद्रम्याची कोर।।*
*अंतरंगी । बापाला पडे घोर ।।*

ही आजची वस्तुस्थिती आहे. खेड्यापाड्यातील मुलींचे शिक्षण शिकायला, वेगवेगळे ज्ञान प्राप्त करण्याची इच्छा असताना सुद्धा त्यांना शिक्षण घ्यायला मिळत नाही. वयाची १८ वर्षे पूर्ण होताच तिचे लग्न करुन दिले जाते. लग्न झाल्यावर मग ती जणू नष्टच होते आणि नंतर सासू-सासऱ्यांची व नवऱ्याची काळजी असते. घराबाहेर पाऊल टाकयचा नाही. ज़र असे काही आढळले तर लगेच तुझ्या माहेरी कळवेल, असे म्हणून तिला गप्प बसवले जाते.

*स्त्रियांचा जन्म । नको देवु हरि ।।*
*रात्र ना दिवस । परक्याची ताबेदारी ।।*

ग्रामीण स्त्रियांना स्त्री जन्म नको, असे म्हणण्यासारखी परिस्थिती आढळते. परक्याचे धन म्हणून तिच्याकडे पाहून तसेच संस्कार केले जातात. मुलगी वाढू लागली की आई-वडीलांना तिच्या आनंदापेक्षा तिची चिंता अधिक सतावत राहते. कधी मुलीचे लवकर लग्न करतो व कधी आपल्या जबाबदारीपासून मोकळे होतो असे वाटते. पण आपण तर जबाबदारीतून मोकळ होतो असे वाटते. पण मुलीला ज्या जंगलात नेऊन सोडतो याचा कोणी विचारही करीत नाही.

भुक लागते माझ्या पोटी ।
वरवंटा देत्ये गाठी ।।
बाप्पाजी हो तुमच्या नावासाठी ।।

भुक लागते तरी मात्र सासु घरी वेळेवर जेवत नाही. जेवलं तर कोणी म्हणेल की, सुनेचे कर्तव्य तिने सगळ्यांच्या नंतर जेवायचे.

भुक लागली तर मार मग पोटाला गाठी आणि यांच्या जर विरोधात गेले तर वडीलांच्या नावासाठी ती सारे सहन करते. सासरी सारी मंडळी तिला टाकून बोलतात. सासू-सासरे, दीर -नंनद सर्वंनाच बोलण्याचा अधिकार, मारहाण चुकत नाही. ग्रामीण भागात शेती हा प्रमुख व्यवसाय. ऊन, वारा, पाऊस, थंडी कशाचीही फिकीर न करता ढोरासारख्या राबणाऱ्या ग्रामीण स्त्रीया पाहिल्या की मन दुःखी होते. सर्वांना सुखाचे जीवन पण स्त्रियांना असे जीवन का ? आज जर स्त्री जगात नसती तर जगाचा संपूर्ण विकास व जगातल्या प्रत्येक घरात प्रेमाची ज्योत जागवणारी स्त्रीच असते. कारण वैवाहिक जीवनात स्त्रीशिवाय जीवनाला अर्थ नाही म्हणून जीवनात स्त्रीचे महत्त्व हे सर्वाधिक असते.

आपण ज्या मुलीला नाकारतो, पण तिच्यापासून मात्र वंशाची वेल चालत आलेली असते. कारण मुलगी ही एक पत्नी असते, आई असते, बहीण असते तसेच कुटुंबातील कित्येक नाते तिच्याशीच जुडले असतात.

अंधश्रध्देच्या युग । फसकटीचे युग ।।
ग्रामीण स्त्री । मात्र जन्मापासुन ।।
गुंतलेली - गुंतलेली असते ।।

ग्रामीण भागातील बहुतांश स्त्रिया जादुटोना, भुतपिशाच, मंत्र-तंत्र यांच्या आधिन गेलेल्या असतात. त्यामुळे त्या मागे असतात. ग्रामीण स्त्रियांना शिक्षण कमी असल्या कारणाने अडाणी, अल्पशिक्षित स्त्रिया उपास, नवस व अंधश्रद्धेच्या अंधकारात वावरतात. कोणतीही बिमारी डॉक्टरांना दाखवण्यापेक्षा त्यांना जादुटोना , मंत्र-तंत्र करणाऱ्याला दाखविणे आवश्यक वाटते. याचे कारण असते कमी शिक्षण म्हणून अंधश्रद्धा जास्त वाढीस लागते.

म्हणून ग्रामीण स्त्रिने सुध्दा आता मोठ्या प्रमाणात शिक्षण घ्यावे व अंधश्रद्धेच्या युगात न राहता विज्ञान - तंत्रज्ञान व नवनवीन संसाधनांचा उपयोग करावा व आपले जीवन दुसऱ्यावर न अवलंबून ठेवता स्वत:च आपले जीवन सृदृढ करावे. असाच मोलाचा उपदेश ग्रामीण स्त्रियांना द्यायचा आहे.

। । ।

## नक्षत्रांच देणं उरलं .....

आकाशी मेघ दाटून आले
सरी थेंब थेंब ओसरु लागले
मृग नक्षत्रांची चाहूल लागली
बळी राजाची लगबग सुरू झाली

बाप माझा रेषा आखतोय नांगरानी
बीजे पडती टपटप सरींनी
कर्ज घेऊनी घेतले खत, बियाणे
दिला पावसाने दगा झाली दुबार पेरणे

पिके डोलू लागले शेतात
यंदातरी कर्जफेड होईल वाटे मनात
उभ्या पिकावरी लागले कीड रोगांचे सावट
फवारता फवारता बळीराजाची लागली वाट

रोगराईने शेत झाले फस्त
बाप माझा होता चिंताग्रस्त
मी म्हटलं बापाला, मनात आणू नको आत्महत्तेचे कारण
एकेक करून करू कर्जाचे निराकरण

कधी रोगराईने तर कधी अवकाळी
हाती पीक नाही पडला कर्जाला बळी
माथी कर्जाचा डोंगर शेतात काही नाही उरलं ....
आता फक्त नक्षत्राचं देणं उरलं

**कु. रुपाली ग. चौधरी**
बी.ए. भाग-३

# व्यसनाधिनता

कु.श्रुतिका म. वासनकर, बी.ए.भाग-२

फुलपाखराला जशी फुलाची गरज असते. मासोळीला जशी पाण्याची गरज असते. तशीच या देशाला सळसळत्या रक्तांच्या तरुणांची गरज आहे.

आज माणसाला माणुसकी आहे असा जो देश आहे तो म्हणजे भारत देश. या देशाचा उल्लेख होत असतांना देखील आज भारतात असलेली ही माणुसकी व्यसनात बुडून चाललेली आहे. जेव्हा आपण गुलामगिरीत होतो तेव्हा आपल्याला स्वातंत्र्य हवे होते. पण आज आपल्याला स्वातंत्र्य मिळालेले आहे. भारत हा विकसनशील देश आहे. हा ज्या तरुणांच्या खांद्यावर आहे हेच तरुण उद्याच्या भावी आयुष्याच्या कणखर नागरिक आहेत. पण आजचा तरुण हाच जर आपल्या जिवनात व्यसनांच्या आहारी गेलेला असेल तर त्याला भावी आयुष्याचा ताट बाण्याचा नागरिक म्हणता येणार नाही. आज आपण कोणत्याही वाईट गोष्टीचे अनुकरण जास्त करत असतो आणि या व्यसनाधिनतेला कारण असलेली वस्तु म्हणजे टीव्ही, दारु पिणे, पत्ते खेळणे व पुड्या खाणे याशिवाय मादक द्रव्याचा उपयोग शौक म्हणून आजची व्यसनाधिन तरुण पिढी करीत आहे आणि याचा प्रसार सिने कलावंत करतात व त्यांचे अनुकरण तरुण पिढी करते.



एवढेच नव्हरे तर, लहान-लहान मुले देखील त्याचेच अनुकरण करतात आणि आज ते तसेच वागण्याचा प्रयत्न करीत आहेत. ज्या वयात शिक्षण घ्यायचे असते मोठ्या माणसांचा आदर, गुरुंचा आदर करायचा आसतो अशा वेळेला मुलं हे आपलेच आयुष्य गमावत आहे हे त्यांना केव्हा कळेल. आज १८ वर्षाचे तरुण हे शिक्षण सोडून दारु पित आहेत. एवढेच नव्हे तर गणपतीला देव म्हणून पुजतात आणि गणपतीच्या मागे जाऊन जुवा, दारु, पत्ते हे सर्व वाईट व्यसनांचे कृत्य करत असतात व त्यांच्यापुढे नतमस्तक होऊन नाचतात देखील तुम्हाला दारु पिऊन नाचा तेव्हाच मी प्रसन्न होईल असे देवाने सांगितले आहे काय? मग आपण स्वतःच्या आत कधी झाकून बघतच नाही.

आपलीच ओळख आपल्याला नाही. आपण सुजान, सज्जन नागरिक बनून या देशाचा भार आपल्या खांद्यावर कसा उचलणार? या देशाची प्रगती आपण कशी करणार? याचा विचार केला पाहिजे. यावर तर मला एवढेच म्हणावेसे वाटते,

*काय सांगू, कसं सांगू*
*कोणत्या मामांना उमजेल*
*तुम्हाला ह्या अनोख्या*
*ओळींना पानावर उतरवते*
*त्यातच तुम्हाला सर्व समजेल*

काव्य माझे स्वच्छ, निर्मल पाण्याप्रमाणे शुध्द आहे. कुणालाही समजेल असेच मी या लिहिलेले आहे. मी आज व्याकुळ झालेल्या मनाने म्हणते की, वाचन करा वाचनाने वाईट गोष्टी दूर होतात. स्वत:ची ओळख जगाला, समाजात करुन घ्या. स्वत:च स्वत:ला ओळखा म्हणजे वेळ गेल्यावर रडत बसण्याची वेळ आपल्यावर येणार नाही. आणि शिक्षण घेऊन आपले हक्क मिळविण्याचा प्रयत्न करा. शेवटी एवेच म्हणेल -

*माणसाने जीवनात कधीच*
*निराश नसतं व्हायचं,*
*माणूस म्हणूनच जगायच,*
*माणूस म्हणूनच मरामयं*
*अमृत मिळालं नाही म्हणून*
*विष नसतं घ्यायचं.*

।।।

## बाप

आईच गुणगान खूप झाले
पण बिच्याऱ्या बापान काय केले
बिकट प्रसंगी बापच सदा सोडवी
आपण फक्त गातो आईचीच गोडवी
आईकडे असतील अश्रूंचे पाट
तर बाप म्हणजे संयमाचा घाट
आठवते जेवण करणारी प्रेमळ भाई
त्या शिदोरीची सोय बापच पाही.
देवकी यशोदेचं प्रेम मनात साठवा
टोपलीतून बाळास नेणारा वासूदेव ही आठवा
रामासाठी कौशल्येची झाली असेल कसरत
पुत्र वियोगाने मरण पावला बाप दशरथ
काटकसर करुन मुलास देतो पॉकिटमनी
आपण मात्र वापरी शर्ट, पॅन्ट जुनी
मुलीला हवे ब्युटीपार्लर नवी साडी
घरी बाप आटपतो बिने साबणाची दाढी
वयात आल्यावर मुले आपल्याच विश्वात मग्न
बापाला दिसे मुलाचे शिक्षण पोरीचे लग्न
मुलाच्या नोकरीसाठी जिना चढून लागतो धाप
आठवा मुलीच्या स्थळासाठी उंबरठे झिजवणारा बाप
जीवनभर मुलाच्या पाठी बापाच्या सदिच्छा
त्यांनी समजून घ्यावं हिच माफक इच्छा !

**कु. प्रगती सा. वाघ**
एम.ए. भाग –२ (इतिहास)

## तारका

हळुवार घे श्वास आता इथे
निजल्या तारका अशा तिथे
हुंकार घे असा आता इथे
ज्यात असे चिंब भिजली सारे
मी तू पण न उरे दुजे का रे
गाऊ आता अद्वैताचे गाणे

**कु. रोहिणी रा. खोपे**
बी.ए. भाग – ३

## आपलीच माणसे पण

शब्दांच्या सावल्या जेव्हा मागे पडल्या होत्या......
खरे सांगतो भावना अर्थहीन जडल्या होत्या......
आपलीच माणसे पण विरहाचे आर्त भाव
भिजलेल्या शब्दांच्या अशा कहाण्या घडल्या होत्या....
भोवती विखुरलेली मना मनात कहाणी
तुमच्या माझ्या आसक्तीच्या भावनाच खुडल्या होत्या....
सोबतीला तुम्ही असावे अन् आसमंत मोकळा
नेमक्या सावल्याच तेव्हा मागे पडल्या होत्या......
खेळ भावनांचा जुगार म्हणेल याला
नाती जपतांना नेमक्या भावना हरल्या होत्या.....
अल्पसा वेळ हाती असंख्य जरी प्रश्न
गतवर्षाच्या आठवणी क्षणात रडक्या होत्या.....
किती चुकलो आम्ही आम्हा न हे कळाले
चुका आमुच्या लहान–मोठ्या तुम्हीच सावरल्या होत्या....
खेळ भावनांचा जुगार म्हणेल याला
नाती जपतांना नेमक्या भावना हरल्या होत्या.....

**कु. आरती सु. गजलकर**
बी.ए. भाग–३

## या मुली

कशा असतात मुली
छोट्या–छोट्या गोष्टीवर रुसतात या मुली
कितीही बोला तेव्हा गप्प बसतात या मुली
कितीही प्रेम करा संयश सुध्दा करतात या मुली
प्रेम करताना आयुष्यभर साथ द्यायची वचने देतात या मुली
स्वप्न दाखवून आयुष्याची मध्येच सोडून जातात या मुली
कितीही केलं
तरी शेवटी आपल्या आयुष्याचा आधार सुध्दा असतात या मुली

**कु. काजल ठाकरे**
बी.ए. भाग–२

# क्षणचित्रे : भारतीय महाविद्यालय, मोर्शी



रा.से.यो. विभागाद्वारे
आयोजित रक्तदान शिबीर प्रसंगी
प्राचार्य जी.एस. मेश्राम, प्राध्यापक वृंद
व विद्यार्थी.
(दि.१४-८-२०१८)

महाविद्यालयात तालुकास्तरीय कबड्डी स्पर्धेच्या
उद्‌घाटन प्रसंगी मार्गदर्शन करताना
श्री.बी.एल. तळवी (एस.डी.पी.ओ.,मोर्शी)
व उपस्थित प्राचार्य जी.एस.मेश्राम,
मा. श्री.नितीनभाऊ उमाळे, श्री. नवीनकुमार पेठे
व इतर मान्यवर





महात्मा गांधी स्मृती दिनानिमित्त
गांधी स्मारकाची स्वच्छता करण्यात आली व
हारार्पण करण्यात आले याप्रसंगी उपस्थित
प्राध्यापक.
(दि.३०-१-२०१८)

'स्वच्छता हीच सेवा'
रॅली प्रसंगी डॉ. संदीप राऊत
व विद्यार्थी



# क्षणचित्रे : भारतीय महाविद्यालय, मोर्शी




श्री संत गाडगे बाबा जयंती कार्यक्रमाप्रसंगी
उपस्थित मा. प्राचार्य जी.एस.मेश्राम
व प्राध्यापक वृंद.
(दि.२३-२-२०१८)



क्रांती दिन प्रसंगी उपस्थित
मा.श्री. राजाभाऊ महाजन,
प्राचार्य जी.एस.मेश्राम व प्राध्यापक वृंद.
(दि.९-८-२०१७)



प्लॅस्टिक निर्मूलन रॅलीप्रसंगी
डॉ. संदीप राऊत व विद्यार्थी




रा.से.यो. वर्धापन दिनानिमित्त
मार्गदर्शन करताना
मा.श्री.शेखर भोयर (अमरावती)
(दि.२४-९-२०१७)

# खरे जीवन

कु. प्रीती बुल्हारे, बी.ए.भाग-२

तुमची जेव्हा भेट होते तेव्हा आम्हाला फारसा आनंद होत नाही. कारण तुम्हाला सर्वीकडे फक्त नकारच दिसतो. शासन जागा काढत नाही. आमचं वय वाढायचं थांबत नाही. परीक्षा फी कमी होत नाही. गरीबी कमी होण्यांच नाव घेत नाही. घरच्यांच्या नजरेत नजर मिळवता येत नाही. जशी शारीरिक आणि मानसिक चेष्टा लावली सर्वांनी. जिकडे पहावे तिकडं सर्व अंधकार दिसतो. स्वत:च मन या सर्वाच्या विरोधात बंड करुन उठतं. वाटतं काहीतरी करुन मरावं. कोणत्यातरी कामात येऊ अस जगावं, परंतु स्वत:चे आई-वडिलांचे, कुटुंबाचेच प्रश्न सोडवायला आपण असहाय्य आहोत. कारण जगात सर्वीकडे कसा अंधारच दिसतो.

बस ! हेच तरुणांच्या अंतकरणातील आवाज हृदयावर आघात करतात. दु:ख आहे म्हणूनच सुखाची अनुभुती होते. जेवढा आपण दु:खाचा विचार करतो तेवढाच आपण सुखाचा मार्गही काढायला हवा. फक्त विचाराने प्रश्न सुटत नसतात. जेव्हा व्यवस्थेविरुध्द मनात आक्रोश निर्माण होतो. दुसऱ्यासाठी काहीतरी करण्याची इच्छा निर्माण होते. तेव्हा सुखाच्या दिशेने जाणाऱ्यांचा रस्ता अडवुन बसण्यापेक्षा त्या दिशेने आपणही मार्गक्रमण करायला पाहिजे. मनात अन्यायाविरुद्ध चीड आहे. म्हणून काय ती मनातच दडपून टाकायची नव्हे, योग्य ती भूमिका साकाररलीच पाहिजे. जंगलात भरकटलेल्या वाटसरुला नारळाचे झाड दिसले. त्याला खूप तहान लागली म्हणून काही नारळ आपोआप झाडावरून खाली पडणार नाही. एकतर तुम्ही ते खाली पडतील म्हणून वाट पाहत थांबायचे नाहीतर तुम्हीच प्रयत्न करुन ती तोडून स्वत:ची क्षुधा शांत करायची. तुम्हाला काय पटतयं !

तुम्हाला सुख हवंय पण तुम्ही प्रवाही व्हायला तयार नाहीत. मग डबक्यात थांबलेले पाणी स्वच्छ राहणार कसे. तुम्हाला यश हवंय. पण लढायची तयारी नाही. तुम्हाला सुख हवंय पण दु:खाची परिभाषा समजून घेण्याची तयारी नाही. तुम्हाला ओझोनयुक्त स्वच्छ हवा हवी पण त्यासाठी बाहेर निघण्याची तयारी नाही. तुम्हाला स्वातंत्र्य हवं पण त्यासाठी वैचारीक पारतंत्र्याच्या बेड्या तोडायच्या नाहीत... म्हणजे हवं सर्वच परंतु काहीच करायची तयारी नाही. हे कसे शक्य आहे. सुर्य जर एकाच जाग्यावर राहिला तर... हवेने वाहणे बंद केले तर... मग आपण का म्हणून थांबायचं. तांदुळात खडे झाले म्हणून तांदुळ खाण्यायोग्य नाही असं म्हणण्यापेक्षा त्यातील खडे काढुन टाकायल हवेत. ज्यावेळी तुम्हाला चांगल हवं, त्या त्या वेळी तुम्हाला चांगलेच प्रयत्न करायला हवेत.

ही चर्चा तुमच्याशीच का ? कारण तुमच्यात ते सर्व करण्याची ताकद आहे. जे तुम्हाला हवंय. जसे थेंबाथेंबाने जसा सागर बनतो त्याप्रमाणेच माणसे जुळलीत की माणुसकीचा महासागर बनले अन् खरं जीवन जगायला मिळेल हिच सदिच्छा!

■ ■ ■

## स्त्री

मनाच्या संथ गतीच्या डोहात कुशकांचे डोकावणे
तरंगावर हलकेच काळ्या सावल्यांचे पाहणे
हे वास्तव का सगळेच भास
मलाच प्रश्न विचारतात माझे दीर्घ श्वास
इथल्या कुणाचच काही खर नसतं
शरीरच नकळत आकाश पेलायला शिकतं
खांद्यावर ओझे वाहणारी ही माणसे अशी का रडखडताय
पाऊल वाटेवरुन जातांना क्षणोक्षणी उसासताय
पण मी..... रडखडणार नाही, उसासणार नाही
माझ्या प्रत्येक पावलागणीक मी समवेत नेणारच मातीला
कारण मी स्त्री आहे, एकविसाव्या शतकातील.

**कु. पुजा अ. चावके**
बी.ए. भाग - ३

## आठवण

आठवण येते कधी मला
अन गालावर खुदकन खळी पडते.....
तर कधी हसता हसता
डोळी माझ्या पाणी आणते....
गर्दीत राहुन सुद्धा ती
एकांताचा आभास देते...
अन् एकांतात येते तर मला
नाही कधी एकटे सोडते...
डोळे बंद केल्यावरचे
नवे विश्व दाखवुन देते....
अन् उघड्या डोळ्यांनीही
ती कधी धुंद करुन टाकते.....
दूर लोटण्याचा प्रयत्न केला
तर अधिकच जवळ येऊन बसते.....
हिच आहे माझी खरी मैत्रिण
नेहमी साथ देणारी....
आगंतुक असली तरी
हवी हवीशी वाटणारी

**कु. सविता भिमरावजी पुनसे**
बी.ए. भाग-२

## तू मला

जीव काट्यावरी टांगले पाहिजे
स्वप्न डोळ्यावरी रंगले पाहिजे
राग नाही बरा, एकटा-कोंडला
भाव थोडे तरी सांडले पाहिजे
आज नाही जरी लाभले जे हवे
लाभ होईल हे वाटले पाहिजे
जाग माझी कधी व्हायची त्यांजला?
शल्य केव्हा तरी संपले पाहिजे
प्रश्न नाही जरी संपती सांगून
जिर्ण वस्त्रापरी पांगले पाहिजे
जीव का कापतो, जीवनाचा असा ?
श्वास, सोन्यापरी वाटले पाहिजे
सोडना तेवढे, सोलणे ते मला
तू मला आतून बांधले पाहिजे.

**शितल विजयराव गोहाड**
बी.ए. भाग-३

## नववर्षा तू ये

नववर्षा तू ये ! तू येशिल तर....
शेतकऱ्यांचा पोशिंदा होऊन ये,
दु:खा सोबत सुख घेऊन ये
अंधाराला फाडुन प्रकाश घेऊन ये
तू येशील तर रात्रीचा दिवस करुन ये....
नववर्षा तू येशिल तर
भ्रुण हत्या रोखण्यासाठी शस्त्र घेऊन ये
शांतीचा संदेश घेऊन ये
नववर्षा तू येशिल तर
संताची वाणी घेऊन ये
पक्ष्यांची मंजूळ गाणी घेऊन ये, तू येशील तर
द्रोणागिरीवरील संजीवनी वृक्ष घेऊन ये
तक्षशिला, नालंदाचे ध्यान घेऊन ये
तू ये .... कर्णाचे कवच कुंडल घेऊन ये
अन् दानाची भावना घेऊन ये, नववर्षा तू ये...
शिवाजीची जिद्द व साहसी कृती घेऊन ये
जिजाबाईची ममता आणि विचार घेऊन ये,
तू ये.. स्वागत आहे तुझ नववर्षा.... !

**कु. पलवी बोरकर**
बी.ए. भाग-२

## मी एक थेंब

जीवनाच्या पावसाबरोबर येणारा
आयुष्याच्या पानावर विसावणारा
काही क्षण विसावून ओघळून जाणारा
दुसऱ्या थेंबाशी एकरुप होणारा कोवळ्या उन्हात
मोत्यासारखा चमचमणारा
क्षणभराच्या अस्तित्वानेही
दुसऱ्यांला आनंद देणारा
अन् जाता जाता अनेक क्षणांची
आठवण ठेवून जाणारा.

**कु. स्वाती रा. इखे**
एम.ए. भाग-२ (इतिहास)

## चारोळी

तुझे अबोल मन
मज गुज काही सांगते
वेड्या जिवाला या
तुझ्या भेटीची ओढ लावते
जीवनात संगीत नाही
तर निरस आहे जीवन
वीणा तार न छेडेल तर
मुके आहे मनाचे अंगण.

**चि. सचिन गोमकाळे**
एम.ए. भाग-१

# माझी आई

कु. अंजली लक्ष्मणराव रायजादे, बी.ए.भाग-२

आई म्हटलं तर दोन अक्षरांचा शब्द आहे आणि म्हटलं तर अतिशय ताकदवाद असा प्रेरणेची ज्योत मनात सतत तेवत ठेवणारा प्रेरणास्रोत आहे. आईची व्याख्या करायची झाली तर ती खूपच सोपी आहे. ती अशी करता येईल, 'जी जन्म देते ती आई'. पण आईला जाणणं इतक सोपं नाही. मग आईला नेमकं कोणत्या व्याख्येत बसवायचं? आईला नमकं कसं जाणून घ्यायचं.

आईला शब्दात बांधणं ही मोठी अवघड गोष्ट आहे. खरंतर कुणीही माणूस कर्तृत्ववान होतो. त्याच्या अगदी मुळाशी-खोलवर आईच असते. कर्तृत्वानं मोठा झालेला माणूसच जगाला थेट दिसतो. पण तो जगाला दिसण्यासाठी पडद्यामागं अखंडपणे आई नावाचं एक अजब रसायन कधीही न थकता कोणतीही कुरबूर न करता अखंडपणे राबलेलं असतं, राबत असतं. हे मात्र जगाला दिसत नसतं. नेहमीच पडद्यामागं राहणार आई हे नेमकं काय रसायन आहे. याचा शोध घ्यायला मुळात आईपणा इतका अथांग आहे की त्याला शब्दांतून कवेत घेणं हे फार अवघड असतं. प्रत्येकाला आईबद्दल माया असते, प्रेम असतं पण तिच्याबद्दलच्या भावनेला प्रत्येकजण शब्दरुप देवु शकतोच असं नाही. सगळ्यांवर सारखी माया करण्याचा आईचा गुणही त्यातून दिसते. मातृभूमी ही आपली आई आहे. एकाच वेळी लाड आणि शिस्त या दोन्हीच मिश्रण असणारी 'ताई' म्हणजेच आई. जवळच्या माणसाचाही मृत्यु सहजतेनं एक निसर्ग सत्य म्हणून स्वीकारायचा ही त्यांच्या आईची दिलेली शिकवण. पतीच्या महान कार्यात सक्रिय सहभागी असलेली आणि आपल्या वैयक्तीक आवडी-निवडींची आहुती समाजिक कार्याच्या यज्ञात सहजपणे टाकणारी जन्मापासून नकोशा असलेल्या मुलावर नंतर प्रेमाची पखरण करणारी आई काळाच्या पलीकडं जाऊन आधुनिक विचार स्वीकारणारी आणि त्याचबरोबर जुन्या विचारातलं योग्य ते स्वीकारणारीही आई.



धर्म, पंथ, प्रदेश, आणि जाती संपवत लेकरासाठी ठामपणे उभी राहणारी आई. एका घरात असणाऱ्या तीन पिढ्यांच्या परंपराचं अंतर अगदी दूर करणारी आई. वडीलांप्रमाणे प्रत्येक गोष्टीत खंबीर राहणारी आणि कायम सपोर्ट कनक्ट जपणारी आई. दिलदार पणे कौतुक करणारी आई. अन्न तुझ्यावर रागावलं तर काय होईल? त्यामुळे जेणाशी मैत्री कर, तुझ डोकं दुखायचं थांबेल असं सांगणारी आई माणसाच्या चांगुलपणावर विश्वास करणारी नव्या पिढीला प्रतिसाद देणारी आई.

आई या रसायनाचं एक अखंड रुप आपल्या समोर उभं राहतं. हे रुप उभं राहत असतांनाच आपल्या आईला भरभरुन काय काय देता येईल याची जाणीवही होत राहते. आपल्यासाठी कायम धडपडणाऱ्या राबत राहणारी आई आणि आपल्या आईशी असलेलं प्रत्यक्षातलं आणि मनातलं सख्य वाढवतं आणि घराला घरपण आणणारी लक्ष्मी ती आई.

## भारतीय संस्कृती

भारतीय संस्कृती आहे
वैज्ञानिक रहस्यच
आजच्या पिढीचे
नाही त्याकडे
तात्त्विक रहस्य आहे
भारतीय संस्कृतीत
संस्कृतीचे रुपांतर
होत आहे विकृतीने
भारतीय संस्कृतीला
महान ठेवतात
फॅशनला सर्वजन

महान बनवतात
जिथे महाल तिथे
सर्व वरुन डेकोरेशन
पाडतात फक्त एकमेकांवर
सर्वच इंप्रेशन
फॅशन पासून आहे
भारतीय संस्कृतीला धोका
नका देऊ हो या फॅशनला मोका

**कु. ऋतुजा अ. रवाळे**
बी.कॉम.भाग-१

## परिक्षेच्या दिवशी

परिक्षेच्या दिवशी
दिवसभर गडबड घाई
सकाळी लवकर उठ
बजावून सांगते आई

परिक्षेच्या दिवशी
ना भूक ना तहान
डोळ्यासमोर असते
पुस्तकाचे पान

परिक्षेच्या दिवशी
मनात असते भिती
धडधड करते छाती
जेव्हा पेपर येतो हाती

परिक्षेच्या दिवशी
टिव्ही बंद राही
अभ्यासाशिवाय
दिसत नाही काही

परिक्षेच्या दिवशी
खूप अभ्यास करायचा
चांगले पेपर सोडवून
पहिला नंबर मिळवायचा

**कु. प्रतिक्षा राजेंद्र अर्डक**
बी.ए. भाग २

## पाणी

कुणाची पाण्यात नाव
कुणाच्या नावेत पाणी
कुणाचे पाणीदार डोळे
कुणाच्या डोळ्यात पाणी

कुणाचे देव पाण्यात
कुणाचे पाण्यात देऊळ
कुणाचे हृदय निष्ठुर
कुणाचे दगडात पाणी ।

कुठे सौभाग्य दुःखी
कुठे आनंद वैभव
कुणाचे रडणे कोरडे
कुणाच्या हसण्यात पाणी ।

कुठे सोन्याचा घास
कुठे घासात पाणी
कुणाचे दार उंचावर
कुणाच्या घरात पाणी ।

पाणी पापाचे कडू
गोड पुण्याचे पाणी
कुणी जगणे तृषार्त
कुणाच्या मरण्यात पाणी ।

**कु. अश्विनी थेटे**
बी.ए. भाग-३

# संत गाडगे बाबा यांचे जीवनचरित्र

कु. प्रगती सं. पाथरे, बी.ए.भाग-२

संत गाडगे बाबा यांची कर्मभूमी असलेल्या महाराष्ट्रातील अमरावती जिल्ह्यात बाबांनी फार मोठ्या प्रमाणात कार्य केले आहे. बाबांनी आपल्या समाजोपयोगी कामास ऋणमोचन येथुन १९०५ साली सुरुवात केली.

बाबांचा जन्म ही अमरावती जिल्यातील शेंडगांव या गावी झाला आहे तर बालपण दापूरा या मामाच्या गावी गेले. वलगाव जवळील पेढीनदीच्या पुलावर त्यांनी प्राण सोडला तर आताच्या गाडगे नगरात त्याच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले . आज तिथे त्यांची समाधी लोकांनी त्यांच्या कार्याची मंहती देणारा दीपस्तंभ म्हणून उभी आहे.



जे का रंजले गांजले,
त्यासी म्हणे जो आपुले
तो ची साधू ओळखावा,
देव तेथे चि जाणावा
मृदू सबाह्य नवनीत,
तैसे सज्ञनांचे चित्त

संत तुकाराम महाराजांचे हे प्रसिद्ध वचन संत गाडगे बाबांना तंतोतंत लागू पडते. चिंधिंचा अंगरखा, खापराच भांड, हातातील काठी ही बाबांची संपत्ती आणि 'गोपाला गोपाला देवकीनंद गोपाला' हा मंत्रघोष एवढेच बाबांच्या पाठीशी सामर्थ्य, हेच बाबांचे शस्त्र आणि अस्त्र हे बाबांचे सौभाग्य आणि औदार्य. यातूनच त्यांची समाज जागृतीची निर्मिती आणि या स्वकर्मातून निर्माण केलेल्या कार्यावर त्यांनी जीवनभर लक्ष केंद्रित केले. वरवर साधासुधा दिसणारा खराटा लाख मोलाचा आहे. बाबांच्या खराट्यात जीवनाला शिव मंगल बनविण्याचे आणि सर्वत्र सौभाग्य फुलविण्याचे तेज आहे. त्यांच्या खराड्याची काडी महत्त्वाची होती. विस्कटलेल्या काड्यात जराही कार्यक्षम नसते. परंतु त्याच काड्या एकत्रित बांधल्या तर फार मोठे काम करुन टाकतात. रस्ता कितीही धुळीने माखलेला असतो गलिच्छ असो. तो एकदम आरशासारखा दिसू लागती. रस्त्यावरुन चालणाऱ्याचे मनही फुलारून निघते. त्याचप्रमाणे गाडगे बाबा नेहमी किर्तन करीत असत. त्याचा एकच मंत्र म्हणजे 'गोपाला गोपाला देवकी नंदन गोपाला ।' रुढी, परंपरा, अंधश्रध्दा यांनी ग्रासलेल्या अज्ञ समाजाला सुखी करणे, ज्ञानी करणे हा या किर्तन करण्यामागील बाबांचा हेतू होता. अज्ञाणी माणसाचे जे विदारक वर्णन बाबांनी आपल्या किर्तनात केले आहे.

त्यावरुन तत्कालीन समाजाचे करुन व दयनीय चित्र आपल्या डोळ्यासमोर उभे राहते. गाडगे बाबा म्हणतात, गावागावाचे व्हावे कल्याण गाव गावही व्हावे सुखी, गाडगे बाबा नेहमी म्हणतात की, सर्वांनी आपले ग्राम स्वच्छ व चांगले ठेवावे. गाव स्वच्छ ठेवले तर शहर स्वच्छ राहतील अस करता करता संपूर्ण देश अन् एक दिवस पूर्ण जग स्वच्छ होईल. बाबांनी किर्तनाच्या माध्यमातून समाजाला प्रपंच करुन परमार्थाचा लाभ घेण्याची शिकवण दिली. बाबा म्हणत 'प्रपंच चवीनं करा पण देवाचे नाव इसरु नोका. संताचा पुरावा हाय, जो अन्न देतो उदराशी शरीर विकावे लागले त्यासी। मग जेणे घातले जन्मासी त्यासी कैसे विसरावे। या उत्तम शरीराचा चांगल्या गोष्टीसाठी उपयोग करा। हातपाय देले परुपकार करा। तोंड देल्ह हरीनाम घ्या।, जिभले तुला काय धंदा। घडीभर भज गे गोविंदा।' असे आहे संत गाडगे बाबा यांचे जीवनकार्य.

।।।

## आई तुझ्याविना

आई तुझ्या संस्कारातुन कोवळ्या रोपाचे तरु झालो,
मी कसा गं विसरेन तुला, तुझ्या मुळेच मी महान झालो.

तुझ्या तो मायेचा पदर लपविता
होता सारे प्रमाद
तुझ्याविना माझा क्षण,
भकास माझं जिणं

कधी तू मारलेस मला, तुझ्या प्रेमळ करांनी
पण त्यातही होती मोठी शिकवण

दुर जाता तुझ्या पासून
चिंता लागे तुझ्या जिवा
जरी मी मोठा झालो
तरी तुझ्या मायेचा पदर हवा.

**कु. पुनम प्रकाशराव किर्तकार**
बी.ए. भाग-३



## शब्द

बोलतांना जरा सांभाळून....
शब्दाला तलवारीपेक्षा धार असते
फरक फक्त एवढाच की,
तलवारीनं मान तर,
शब्दांनी मन कापले जाते
जरी तलवारीच्या जखमेतून रक्त
आणि शब्दांच्या जखमेतून अश्रू येत असले तरी,
दोघांपासून होणारी वेदना मात्र सारखी असते.
म्हणून सांगतो शब्द जरा सांभाळून....
शब्दाला तलवारीपेक्षा धार असते
शब्दच माणसाला जोडतात आणि
शब्दच माणसाला तोडतात
हे शब्दच आहेत, ते कधी रामायण
तर कधी महाभारत रचतात
तुझ्या एका शब्दावर माझे सर्वस्व अवलंबून आहे
तुझ्या एका शब्दावर माझे हसणे
तर तुझ्या एका शब्दावर माझे रडणे अवलंबून असते
म्हणून म्हणतो शब्द जरा सांभाळून....
शब्दाला तलवारीपेक्षा धार असते.

**कु. प्रणिता पंडीतराव वानखडे**
बी.ए. भाग ३

## जीवनाचा मुलमंत्र

प्रयत्नात ढिलेपणा नको
कष्ट करतांना सवलत नको
महत्वकांक्षेला मर्यादा नको आणि
आपल्या इतक्याच पोटतिडकीने दुसरी व्यक्ती
आपल काम करेल ही भ्रांत नको
प्रयत्न करत असतांना निर्णय घेणारी आणखी एक
शक्ती आहे ह्याच भान ठेवाव.
आपण प्रयत्नात ढिलाई केली नाही
हे समाधान कोणीही हिरावून घेऊ शकत नाही.

**कु. कल्याणी चोपडे**
बी.ए. भाग-२

# कन्यादान

कु. प्रिया राजेंद्र झोडगे, बी.ए.भाग-१

खरंच तळहाताच्या फोडाप्रमाणे जपलेल्या आपल्या लेकीला परक्याच्या हातात देताना बाबा किती तुटत असेल ना ?

किती आर्त वेदना होत असतील त्यांना !!

बाप आणि लेक हे नाते शब्दांत मांडणे कठिण आणि ह्याचा अनुभव मी प्रत्येक क्षणी घेतो.

बाबा हा शहाळ्यासारखा असतो, बाहेरुन कितीही कठोर असला तरी आतुन मात्र नितळ आणि मधुर पाण्याचा झरा असतो.

कुठलीही मुलगी जर डोळे झाकून एखाद्या पुरुषावर विश्वास ठेवू शकते तर ते फक्त आणि फक्त तिच्या वडिलांवर. लेक जर घराचे सौख्य असेल तर त्या सौख्याचे पावित्र्य तिचे बाबा असते. संस्कार देणारी आई असली तरी ते संस्कार जपणारे बाबा असते.

संयम देणारी जरी आई असली तरी खंबीर बनवणारे बाबा असते. बोट धरुन चालायला शिकवणारे बाबा असते. लेकीच्या हक्कासाठी घोडा बनणाराही बाबाच असते. कामावरुन येताना रोज न चुकता खाऊ आणणाराही बाबाच असते.

पिकनिकसाठी पण पैसे बाबाच देतात. शॉपींग करतांना आईने कमी किंमतीचा ड्रेस काढला तर हळुच लेकीला विचारुन भारी किंमतीचा ड्रेस घेणारे सुध्दा बाबाच असते.

आईने काही काम सांगितले तर तिला दटावणार सुध्दा बाबाच असते. लेकीचे पहिले बोबडे बोल, तिने टाकलेलें पहिले पाऊल तिचे लाडिक वागणे, तिची घरभर पैजणांची छुमछुम हे सगळे पाहुन सुखावतो ते बाबाच असते आणि लेकीला नाजुक कळीसारखा सांभाळणारा आणि प्रसंगी रागे भरणारा पण बाबाच असते.

पण, त्यात त्यांची लेकीसाठी तळमळ असते तिच्यासाठी ही काळजी असते. लेकीच्या प्रत्येक सुखासाठी झटणाराही पण बाबाच! आणि शेवटी मुलगी म्हणजे परक्याचे धन हे कटु सत्य पचवणाराही बांबाच असते.

ज्या लेकीला २०-२५ वर्षे जीवाच्या पलीकडे सांभाळले तिला एका क्षणात परक्याच्या हातात देताना त्यांचे ह्रदय किती दुखत असेल त्याची कल्पनाही करता येणार नाही. आर्त धागे तुटल्याची ती वेदना कोणीच समजु नाही शकणार.

आपल्या लेकीला माहेरचा उंबरठा ओलांडुन सासरी जाताना पाहतांना ढसाढसा रडणाराही बाबाच 'दिल्या घरी सुखी रहा' म्हणताना खचलेलेही बाबाच असते.

असा हा बाबा त्याच्या लेकीचे सर्वस्व असतो आणि फक्त लेकीच तिच्या बाबाचे मन ओळखु शकते. लेकीचा स्वत:पेक्षा जास्त विश्वास तिचा बाबावर असतो.

लग्नानंतर मुलीचे नाव जरी बदलेले तर तिचे बाबा बरोबरचे नाते कधीच बदलत नसते . ती शेवटपर्यंत तिच्यास बाबाची छोटी परीच असते फक्त एक गोंडस परी...

F - Forever with me

A - Affectinate

T - True wellwisher

H - Hero

E - Eager to help

R - Respectable

।।।

## मैत्री

चांगली माणसं व जीवाभावाची मित्र
शंभर, वेळा जरी नाराज झाला
तरी त्याची नाराजी दूर करा
कारण मोती मोत्याची माळ जितक्या वेळा तुटते
तेवढ्या वेळा आपण ती परत ओळतो
माळ तुटली म्हणून आपण मोती फेकून देत नाही ...

**अमोल पाचारे**
एम.ए. भाग-१ (राज्यशास्त्र)

## स्वप्न सुंदरी आई

स्वप्न सुंदरी आई तु माझी
नव्या जगाची आण तुझ्यासाठी आहे
सर्व जगाचे वरदान तुच तर माझे सर्वस्व
तुच तर माझे प्राण
त्यालाच मी मानतो
माझे जिवनदान
मायेचा सागर तू
विश्वचिया घेऊन आली
जादूची छडी देऊन
मनाला भारावून गेली
रागावली किती तरी
वाटणार नाही काही
जगावेगळी आई तू
कुठेच मिळणार नाही
गुरु दक्षिणेस्तव धनसंपदा
तुच जरी माने
स्वप्न सुंदरी आई शब्द हेच पुरे होते.

**कु. मोनिका गोहाड**
बी.कॉम. भाग २

## त्यांची माय व्हावे कुणी ?

खाली तापली धरणी
वर आभाळ भकास
जीव झाला पाखरांचा
पाण्याविन कासावीस

तुझ्या लेकराला जशी
लागे भुक नि तहान
मुक्या जिवांची वेदना
तशी माणसा तू जाण

पाज पाखराला पाणी
ढोरा–वासराला पाणी
त्यांची माय व्हावे कुणी ?
त्यांचा बाप व्हावे कुणी ?

खरा धर्म हाच
तुझ्या अंतरात नांदो माया
खोट्या धर्माच्या नादात
जन्म चालला रे वाया।

**कु. प्रियंका सु. ठाकरे**
बी.ए. भाग–२



## माहेर

माझं माहेर गं बाई
आहे किती तरी छान
गोऱ्यापान भावजया
मला देतात गं मान ॥१॥

माझ्या माहेरात आहे
बंधुराजाचा गं वाडा
मी हट्टाने म्हणते
मला न्यायला गं धाडा ॥२॥

आला दिवाळीचा सण
माझं गुंतलं गं मन
आला माहेरी जाण्याचा
तो आनंदाचा क्षण ॥३॥

माहेरात गेल्यावर
गोतावळा गं जमले
सासुरवाशीण जीवाला थोडा
विसावा मिळ्ते ॥४॥

आम्ही नंदा भावजया
बसून करंज्या भरतो
सुखदु:खाच्या गं गोष्टी
एकमेकीला सांगतो ॥५॥

माहेरातले दिवस
भुर्रकन उडून जातात
पतिराज गं माझे
मला घ्यायला येतात ॥६॥

वेळ पाठवणिची होते
माझे डोळे पाणावते
डोळे पदरानं पुसून
माय निरोप गं देते ॥७॥

**संजय विश्वासराव इंगळे**
एम.ए. भाग–१ (इतिहास)

# अनमोल नाते : मैत्री

कु. शिवानी एल. शिरभाते, बी.कॉम.भाग-३

जीवनाच्या प्रत्येक वळणावर आठवण तुझी येत राहील. एकत्र नसलो तरी स्मृतीच्या सुगंध दरवळत राहील. कितीही दूर असलो तरी मन मात्र तुझ्यात राहील. मैत्रीचे आपले नाते आज तसे उद्या देखील राहील.

मैत्री हे अलग नातं आहे. जे आपण स्वत: निर्माण केलेले असते. यात श्रीमंत, गरीब, जात, धर्म या गोष्टींना मुळीच स्थान नसते. आयुष्यात प्रत्येक वेळी तो आपल्या सोबत असतो. जो आपल्याला आपल्या स्वत: पेक्षाही चांगला ओळखतो असे मित्र-मैत्रिण मिळणे फार कठीण आहे. मात्र मैत्री मिळविणे हे आपल्या हातात असतं.




मुनष्य हा समाजशील प्राणी आहे. तो एकटा राहू शकत नाही. मात्र जर त्याने स्वत:शीच एकटे राहण्याचा निर्णय घेतला. तर तो एकटेपणा त्याला आयुष्यभर सोबत असतो. प्रत्येक व्यक्तीच्या आयुष्यात अशी एखादी घटना घडते. ज्यावेळी आपल्यांला कुणाचा तरी आधार हवा असतो आणि अशावेळी आपल्याला सावरायला साथ द्यायला सल्ला द्यायला जर कोणी येत असेल तर ते मित्र-मैत्रिण असते. जीवन जगणे हे आई वडील शिकवितात. मात्र ते कशा पध्दतीने जगावे हे आपण आपल्या मित्र परिवाराकडून शिकत असतो. महाविद्यालयात केलेली मैत्री तर आयुष्याच्या शेवटच्या क्षणापर्यंत स्मरणात राहते.कारण त्यावेळी आपण बऱ्याच प्रमाणात हुशार, समजदार झालेलो असतो. आपण विचार, कल्पना, त्यांच्यासमोर चांगल्या रितीने मांडू शकतो. मैत्रीमुळे आपल्यामधला आत्मविश्वास वाढतो. आपण ही आयुष्यात काही करु शकतो. हे आपल्या मित्राच्या-मैत्रीणीच्या मार्गदर्शन व प्रोत्साहन मुळेच कळते.

आयुष्यात आपल्याला बरेच जण मिळतात. मात्र असे काहीच असतात ज्यांना आपली काळजी असते असे मित्र-मैत्रिणी मिळणे फार भाग्याचे काम आहे. जीवन जगत असतांना प्रत्येकासमोर अनेक अडचणी , संकटे निर्माण होतात. या संकटांना सामोरे जावे लागते. संकट काळात आपल्या सोबत जे मित्र-मैत्रिणी असतात ते आपल्याला चांगला मार्ग दाखवितात.

माझ्या मते, तर मित्र-मैत्रिण म्हणायचे तरी कुणाला ? ज्यांच्या जवळ आपल्याला मनातले भाव व्यक्त करतांना संकोच वाटत नाही. चुकीची कबुली द्यायला मन भीत नाही. ज्याने आपली प्रशंसा केली तर आपल्याला आवडते. ज्यांच्या जवळ आपण हरलो असे सांगायला आपण मागे पुढ पाहत नाही. ज्याच्या सुखाशी आपण एकरूप होतो तिच मैत्री.

अशा या मैत्रीमध्ये अनेक वेळा गैरसमज ही निर्माण होतात. यामुळे मैत्री तुटण्याची वेळ येते. मात्र हे सगळं आपल्यावर अवलंबून असते. मैत्री हे असं नात आहे. ज्यावर जेवढे लिहिले तेवढे कमी आहे.

म्हणून मला अशा या मैत्रीबद्दल आणि खऱ्या मित्र-मैत्रिणीबद्दल एवढंच लिहावस वाटते,

मैत्रीच माझे जीवन,<br>
मैत्रीच माझा आधार<br>
मैत्री विना नाही हे<br>
आयुष्य संपणार.

।।।

## मैत्रिण

एक तरी मैत्रिण अशी हवी
जरी न बघता पुढे गेलो तरी
मागून आवाज देणारी
आपल्यासाठी हसणारी
वेळ आलीच तर अश्रुही पुसणारी
स्वत:च्या घासातला घास
आठवणीने काढून ठेवणारी
वेळ प्रसंगी आपल्या वेड्या
मित्राची समजूत काढणारी
वाकडं पाऊल पडतांना मात्र
मुस्काटात मारणारी
यशाच्या शिखरांवर
आपली पाठ थोपटणारी
सगळ्याच्या गलक्यात
आपणास सैरभैर शोधणारी
आपल्या आठवणींनं
आपण नसतांना व्याकूळ होणारी
खरंच ! अशी एक तरी जीवा भावाची
'मैत्रिण' हवी जी आपणास मित्र म्हणवणारी.

**कु. प्रिया वि. टाकोडे**
एम.ए. भाग–२ (इतिहास)

## मैत्री

मैत्री म्हटली की
एक सुंदर अस नातं
नात्याची निर्मिती
असती ती
विश्वासाचं पहिलं
नाव असतं ती
मनात दडलेले शब्द
ओळखते ती
नारळाच्या दोरीला
पक्क करण्यासाठी
गरज असते ती पाण्याची
तसेच कोणत्या नात्यालाही
पक्क करायच असेल
तर त्याला मैत्रीत
बुडवावं लागतं
मैत्रीत नसते हेवा खोरी
असते तर फक्त तिची ओढ.

**कु. दिक्षा वासुदेवराव परतेती**
बी.ए. भाग–१

## घार हिंडते आकाशी

घरट्यातल्या पिलांपाशी ती
चित्त कायम ठेवून असते
आकाशभर हिंडत असली तरी
नजर मात्र ठेवून असते

पिल्लं आता मोठी झाली
गगन गवसणी घालाया निघाली
घार घरट्यात राहू लागली
पिलं आकाशी विहरु लागली

नव्या दिशा धुंडाळतांना
नवी प्रलोभनं खुणावू लागली
कळलेचि नाही त्यांना
घरट्यापासून दूर जाऊ लागली

घरट्यांकडे परतण्याची आस
त्यांची कमी होऊ लागली
डोळ्यात प्राण आणून घार
वाट पिलांची पाहू लागली

पंखातले उडण्याचे बळ
आता सरुन गेले होते
एकदा येऊन पिलं 'तिची'
सोय वृध्दाश्रमात करुन आले होते.

**संजय विश्वासराव इंगळे**
एम.ए. भाग–१ (इतिहास)



# भगवान गौतम बुद्ध

कु. समिधा ना. गाडगे, बी.कॉम.भाग-२

*शांततेच्या मार्गाने जिंकले त्यांनी जग*

*सत्य, अहिंसा व समतेचा मिळाला त्यांच्यापासून बोध*

बौध्द धर्माचे संस्थापक गौतम बुध्द यांचे मूळ नाव सिध्दार्थ होय. शाक्य गणराज्याचा राजा शुद्धोधन व त्यांची पत्नी महामाया यांचे पोटी इ.स. पुर्व ५६३ मध्ये लुंबिनी येथे सिध्दार्थचा जन्म झाला.



लहानपनीच आईच्या मृत्यूमुळे मावशी गौतमीने त्यांचा सांभाळ केला. त्यामुळे ते गौतम म्हणून ओळखले जावू लागले. राजपुत्रास आवश्यक असे सर्व शिक्षण देण्यात आले. यशोधरा या सुंदर राजकुमारीशी गौतमाचा विवाह झाला. मात्र ऐश्वर्यात व संसारात त्याचे मन रमले नाही.

गौतमास जीवनातील दु:ख फार भेडसावत होते एके दिवशी नगरात फिरत असताना एक वृद्ध, एक रोगी, प्रेतयात्रा व विरक्त संन्यास दिसला यावरुन गौतमाच्या मनात आले की, वार्धक्य, व्याधी, मरण व शोक ही जीनातील अटळ दु:खे आहेत. मानवी दु:खाचे मूळ शोधून काढण्याची गरज त्यांना वाटू लागली अत्यंत अस्वस्थ अवस्थेत त्यांनी एके रात्री संसाराचा त्याग केला.

गौतमाने ज्ञानप्राप्तीसाठी खुप चिंतन केले तपस्या केली, गया येथे निरंजना नदीच्या काठी बोधी वृक्षाखाली ध्यानस्थ बसले असता वैशाखी पौर्णिमेला त्यांना दिव्य ज्ञानप्राप्ती झाली त्यामुळे त्यांना 'बुद्ध' असे संबोधले जाऊ लागले.

थोडक्यात सांगावयाचे झाल्यास-

*हाती न घेता तलवार। बुध्द राज्य करी जगावर।*

*त्यासी कारण एक प्रचार। प्रभावशाली*

अडीच हजार वर्षापूर्वी जगाचे दु:ख निवारण्यासाठी राज्य त्याग करुन तपस्वी झालेले बुध्द यांनी प्रथम आपल्या पंचभिक्षूना प्रचाराची दिक्षा दिली व स्वत:ही ४५ वर्षे प्रचारार्थ भ्रमण केले. अशोकासारखे क्रुर सम्राटही बौध्द प्रचारानेच बदलून गेले होते. ज्ञानी बुध्दांनी सारनाय येथे पहिले प्रवचन दिले. भगवान गौतम बुध्द चक्रवर्ती न होता जगाला अटळ अशा दु:खातून निर्वाणाकडे नेणारे दिव्य ज्ञानी झाले. दु:खमय जीवनातून निर्वाणाकडे नेण्यासाठी त्यांनी धम्मचक्र प्रवर्तन सुरु केले. धर्माचा अथक प्रसार करत असताना वयाच्या ८० व्या वर्षी कुशीनगर येथे इ.स. पुर्व ४८३ मध्ये भगवान गौतम बुध्दाचे महापरिनिर्वाण झाले.

जगातील असंख्य देश बुद्धधर्मी झाले होते आजही जगातील ४० कोटी लोक बुध्दानुयायी आहेत व भारताच्या ध्वजावर अशोकचक्र विराजीत आहे.

स्वामी विवेकानंद म्हणतात,'बुध्दानेच प्राय: या देशात धर्मप्रचाराची प्रथा सर्वप्रथम सुरु केली व तोंडी संस्कृतऐवजी लोक भाषेतूनच!' याहून प्रचाराचा आदर्श थोर कोणता ?

।।।

# संस्कारक्षम तरुणाई काळाची गरज

कु. श्वेता अरुणराव पुंडकर, बी.ए.भाग-३

एकविसाव्या शतकाच्या स्वागतासाठी सज्ज असलेले जग अनेक भौतिक अंगांनी समृद्ध व समर्थ बनलेले आहे. आंतरराष्ट्रीय पातळीवर 'ज्ञानाचा विस्फोट झालेला आहे.' मानवाला अशक्य असे काही नाही असा सार्थ आत्मविश्वास बाळगता येईल एवढी नेत्रदीपक कामगिरी आधुनिक तंत्रविज्ञानाने करुन दाखविलेली आहे. परंतु तरीही मानवी जीवन मात्र अधिकच असुरक्षित झालेले आहे. एकीकडे मानवाच्या कल्याणासाठी निरनिराळे शोध लावणारे शास्त्रज्ञ कला, शास्त्र, संगीत यामध्ये रममाण होणारे कलाकार, पंडीत, गायक यांचे सुसंस्कृत जग तर दुसरीकडे जाती, धर्म, सत्ता आणि संपत्ती यांच्या विळख्यात अडकून पडलेले परस्परांच्या जीवनावर उठलेले, अविचारी, स्वार्थी व मतलबी जग ! एक प्रतिभावान कवी म्हणतो,

जीवन कुठे आहे ? जगण्यातच हरवलेले आहे।

शहाणपण कुठे गेले ? ज्ञानात हरवले।

ज्ञानतरी कोठे आहे ? ते माहितीत हरवलेले आहे।

आज हीच अवस्था तरुणांची झाली आहे आजच्या मुलांसमोर व्यसने म्हणजे दारु पिणे, सिगारेट , गुटखा खाणे, मटका इत्यादींमुळे मुलांमध्ये एक प्रकारचे कुतूहल निर्माण होते. जर आपण ही त्याची चव घेतली तर ? आणि अशा पध्दतीने मुलेही त्या मार्गाला ओघानेच जाऊ शकतात. त्याच प्रमाणे सततची कटकट, एकच गोष्ट सतत मुलांना ऐकवणे किंवा शुल्लक गोष्ट पकडून मुलांना टॉर्चर करणे म्हणजेच एक प्रकारचा मानसिक आघात होवून त्याचा प्रत्यक्ष परिणाम जाणवायला लागतो. त्यामुळे भूक मंदावणे, प्रकृती ढासळणे, घाबरट होणे व परिणामी अशी मुले, मंद होवून अभ्यासातही फार मागे पडतात. केस गळणे, हातपाय व केस पिकून जाणे व अशा मुलांमध्ये एक प्रकारचा न्यूनगंड निर्माण होऊन ते प्रसंगी व्यसन, आत्महत्या या सारख्या चुकीच्या प्रकारचे कृती करू शकतात. एखाद्या पिंजऱ्यामध्ये पक्षी ठेवून त्याला आणि त्या पिंजऱ्यात कितीही चांगले अन्न ठेवले, तरी किंवा प्रकृती आहे तशीच राहते. तशीच काहीशी परिस्थिती अशा घरातील मुलांची असते. पण त्यांना कितीही तूप, अंडी, मटण व इतर सर्व गोष्टीपेक्षाही मुलांना हवे ते आई वडिलांचे प्रेम, त्यांची माया आपुलकी व चांगल्या गोष्टीसाठी प्रोत्साहन घरातील वातावरण जर नेहमी हसरे , तणावरहीत असेल तर तूप-रोटीच्या आहाराविना सुद्धा मुले गुटगुटीत, चाणाक्ष व अभ्यासातही हुशार निपजतात. त्यांच्यावर दडपण आणून, कटकट करुन पालक त्यांच्यावर अन्याय करतात व त्याचे परिणाम लगेचच जाणवतात.

Good Teacher Makes Good School.

Good School Makes Good Students.

Good Students Makes Good Citizen.

Good Citizen Makes Good Nation.

I I I

## निर्णय

आयुष्यातले निर्णय चुकतात
आणि मग आयुष्यच चुकत जाते
कधी-कधी तर प्रश्न कळत नाहीत
आणि उत्तरही चुकत जाते
सोडवताना वाटते, सुटत गेला गुंता...
पण प्रत्येक वेळी एक नवीन गाठ बनत जाते
दाखवणाऱ्याला वाट माहीत नसते...
चालणाऱ्याचे ध्येय मात्र हरवून जाते....
काही गोष्टी वाटत तितक्या सोप्या नसतात
"अनुभव" म्हणजे काय हे तेव्हाच कळते
जेव्हा एखादी "ठेच" लागल्यावर कळते

**रोशन व्ही. खरबडे**
एम.ए. भाग-२ (इतिहास)

# मुलींचा धिक्कार का?

कु. जयश्री रमेशराव खोडे, बी.ए.भाग-१

आपण पुष्कळ ठिकाणी असे पाहतो की, ज्या घरी मुलगी जन्माला येते, त्या घरच्या लोकांच्या नाकातोंडावर वळ्या पडतात आणि मुलगा जन्माला आला की, त्यांना फार आनंद होतो. तो आनंद व्यक्त करताना ते पेढे वाटतात, बारसे करतात. त्या मुलाला काही समजत सुद्धा नाही तरी पण ते त्याच्यापुढे खेळण्याचे ढिगारे काढून देतात.

पण मुलगी जन्माला आली की, त्या मुलीचे वडील तिचा धड चेहराही सरळपणे पाहत नाही, कुणी त्यांना विचारले की, काहो तुम्हाला मुलगा झाला की मुलगी? मुलगा झाला तर ते सांगतात की मुलगा झाला हो ! हे पेढे मी तुमच्याकडेच घेऊन येणार होतो आणि सोबतच बारस्याची पत्रिकासुध्दा देत होतो. जर त्यांना मुलगी झाली तर ते नाराज उदास चेहरा करतात आणि सांगतात की, मुलगीच झाली पण असं का?

आज नारीत्व आपच्यासाठी शाप ठरतयं मुलगी म्हणून जन्माला आले हा घरच्यांना शाप वाटतोय मुलगा जन्माला आला ही बातमी कळताच त्यांच्या वडीलांना खुपच आनंद होत असतो. कारण ते तेव्हाच त्या मुलाच्या लग्नाचा विचार करायला लागतात आणि म्हणत असतात की, त्याच्या ह्या लोभी विचारांवर पाणी फेरल्या जाते आणि त्यांना तेव्हापासूनच काळजी वाटायला लागते की, आपल्या मुलीच्या लग्नाच्या वेळी नवरा मुलगा चांगला मिळेल की नाही, तो खुपच हुंडा मागेल का? असे त्यांना तिच्या जन्मतःच प्रश्न पडायला लागतात.

आपल्या देशात शंभर टक्के आईवडीलांमध्ये फक्त दहा टक्केच आई वडील असे सापडतात की, त्यांना मुलगा असो वा मुलगी दोन्हीही समान असतात काही पुरुष तर असे आहेत त्यांना मुलगी झाली हे कळले की ते आपल्या पत्नीवर दोष देतात. वास्तविक पाहता ही त्यांची फार मोठी चुक आहे. मुलगा जन्माला येणे अगर मुलगी हे तर त्या स्त्रीच्या हाती नाही.

'मुलापेक्षा मुलगी बरी, प्रकाश देते दोन्ही घरी' या म्हणीचा वापर मात्र तोंडाने म्हणण्यापुरता कुणीही करतो. पण प्रत्यक्षात ते त्या म्हणीप्रमाणे कोणीही वागत नसते. मुलांना सर्वच गोष्टीसाठी स्वातंत्र्य असते आणि मुलींना मात्र काहीच नाही मुलांना त्यांचे आई-वडील मोठे करतात. त्यांच्या ज्या काही आवश्यक गरजा असतात. त्या सर्व पूर्ण करतात आणि मुल मोठे झाले, दोन पैसे कमवायला लागले की ते आई-वडिलांच्या प्रश्नावर उत्तर द्यायला लागतात. आई - वडील म्हातारे झाले की, त्यांच्या मुलांना त्यांचा कंटाळा यायला लागतो. पण असे का? तर त्यांच्याकडून काम होत नाही ते दोन पैसे कमवू शकत नाही काही कमी जास्त झाले तर हे आजचे तरुण मुल आई-वडीलांना साधा पाण्याला पाणी पुढे पाहत नाही इतके हे मुल निर्दयी, कपटी असतात. त्यांच्या समोर आई-वडीलांचीच नाही तर इतर कुणाचीही वाईट दशा झाल्यास त्या पाहू शकत नाही. त्या त्यांना थोडाफार तरी आराम देतात. आज तर मुलगी जन्माला आली नसती तर ही पृथ्वी केव्हाचीच नष्ट झाली असती हे सर्वांनाच माहीत आहे. तरी सुध्दा या लोकांना मुलीचा कंटाळा का येतो? तर त्यांचे कारण एकच आहे आणि ते म्हणजे आपल्या देशात पसरलेली हुंडा पध्दती. ही हुंडा पध्दती एक अशी जखड संस्कृती होवुन बसली की कुणीही तो विचार डोक्यातून काढायला तयारच होत नाही. ही हुंडा पध्दत म्हणजे मुलीच्या आई-वडीलांची जिव घेण्याची पध्दत आहे असे म्हणायला काहीच हरकत नाही आणि या कारणामुळे ज्या घरी मुलगी जन्माला येते त्या घरच्या लोकांच्या नाकातोंडावर वळ्या पडतात आणि म्हणूनच ते मुलींचा आनंदाने स्वीकार करत नाही तर सीधा ते धिक्कार करतात. पण आज काळ बदलला आहे. मुलीच मुलांपेक्षा सरस ठरत आहे. मग ते कोणतेही क्षेत्र असो. म्हणूनच म्हणावेसे वाटते की, मुलींचा धिक्कार नको तर स्वागत करावे!

। । ।

# जीवन गाणे गातच राहावे...

कु. योगिता एस. जेपुलकर, १२ वी (विज्ञान)

जीवन म्हणजे काय ? हा प्रश्न मला वारंवार सतावत असतो व मी या प्रश्नाला वारंवर सामोरे जाण्याच्या प्रयत्नात असते. पण मला आजपर्यंत या प्रश्नाच उत्तर मिळालेल नाही, मी अजूनही निरुत्तरच आहे. मी आतापर्यंत कशासाठी जगतेच? कशी जगतेय? आणि कशी जगेन शेवटपर्यत, या आणि अशा अनेक प्रश्नाची साखळी दिवसेंदिवस घट्टच होत गेली दिवसामागून दिवस जात आहे आणि ते दिवस घडविणे म्हणजे जीवन काय? किंवा आजच्या दिवस गेला म्हणून सुस्कारा सोडायचा, त्याला जीवन म्हणायचे काय? असे अनेक प्रश्न आहे?

या जीवनाची गोष्टीही तशी निराळीच आहे. या जीवनाचे वर्णन कित्येकांनी आपापल्यापरिने केलेले आहे. पण खऱ्या अर्थाने जीवन म्हणजे काय?

जीवन म्हणजे या अफाट सागरात विश्वरुपी सागरावर हेलकावे खाणारी एक छोटीशी नाव. एखादी लाट अशी येते की, ती नाव उलटते मग ढरतो वेफल्याचा निराशेचा प्रचंड गर्जणारी साग पण कधी कधी सगळ्या वादळातून सुटून ही नाव जेव्हा किनाऱ्यावर पोहचते, तेव्हा पुढे असते आतुरतेने दोन्ही हात पसरुन आपली वाट बघणारे समृध्दीचे सागर ! म्हणूनच कवी मंगेश पाडगावकर म्हणतात,

मानवी जीवनाचा प्रवास करतांना विविध समस्या, संकटे, प्रसंग आवर्जुन समोर येतात. त्याची परिणती मग दु:खात होते कधी मातापिता, कधी नातेवाईकांच्या मृत्युचे दु:ख, कधी अपमानाचे दु:ख, तर कधी जीवलग व्यक्तिपासून दूर-दूर जाण्याचा दु:ख, सर्वांचा सारांश म्हणजे जीवनात सर्वच गोष्टी मनासारख्या पूर्ण होत नाही म्हणूनही दु:ख होते.

*या जन्मावर या जगण्यावर शतदा प्रेम करावे*
*जीवन गाणे, गातीच राहावे, झाले गेले विसरुनी जावे,*
*पुढे पुढे चालावे, जीवनगाणे......*

सर्वात दु:ख तर तेव्हा असते जेव्हा आपल्याला कळते की, आपण आपल्या आयुष्यात जे घेतले ते चुकीचे आहे हे प्रत्ययास येते तेव्हा उद्भवणारी निराशा जीवनाला अंधू बनविते. या वेळी जर आपल्याला मनाचा समतोलपणा साधता येत नाही त्यामुळे जीवनात नैराश्य डोकावंत निराशेवर मात करुन जीवनात आनंदाची बाग फुलवन यातच आपल्या जीवनाची खरी कसोटी आहे.

हे जीवन जगताना आपल्या डोक्यावर आपल्या वडीलांचे छत्र नेहमीकरीता असते. आपल्या गुरुजनांनी दिलेली विद्या आपल्या सोबत असते. तसेच आपल्या पाठीवरुन मायेचा हात फिरवणारी 'आई' असते ती आपल्या मैत्रिणीसारखी आपल्याला सोबत देत असते.

जीवन म्हणजे एक प्रकारची रंगभूमीच आहे. आपल्याला जीवनात प्रत्येकाची भूमिका स्वीकारावी लागते. कधी मुलींची, कधी बहीणीची अशा अनेक भूमिका स्वीकाराव्या लागतात पण आपण प्रत्येक भूमिकेतून अगदी मनापासून ओतून द्यावा, कारण माणुस क्षणात आपल्याशी बोलत असतो. तर क्षणात आपल्या पासून नेहमीकरीता दुर निघून जाते. कुणी उरी येत असते, कुणी जात असते.

शेवटच्या क्षणाला मात्र तो सर्वांना रडवून जातो. जगासमोर जीवन जगण्याचा एक सोनेरी पैलू असाही असतो. स्वत: जीवघेण्या वेदना अंर्त:मनात दफन माणसाला जगासमोर हसत ठेवण्याची तारेवरची कसरत करावी लागते ते जीवनातच.

जीवन हे आज आहे तर उद्या नाही म्हणून आपल्या या जीवनाची फुलाचा सुगंध जेवढा वेळ आहे तेवढ्या वेळात तो लुटायचा स्वत:ही हसायच, जगायचं आणि दुसऱ्यालाही हसवायचं, जगवायचं.

*जीवनात दु:ख आले तर*
*नेहमी सुखाची आशा ठेवावी*
*जीवनात काटे आले तर*
*नेहमी फुलाची आशा ठेवावी*
*जीवनात अपयश आले तर*
*नेहमी यशाची आशा ठेवावी*
*जीवन गरिबीचे असेल तर*
*नेहमी संघर्ष करण्याची जिद्द ठेवावी.*

या सर्वांवरुन जीवन ही एक परीक्षाच आहे नाही का ? यात कुणी

पास होते, कुणी नापास आणि कुणी तर पास होवून सुध्दा नापास होतो. या परिक्षेत मात्र एटीकेटी नाही. या अशा जीवनासाठी मी तुम्हा सर्वांना एकच गान गुणगुणायला लावील.

जिंदगी एक सफर है सुहाना ।
यहाँ कल क्या हो किसने जाना ।।
Life is to go
Fast or slow
But end is to go
Saw good to cut so
Live is to die
Die is to born
Again and Again.

## मैत्री

मैत्री मध्ये जाती धर्म पाहत नसते ।
ते होवून जात असते ।।
जसे दोन प्रेमी प्रेम करतांना,
जाती, धर्म पाहत नसतात ।।
मैत्री ही दोन रक्तांनी न
बनलेली नाती असते।।
पण दोन ह्रदयाने जोडलेली असते ।।
पण एक असते
जेव्हा दोन प्रेमी प्रेम करतात तेव्हा
आई-बाबाचे मन दुखवित असते।।
पण मैत्रीच्या नात्यात असे नसते,
या नात्यात कोणाचे मन दुखावत नसते ।।
मैत्रीमध्ये फक्त प्रेमाचे दोन
शब्द पाहिजे असते ।।
असे मैत्रीचे नाते असते.

**कु. रेणुका सु. देशमुख**
बी.कॉम. भाग २

## जीवन हे कस असते

जीवन हे कस असतं
ते जगल्याशिवाय कळत नसतं
मनातल्या -मनात रडायच असतं
चेहऱ्यावर मात्र दाखवायच नसतं

जीवनामध्ये सुख-दुःख येत असतं
ते हसत-खेळत जगाय्रच असतं
मागचे सारे आठवुन रडायच नसतं
पण स्वतःच्या हिमतीवर जगायच असतं

ठेच लागली म्हणून थांबायच नसतं
धैर्याने त्याच वाटेवर चालायच असतं
कर्तृत्वाने माणूस घडत असतं
पण भविष्याचा विचार करुन जगायच असतं

भविष्यात चांगली स्वप्न पाहायची असतं
पण पूर्ण केल्याशिवाय रहायच नसतं
पूर्ण झाल्यावर समाधान वाटतं
त्यातुनच जीवन हे जगायच असत.

**अश्विन बा. बोरवार**
बी.ए. भाग ३

## सुविचार

१) भाग्य म्हणजे जिंकावाची बक्षिसे ! त्याचा रस्ता म्हणजे धैर्य ! आणि संधी म्हणजे रस्त्याच्या बाजुला सावलीत जे दडलेले असते ते !

२) आपल्या मागे आपल्यासंबंधी कोण काय बोलतो, हे जर प्रत्येकाला कळले तर जगात कोणीच कोणाशी बोलणार नाही.

३) पैसा खर्च न करता इतरांच्या आनंदात भर टाकण्याचे एक स्वस्त, सोपे व सुलभ साधन आपल्या प्रत्येकाजवळ आहे, ते म्हणजे स्तुती.

**-कु. स्नेहा सु. बुरंगे**
बी.कॉम. भाग-१

# मला मुलगी पसंत आहे

**रोशन राजपाल धुर्वे,** एम.ए. भाग-१ (इतिहास)

त्या दोघांचा ब्रेक अप झाला होता. त्याला नोकरी लागायला अजून वेळ होती.पण ती थांबायला तयार नव्हती. शेवटी गेली ती त्याला सोडून आणि तो तीला सतत आठवून रडत राहायचा. प्रेम, विश्वास, भावना यावरचा विश्वास उडून गेला होता. त्याच्या त्याला आता नोकरी लागली होती. आता त्या गोष्टीला ३ वर्ष झाली होती.

पण आता त्याने लग्न न करण्याचा निर्णय घेतला होता. घरचे तर नेहमी म्हणायचे पण हा नेहमी टाळाटाळ करायचा. पण एकदा त्याची आई त्याला न विचारताच मुलीकडच्यांना बोलावते तो येताच ऑफीस मधून सगळे बसलेच असतात. सगळे समोर असल्यामुळे टाळाटाळ न करता गप्प बसतो. त्याची तर मुलीकडे पाहायची तर इच्छा नसते. पण घरचे सर्व लग्नासाठी खुप आग्रह करतात. त्या मुलीसोबत बोलण्यासाठी बाहेर घेऊन जाण्याचा आग्रह करतात. दुसऱ्या दिवशी भेट ठरते. त्या दिवशी कसा तरी तिला नकार द्यायचा हाच विचार तो रात्रभर करत असतो. दुसऱ्या दिवशी ते भेटतात. संध्याकाळचे ४ वाजले असतात. तेवढ्यात त्याला ऑफीस मधून फोन येतो. तसाही त्याला तिला नकार द्यायचा असतो. बोलायची पण इच्छा नसते पण बोलायचे म्हणून तो बोलतो . तो तिला सांगतो की मला ऑफीस मध्ये थोडा वेळ काम आहे तुमची हरकत नसेल तर आपण जाऊया का....? ती म्हणते, ठिक आहे. दोघेही टॅक्सीत बसतात. पूर्ण वेळ शांतच कोणीच काही बोलत नाही. ऑफीस येत ते बिल्डींगपाशी येतात. तो तिला म्हणतो वर चल पण म्हणते उगीच ऑफीस मधील गैरसमज करतील मी थांबते तू ये जावून आणि तो ऑफीस मध्ये जातो, काम करत असतो. त्याचे साहेब त्याला बोलावतात आणि त्याला प्रमोशनचं लेटर देतात व म्हणतात की, तुला बाहेर देशात जाण्याची संधी आहे. तो खुपच खुश होतो. पण त्याचे साहेब बोलतात की, तुला आताच्या आता मला एक प्रेजेंटेशन करुन दाखवावे लागेल. मला लवकरात लवकर त्याला सेंड करायचा आहे. तो तयार होतो आणि लागतो कामाला. ती खाली वाट बघत आहे हे तो विसरुन जातो. ६ वाजतात नंतर ७,८ व ८.३० वाजतात फाईनली त्याचे प्रेजेंटेशन पूर्ण होतो. तो जातो साहेबांना द्यायला ते पण खुश होतात. साहेब म्हणतात, आता घरी जा आणि घरच्यांना पण आनंदाची बातमी दे. ते ही वाट बघत असतील ना. त्याला अचानक आठवत तो तिला खालीच सोडून आला होता आणि ऑफीसच्या प्रेजेंटेशनमुळे विरुनच गेला होता. ती गेली असेल निघून असं त्याच्या मनाला वाटतं. पण जर थांबली असेल तर... तो लगेच निघतो तेथून मन खुपच अस्वस्थ असतं. तो गेट बाहेर येतो पाहतो तर काय ती असते एका आडोशाला उभी. त्याला काय बोलाव सुचत नाही तो सॉरी गं मी विसरुनच गेलो होतो. मला वाटल की, तु गेली असणार. तू गेली का नाहीस? मला फोन तर करायचा ना ती अरे तूच तर बोलला की, थोडा वेळ काम आहे म्हणून मला वाटलं येशील लगेच आणि फोन करायला तुझा नंबर आहे का माझ्याकडे मनात आला तुझ्या घरी तुझ्या बाबांना विचारावं नंबर पण मग ते तुलाच ओरडले असते. मग माझ्या घरच्यांना विचारलं असतं तर त्यांच्या पण मनात तुझ्याविषयी गैरसमज झाला असता. वरती जावसं वाटल पण ऑफीस मध्ये तुला डिस्टर्ब होईल म्हणून नाही आले आणि तू बोलला होतास ना येतो म्हणून बसले वाट ब घत. तिला काय बोलावं समजत नव्हतं शेवटी तो म्हणाला मला आवडली तू. ती म्हणाली, अरे पण असं अचानक आपण अजून काही बोललो पण नाही. तू ओळखतही नाही मला अजून नीट. लगेच असं ठरवायचं कारण...? तो म्हणाला, हो एक कारण आहे पण मला एक सांगायच आहे तुला. मी एका मुलीवर खुप प्रेम करत होतो. ती ही माझ्यावर प्रेम करत होती पण लग्नासाठी तयार नव्हती तिला माझ्या प्रेमा सोबत माझे पैसे, नाव, समृध्दी हे सगळ हव होतं. पण तेव्हा माझ्याकडे काहीच नव्हतं. मी तिच्याकडून थोडा वेळ मागितला पण

तो ही ती द्यायला तयार नव्हती. शेवटी ती मला सोडून गेली. त्यानंतर मला प्रेम आणि विश्वास सर्व निरर्थक वाटू लागलं होतं. म्हणून मी नेहमी लग्नाला टाळाटाळ करायचो. तुला ही नकार द्यायचं ठरवलं होतं आधीच. पण आज जे झालं त्याने माझे आता डोळे उघडले. जिच्यावर मी इतका प्रेम करत होतो. तीने मला कधी वेळ दिलाच नाही आणि आज माझ्या शब्दावर तू इतका वेळ थांबलिस आणि मी विसरलो होतो हे ऐकुन सुध्दा तू मला समजून घेतलस. कदाचित प्रेम होण्याला अजून वेळ असेल आपल्यात पण मला तुझा स्वभाव आवडला ते पुरेसे आहे. जर तुलाही मी आवडलो असेल तर सांग? तिची लाजेने नजर खाली होते. त्याला तिचं उत्तर समजलं आणि आईला फोन करतो व म्हणतो की, मला मुलगी पसंत आहे.

।।।

## पाऊस

एकदा पावसाने तिला विचारले
साधारण कधी येऊ ?
तर तू म्हणालीस
इच्छा नसताना
पावसात तू जितकी चिंब भिजायचीस
तितकीच माझ्याकडे येताना कोरडी
मग तूच मला गोष्ट सांगितलीस
आपण दोघं ज्या कागदी नावेवर बसलो होतो
ती उलटल्याची
नंतर पावसाचे आणि तुझे वैर झाले.
तो वेगळाच टापूत बरसू लागला
आणि तू वेगळ्या
मी मधल्या मध्ये कोरड्या नदीसारखा
आतून झिरपू लागलो
नंतर नंतर
पाऊस आलच नाही
कधी तरी येईन एवढंच म्हणाला आणि
बी रुजल्यानतरचं वाट पाहणं
आपण दोघांनी स्विकारलं समजूतदारपणे.

**कु. गायत्री ग. खोडे**
एम.ए. भाग–२ (इतिहास)

## पोशिंदा

तुम्ही ओळखता का याला ?
कापुस, तुरीने ज्याला जखमी केला
वाट पाहतांना कर्ज मुक्तीची
ज्यांला मोतीबिंदू झाला
पाऊस पाहताना आकाशी
सूर्य देवाने वार केला
न्याय मागायला गेला
आणि वादविवादाचा विषय झाला
विहीरी झाल्या ज्याला कबूल
शोधताना तोच गेला बुडून
शेवटी काय,
त्याला सुचली युक्ती
त्याने केली वेदनापासून मुक्ती नंतर
आता देऊन काय उपयोग त्याला
जगाचा पोशिंदा तर उपाशीच गेला
तुम्ही म्हणता आत्महत्या केल्या
पण हा तर खुनच झाला
विचार करा जरा
तुम्ही ओळखता का याला ?

**कु. दिशा दिपकराव गाडे**
बी.ए. भाग–१



# शोधण्याच्या प्रयत्नात असलेली व्यक्ती

ज्या व्यक्तीने लोकांमध्ये प्रतिष्ठा मिळवलेली आहे आणि जी आपल्या प्रतिष्ठेला कमीपणा येऊ देत नाही. जी लोकांच्या खोट्या अफवांमुळे हार मानत नाही. त्यांच्याकडे दुर्लक्ष करते तीच कदाचित मी शोध घेतलेली व्यक्ती असू शकते.

जी व्यक्ती यश मिळाल्यावर प्रशंसेची व अपयश मिळाल्यावर सहानुभूतीची अपेक्षा करत नाही. जे प्रशंसेने धुंद होत नाही आणि अपयशासंबंधी सांगत नाही तीच कदाचित मी शोधत असलेली व्यक्ती असू शकते.

जी व्यक्ती इतरांनी दिलेला सल्ला आनंदाने न चिडता अनुषंगाने स्विकारते आणि पुर्नपरिक्षण करते. हटवादी न करण्याचे आश्वासन देते आणि नाराजी अथवा आहारस व्यक्त न करता लोकांना भेटते. तीच कदाचित मी शोधत असलेली व्यक्ती असू शकते.

ज्या व्यक्तिकडे समर्थ जीवन जगण्याची आणि मृत्यूला तोंड देण्याची इच्छाशक्ती आहे आणि जी दूरवरच्या लोकांना दीपस्तंभातील प्रकाशाप्रमाणे मार्गदर्शन करते. जी कुचेष्टाकडे दुर्लक्ष करुन सद्‌गुण व यश हातात हात घेऊन नांदू शकत नाही. हे विधान खोटे असल्याचे सिद्ध करुन दाखवते. तीच व्यक्ती कदाचित मी शोधत असलेली असू शकते.

**–कु. भावना लक्ष्मणराव खुरपडे**
बी.ए. भाग–१

## Life is outdated

Out dated झालंय आयुष्य
स्वप्न ही download होत नाही
संवेदनाचा virus झाला
दुःख send करता येत नाही
आठ्वणी झाल्या currept
अन् delete झाल्या file सारखे
अन घर आता शांत असत
Range नसलेल्या mobile सारखे
Hang झालेय pc सारख
मनाची स्थिती वाईट
कुठेच नाही website
एकविसाव्या शतकातली
पिढी भलतीच cute
contact list वाढत गेली
संवाद झाले mute

**कु. काजल रवि उके**
एम.ए. भाग–२ (इतिहास)

## चार ओळी आठवणीच्या

यार माझ्या यार मि सांगतो प्रेमाचा
झरा आपले वर्षे संपून जाई तो
वर्षा भराचा प्रेमासाठी कळत
न कळत जी आपली मैत्री
जमली ती अशीच कायम राहो ?
गेले ते दिवस गेल्या त्या आठवणी
पुन्हा आठवणी करु नका सरते शेवटी
सर्वांना आपआपल्या मुक्कामाला
जावे लागतात. कोणी सुखाने
जगतात तर कोणी दुःखाने
आता खुप सारे मित्र
मिळतील. खुप आनंद मजा करा
पण पुन्हा आठवणी कयन नकां ?
"जगावसे वाटे पुन्हा मला ते दिवस
भाऊ देरे देरे माझे पुन्हा एकदा कॉलेज ?"

**विजय साऊत**
बी.ए. भाग २

# भारतीय महाविद्यालय, मोर्शी



महाराष्ट्र राज्य उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा वर्ग १२ वा फेब्रुवारी/मार्च २०१७ मध्ये
भारतीय महाविद्यालय, मोर्शी येथील वाणिज्य विभागातील तालुक्यातून
प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक प्राप्त विद्यार्थ्यांचा सत्कार करताना
प्राचार्य जी.एस.मेश्राम व उपस्थित प्राध्यापक

## महाराष्ट्र राज्य उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा (वर्ग १२ वा) फेब्रुवारी/मार्च २०१७ मध्ये वाणिज्य विभागातून मोर्शी तालुक्यातून प्रथम आलेले तीन विद्यार्थी



**वैभव डोईफोडे**
रोल नं.१३६१९४
प्राप्त गुण ५७० (८७.६९%)
(तालुक्यातून प्रथम)



**कु. सीमा अंगणानी**
रोल नं.१३६२२६
प्राप्त गुण ५५२ (८४.९२%)
(तालुक्यातून द्वितीय)



**अक्षय गोंढे**
रोल नं.१३६३१७
प्राप्त गुण ५५० (८४.६१%)
(तालुक्यातून तृतीय)

# महाविद्यालयीन छात्रसंघ प्रतिनिधी

## (शैक्षणिक सत्र : २०१७-१८)


**कु. पुजा प्र. राऊत**
छात्रसंघ सचिव
एम.ए. भाग-२ (इतिहास)


**गणेश रा. राऊत**
सांस्कृतिक प्रतिनिधी
एम.कॉम. भाग-२


**कु. नेहा प्र. पवार**
रा.से.यो. प्रतिनिधी
बी.ए. भाग-२


**पियुष पी. खाडे**
क्रीडा प्रतिनिधी
एम.कॉम. भाग-१


**कु. श्वेता पुंडकर**
महिला प्रतिनिधी
बी.ए. भाग-३


**कु. शिवानी शिरभाते**
महिला प्रतिनिधी
बी.कॉम. भाग-३


**रविंद्र वाडीवे**
वर्ग प्रतिनिधी
एम.ए. भाग-२ (राज्यशास्त्र)


**कु. पुजा तुळे**
वर्ग प्रतिनिधी
एम.ए. भाग-१ (राज्यशास्त्र)


**कु. पल्लवी मेहरे**
वर्ग प्रतिनिधी
एम.ए. भाग-१ (इतिहास)


**विजय वोरवार**
वर्ग प्रतिनिधी
बी.कॉम. भाग-३


**कु. निकीता चौधरी**
वर्ग प्रतिनिधी
बी.कॉम. भाग-२


**कु. भावना खुरपडे**
वर्ग प्रतिनिधी
बी.ए.भाग-१

### * वर्ग प्रतिनिधी *

प्रशांत राऊत (बी.ए.भाग-२)
वैभव डोईफोडे (बी.कॉम.भाग-१)
गौरव घाटोळ (बी.एस्सी भाग-२)
कु. पुजा कळसकर (एम.कॉम.भाग-२)
कु. दिपीका कुरवाडे (बी.ए.भाग-३)
कु. पायल मिश्रा (बी.एस्सी भाग-१)
कु. काजल वाडेकर (एम.कॉम.भाग-१)

### * कनिष्ठ महाविद्यालयीन वर्ग प्रतिनिधी *

कु. प्रगती राऊत
कु. अश्विनी उईके
कु. मयुरी तायडे
कु. दुर्गेश्वरी देशपांडे
कु. योगिता जपुलकर
मोहित गणोरकर
ऋषिकेश कनेरकर
कु. गौरी इखे

# हिन्दी विभाग

# जिंदगी खुबसूरत है, बस जिना आना चाहिए...

कु.श्रृतिका म. वासनकर, बी.ए.भाग-२

हम सबको एक अच्छी जिंदगी मिली है, इस जिंदगी को हर कोई अपने-अपने अंदाज से जिता है। जिंदगी मे हर तरह को सुख दुःख आता ही रहता है। इस सुख, दुःख से राह निकालते हुए हमे अपनी जिंदगी जिनी चाहिए।

कोई लोक अपने पर आने वाले सुख दुःख को अपनो के साथ बाटते है वही लोग जिंदगी मे बहुत आगे जाते है। वो लोग जिंदगी में कभी भी कितनी भी परेशानियाँ आये तो भी पिछे नही हटते। उन परेशानियों को डटकर सामना करते है। अपने जिंदगी मे आनेवाले मुसीबतो का हल आसानी से निकाल लेते है। ऐसे लोगो को जिंदगी जिने का सही मतलब समझ चुका है। ऐसे लोग जिंदगी मे कभी परेशान नही होते। जिंदगी किस तरह जिनी चाहिए इसके बारे में वो लोग औरों को भी सलाह देते रहते है।

वो कहते है न एक अच्छे इन्सान की संगत उसके साथ रहने वालों को भी अच्छा बना देती है। जिस इंसान के अंदर अच्छी खुबिया है। वो हमेशा अच्छाई के मार्ग पर चलता है। कोई व्यक्ती हमें अच्छी बाते बता रहा हो तो वो हमें सुननी चाहिए। हम जितना अच्छा सिखेंगे उतना अपना विकास होगा ।

जो लोग अपने जिद पर अडे रहते है उन्हे दुसरो की जिंदगी से कोई भी वास्ता नही रहता। ये लोग जिंदगी मे उदास रहते है। उनके अंदर चिडचिडापण, घमंड बहुत रहता है। वो लोग कभी भी दुसरो के सुख दुःख मे कभी भी शामील नही होते। ये लोग दुसरो की बाते सुनना पसंद नही करते। फिर उनके जिंदगी मे आनेवाली मुसीबत उन्हे कमजोर बना देती है। फिर वह लोग जिंदगी से पिछे हट जाते है। वो जिंदगी में कुछ भी हासिल नही कर पाते। ऐसे लोगो के अंदर आत्मविश्वास नही होता है। आत्मविश्वास न होने के कारण वो जिंदगी मे पिछे रह जाते है। ऐसे लोगो को जिंदगी का सही मतलब अभी तक समझ ही नही आया।

अपनी जिंदगी सक्सेसफुल करने के लिए उन्हें जिंदगी का सही मतलब समझना चाहिए। उन्हे अपने अंदर की खुबिया, कमजोरीयां को पहचानना चाहिए । तभी अपनी जिंदगी सक्सेसफुल होती है।

जिंदगी इस तरह जियों की अपने जिंदगी का उपयोग औरों को भी होना चाहिए। अपनी जिंदगी बिते वक्त दुसरो को परेशानियाँ नही आनी चाहिए। वो ही लोग जिंदगी में आगे बढते। हम आगे बढते समय अपने साथ औरों को भी साथ लेके चलना चाहिए।

हमे यह सुंदर दुनिया दिखाने वाले अपने माता-पिता को आदर और सन्मान करना चाहिए। हम बडे होने के बाद उनकी सारी जिम्मेदारीयों अपने सिर लेनी चाहीए। और उन्हे किसी भी तरह की तकलिफ न होते हुए उनकी देखभाल करनी चाहिए।

इन्सान के जिंदगी की सुरुवात जन्म से होती है और जिंदगी का अंत मृत्यु से होता है। इस जन्म और मृत्यु के दरम्यान जो अंतर होता है उसे जिंदगी कहते है। इस जिंदगी में हमने क्या हासिल किया और क्या नही इसका परिक्षण हमें खुद ही करना चाहिए।

जिंदगी में कुछ लोग ऐसे काम कर जाते है की वह मरने के बाद भी हमें याद आते है। जिंदगी मे हमेशा अच्छाई के मार्ग पर चलना चाहिए।

जिंदगी के बारे में मै आपको कुछ पक्तीयाँ इस तरह,

*"जिंदगी हसने-गाने के लिए है, पल दो पल*
*इसे खोना नही, खो के रोना नही*
*जिंदगी हसने- गाने के लिए है।"*

।।।

## लड़की

पीहर मे जैसे बहती नदी आज
ससुराल की नीर बन गई
रोज मजे से पैसे खर्च करती लड़की
आज साग-सब्जी का
भाव करना सीख गई....
कल तक बाईक के पिछे बैठनेवाली लड़की
आज फुल स्पीड स्कुटी चलाना सीख गई...
कल तक तो तीन वक्त का खाना
बनाती थी लडकी
आज पढ़ना-लिखना सीख गई...
कल तक तो काम का बहना बनानेवाली लड़की
आज सासुमाँ का काम करना सीख गई....
कल तक भाई- बहन के साथ
झगडा करती लडकी,
आज ननंद का मान
करना सीख गई......
कल तक तो भाभी के
साथ मजाक करती लडकी,
आज जेठानी का आदर
करना सीख गई....
कल तक पिता के आँख का पाणी थी लड़की
आज ससुराल का मान बन गई...
फिर लोग कहते है की,
बेटी ससुराल जाना सीख गई....
यह बलिदान केवल
लड़की ही कर सकती है
इसलिये हमेशा लडकी की झोली
वात्सल्य से भरी रखना....
बात नीकली है तो दूर
तर जानी चाहिऐ....
क्योकी लडकीयों को इस समाज मे
सन्मान मिलना चाहिऐ...

**कु. मयुरी मोहनराव आगरकर**
बी.ए. भाग-३

## वो लम्हें...

मकान चाहे कचे थे
लेकिन रिश्ते सारे सचे थे
चारपाई पर बैठते थे
पास पास रहते थे

सोफे और डबल बेड आ गये
दुरिया हमारी बढा गये
छतो पर अब ना सोते है
बात बतंगड अब ना होती है

आँगन मे पेड़ थे
सांझे सुख दुःख थे
दरवाजा खुला रहता था
राही भी आ बैठता था
कौवे भी काँवते थे
मेहमान आते जाते थे

एक सायकल ही पास थी
फीर भी मेल झोल था
रिश्ते निभाते ये
रुढते मनाते थे
पैसा चाहे कम था
माथे पे ना गम था
मकान चाहे कचे थे
रिश्ते सारे सचे थे...

अब शायद कुछ पा लिया है
पर लगता है की बहुत कुछ गवा दिया
जीवन की भाग दौड में

क्यों वक्त के साथ रंगत खो जाती है
हँसती खेलती जिन्दगी भी आम हो जाती है
एक सबेरा था जब हंस कर उठते थे हम
और कई बार बिना मुस्काराये ही श्याम हो जाती है..।।

कितने दुर निकल गये
रिश्तो को निभाते निभाते
खुद को खो दिया हमने
अपनो को पाते पाते

**कु. वैष्णवी अशोकराव शिरभाते**
बी.ए. भाग-३

## बेटी हूँ मैं

क्या हूँ मै, क्या हूँ मै, यही सवाल करती हूँ मै।
लड़की हो, लाचार, मजबूर, बेचारी हो, यही जवाब सुनती हूँ मै।
बडी हुई जब समाज की रस्मों को पहचाना।
अपने ही सवाल का जवाब , तब मैंने खुद में ही पाया।
लाचार नही, मजबुर नही मै एक धधकती चिंगारी हूँ।
छेडो मत जल जाओंगे दुर्गा और काली हूँ मै।
परिवार का सम्मान, माँ-बाप का अभिमान हूँ मै।
औरत के सब रुपो में सबसे प्यारा रुप हूँ मै।
जिसको माँ ने बडे प्यार से है पाला।
उस माँ की बेटी हूँ मै, उस माँ की बेटी हूँ मै।
सृष्टी की उत्पत्ती का प्रारंभिक बीज हूँ मै।
नये नये रिश्तों को बनाने वाली रीत हूँ मै।
रिश्तों को प्यार में बांधने वाली डोर हूँ मै।
जिसको हर मुश्किल में संभाला ।
उस पिता की बेटी हूँ मै, उस पिता की बेटी हूँ मै।

**कु. आशा गिरारे**
बी.ए. भाग-२

## जिंदगी

कुछ सालो बाद, ये पल बहुत याद आयेगें
जब हम सब दोस्त अपनी-अपनी
मंजील पर पहुच जायेंगे
अकेले जब भी होंगे साथ गुजरे
हुये लम्हें याद आयेगें
पैसे तो बहुत होंगे,
पर खर्च करनें के लिये लम्हे कम पड जायेंगे
एक कप चाय याद दोस्तों की दिलायेगी
यहि सोचते सोचते हमारी आखें नम हो जायेंगी
इसलिए यारो की 'जिंदगी' के
दो पल जी भर के जीलो, क्योंकी
जिंदगी अपना इतिहास
फिरसे नहि दौरायेगी .... !

**कु. वृषाली रामभाऊजी वानखडे**
बी.ए. भाग-१

## अन्नदाता

मिट्टी से सोना उपजाता कहलाता जो अन्न का दाता ।
धूप, ठंड हो चाहे बारीश जिसको जो कोई रोक न पाता।
बादल जिसकी किस्मत लिखता,
आढनिया है जिसको ठगता
फिर भी सबका पेट वो भरता
कही धूप नित मेहनत करता ॥१॥
चाहे बरसात रवि अनल
चाहे जलना हो भूतल
टप, टप बहता रहे पसिना
पर चलता वह अविरत ॥२॥
चाहे हो अच्छी कभी फसल
उसको लाभ ना मिलता
पर ना जाने किस आशा में,
हर रोज धूप मे जलना ॥३॥
कभी बाढ़ और कभी अकाल
आते है उसे सताने
पर किस्मत का मारा वह
बस मेहनत करना जाने ॥४॥
कर्ज में पैदा होना है,
और कर्ज में ही मर जाता है
माँ धरती का सच्चा बेटा
कितने दुःख सह जाता है ॥५॥
सबको जीवन देने वाले
के घर में भी अन्न के लाले,
यह विडंबना कैसी है,
अब तू ही बता, ओ ऊपर वाले
क्या ये दर्द किसान के नसीब में ही लिखे होते है ॥६॥

**कु. तृप्ती चौधरी**
बी.ए. भाग-२

## शायरी

सिर्फ वो हि सपने सच नही होते
वो सोते वक्त देखे जाते है
सपने वो भी सच होते है
जिनके लिए आप सोना हि छोड देते है।
जिंदगी जीना आसान नही होता
बिना संघर्ष के कोई महान नही होता
जब तक न पडे हथोडे की चोट
पत्थर भी भगवान नही होता
ओढेंगे नकाब जो, उतारा करेंगे हम।
सच और झुठ की, परते उधेडा करेंगे हम।
यु तो कई जिंदा है, पर मुर्दो से कम नही
सोई हुई जिंदगी को, होश मे लाया करेंगे हम।
सितारो पर एक दिन आपका मुकाम होगा।
हर राह पर सबका सलाम होगा
हर मुश्किल का सामना हिम्मत से करना
दुआ करते है की एक दिन वक्त भी
आपका गुलाम होगा।

**कु. समिधा ना. गाडगे**
बी.कॉम. भाग-२

## दोस्ती

दोस्ती है आनमोल रत्न
नही तोल सकता जिसे कोई घन,
सच्ची दोस्ती जिसके पास है
उसके पास दौलत की भरमार है
न ही जीत न ही कोई हार है
दोस्त के दिल में तो बस प्यार ही प्यार है।।
भटके जब भी दोस्त संसार के मोहजाल मे,
खीच लाता है सच्चा दोस्त उसे अच्छाई के राह में
छोड देता है जग सारा जब मुश्किल भरी राह में
सच्चा दोस्त साथ देता है तब जिंदगी के राह में
बने चाहे दुश्मन क्यों न जमाना सारा,
सच्चा दोस्त साथ देता है सदा हमारा,
दोस्त के लिए कुर्बान होता है जीवन सारा,
हर मुश्किल में बनता है वो सहारा ।।
सच्ची दोस्ती को वक्त परखता हर बार है
वक्त की हर परिक्षा से हसते हुए पास करना
ही दोस्ती की पहचान है,
दुनिया की किसी शोहरत की न जिसे दरकार है
सच्चा दोस्त रखने वाला संसार में सबसे धनवान है।

**कु. आशा गिरारे**
बी.ए. भाग-२

## तु खुदको बदल

दरिया की कसम फौजो की कसम
ये ताना बाना बदलेगा
तु खुदको बदल
तब ही तो जमाना बदलेगा
तु चुप रहकर तो सहती रही
तो क्या ये जमाना बदला है
तु बोलेगी मूंह खोलेगी
तब ही तो जमाना बदलेगा
दस्तुर पुराने सदीयों के
ये आये काहाँ से क्यो आये
कुछ तो सोचे कुछ तो समझो
या क्यो तुमने अपनाये
ये पर्दा तुम्हारा कैसा है।
क्यो ये मजहब का हिस्सा है
कैसा ये महजब किसका पर्दा
ये सब मर्दा का किस्सा है
आवाज उण कदमो को मिला
रफतार जरा कुछ और बढा
मशरिफ से उण से उठो
फिर सारा जमाना बदलेगा

**कु. अपूर्वा राजेश फुसे**
बी.ए. भाग-२

# क्षणचित्रे : भारतीय महाविद्यालय, मोर्शी



रा.से.यो. विभागाद्वारे
आयोजित रक्तदान शिबीर प्रसंगी
प्राचार्य जी.एस. मेश्राम, प्राध्यापक वृंद
व विद्यार्थी.
(दि.१४-८-२०१८)



महाविद्यालयात तालुकास्तरीय कबड्डी स्पर्धेच्या
उद्घाटन प्रसंगी मार्गदर्शन करताना
श्री.बी.एल. तळवी (एस.डी.पी.ओ.,मोर्शी)
व उपस्थित प्राचार्य जी.एस.मेश्राम,
मा. श्री.नितीनभाऊ उमाळे, श्री. नवीनकुमार पेठे
व इतर मान्यवर



महात्मा गांधी स्मृती दिनानिमित्त
गांधी स्मारकाची स्वच्छता करण्यात आली व
हारार्पण करण्यात आले याप्रसंगी उपस्थित
प्राध्यापक.
(दि.३०-१-२०१८)



'स्वच्छता हीच सेवा'
रॅली प्रसंगी डॉ. संदीप राऊत
व विद्यार्थी

# क्षणचित्रे : भारतीय महाविद्यालय, मोर्शी



श्री संत गाडगे बाबा जयंती कार्यक्रमाप्रसंगी
उपस्थित मा. प्राचार्य जी.एस.मेश्राम
व प्राध्यापक वृंद.
(दि.२३-२-२०१८)



क्रांती दिन प्रसंगी उपस्थित
मा.श्री. राजाभाऊ महाजन,
प्राचार्य जी.एस.मेश्राम व प्राध्यापक वृंद.
(दि.९-८-२०१७)



प्लॅस्टिक निर्मूलन रॅलीप्रसंगी
डॉ. संदीप राऊत व विद्यार्थी




रा.से.यो. वर्धापन दिनानिमित्त
मार्गदर्शन करताना
मा.श्री.शेखर भोयर (अमरावती)
(दि.२४-९-२०१७)

# इंग्रजी विभाग

# Eye Donation....

Ku. Ashvini Gunvantrao Thete, B.A. III

Friends all of you know that our body is mortal. Nothing remains after death. Only one part of our body can remain immortal. That part is 'eyes' Yes how can you make your eyes immortal ? you have to write a wish that you want to donate your eyes after death to someone who can not see. My donating eyes you bring a light of joy in some blind man's life. The receipant of your eyes will see this wonderful, beautiful world till his death. He too would donated those eyes to some blind person.

In this way your eyes will become immortal. They will bless many sight less person will the joy of seeing this wonderful world.



So come forward, donate eye after death.

# Stress

Stress or accent is the emphasis that we give to certain syllables with in a word. It is a phenomenon that is specific to the English Language.

When we pronounce words with more than on syllable, all syllables do not receive the same prominence. For example when you pronounce 'potato' The middle syallable is stressed whereas the final syllable is stressed in the pronunciation of a word such as perhaps these varations are brought about by different factors the force with which the breath is released.

The a mount of muscular effort applied while pronouncing the word, the vibration of the vocal cards etc.

The syllable that is most prominent in the pronunciation of a word is said to receive the primary stress, in transcription, It is represented by placing a vertical line high up just before the syllable with primary stress, for example, about other syllables in the word have secondary stress secondary stress is represented by a vertical line below and befor the syllable, for example represent.

**Ku. Ashvini A. Raut**
B.A.-I Year

# Students and Social Service

Ku. Aaliya Raheman Shah, B.A. part II

Man is a Social animal. He depends upon another man is society you his needs, Everyman is interdependent in society. So was see social workers rendering their services to other people in the society. Many social and welfare societies come forward to help the needy. What can students do help the needy. What can students do in this regard.

Well, students can do more benefit to the society. They are educated many energetic, enthusiastic and ambitious. They have learned many skills in-school. As late prime Minister Indira Gandhi told in her speech delivered in a university that today's youth particalarly the students, are the builders of new India. She suggested to work in society abating the flood of hatred and breaking the bounds of old traditional beliefs in the same way margeret Alwa upon the educated women in her speech delivered in Tamil Nadu University to change the situation of women in India.

The students can organise adult classes where they can bring much change in people's thinking. They can inculcate he people the true human qualities of Mercy pity, peace and love. They can preach and progpagate our rights and duties towords society and the nation.

Social services is the best service for students but they should remember that they have to do a lot for society in future so they should not miss their aim also.

III

## Always Remember

Always remember to forget
The things that make you sad
But never forget to remember
The things that made you glad

Always remember to forget
The friends that proved untrue
But don't forget to remember
Those that have stack by you.

Always remember to forget
The trouble that have passed away
But never forget to remember
The blessing that come each day

**Ku. Reshma R. Pawar**
B.A. III

## Thought

Love is post card,
Life is visiting card,
Wife is memory card
Party is A.T.M card
girlfriend is a debit card
Padosen is a greeting card
Mother and Father pan card
a child is Identy card
But friend is Aadhar card
Jo hr waqt Kam aaye.

**Thoughts**

No thing is impossible in the world
because it self says that I am possible

**Ku. Shruti Mahalle**
B.A. II

# Rhythm

Ku. Pranita Borwar, B.A.-I Year

A repetitive pattern of sound Rhythm. It is derived from the measured Motion' rhythem is a natural component of speech; we stress certain syllables and words and do not strees others rhythm can. How ever be created through literary techniques.

Theire are five major kinds rhythm in english poetry these their are :-

**1) Trocheex** - This consists two syllables the first of these is stressed, and the second is unstressed this rhythm is used in short poems. Ex. poem (Tyger ! tyger ! burning bright)

**2) Tamb** - This consistes of .... syllables. The first of these is unstressed and second is stressed. this rhythem most closely resembles speech and is most commonly used in plays (ex- poets) (But soft, what, light through yonder window breaks?)

**3) Spondee** - This consists of two syllables both of which are consecutively stressed (expoen) (Break, Break Break on thy cold grey stones 'o' sea!)

**4) Anapest** - This consists of threes syllables the first two syllables are unstressed and the last syllable is stressed

The Assyriun came down like a wolg an the fold and his cohorets were gleaming in purple and gold and the sheen of thire spears was like stars on the sea when the blue wave rolls nightly on deep galiee.

**5) Dacty** - This consists of three syllables. The first syllable is streessed and the last two syllables are unstressed expeet (This is the forest primeval the murmuring pines and the hemlocks)

ııı

## Think...

Think about your past
Think about your future

Never think about Bad moments, you bad
But you can ever think about the
happy moment you had.

Never think about what went wrong
At the present moment
Think only happy thoughts.

Dream about a pleasant future
And think that you can make it
Think always in the positive.

And it can change the lives
of your and others.

**Ku. Ashvini Gunvantrao Thete**
B.A. III

# The Sonnet

Ku. Swamini Dnyaneshwar Warghat, B.A. I

The sonnet is an Important form of english poetry. Sonnet was originated in Italy. The Sonnet is a short poem of fourteen lines. It has fixed structures and fixed arrangements of rhymes

There are three types of Sonnet :-

1) The Italian Sonnet

2) The shakes pearean sonnet

3) Miltonic Sonnet

**1) The Italian Sonnet -**

The birth place of Sonnet is Italy. So the Sonnets origínted and used in Italy is called Italian Sonnet

This kind of Sonnet is composed of two parts 1) octave 2) Sestet

1) The octave is as stanza of eight lines

2) Sestet is a stanza of six lines.

**2) The shakespearean stanza -**

The sonnet form was Introduced in Ingland in 16 th Century in Ingland william made excellent use of this form so it is called shakespearean sonnet. shakespearean sonnet is composed of three quatrains and one couplet william shakespeare wrote 154 sonnet

**3) Miltonic sonnet -**

John milton was a great sonnet composer in 17 th century he adopted a pattern of Italian sonnet - but he made on excellent use of this form in his own style. He introduces a thought in the octave and completes in the sestet. There is a turn of thought after the 8 line milton wrote 18 sonnets.

**Subject of sonnet -**

There is no praticular subject for the sonnet petrarch, Shakespeare, milton, Johndonne and romantic poets.

The sonnet were written on all most everything.

**III**

## Always Remember

Always remember to forget
The things that make you sad
But never forget to remember
the things that made you glad.

Always remember to forget
the friends that proved untrue
but don't forget to remember
Those that have stuck by you.

Always remember to forget
The troubles that have....
passed away
But never forget to remember
the blessing that come each day.

**Ku. Priyanka D. Mohod**
B.A. III Year

# क्षणचित्रे : भारतीय महाविद्यालय, मोर्शी



भारतीय महाविद्यालय, मोर्शी येथे पदवी प्रदान समारंभात पदवी प्रदान करताना
मा. प्राचार्य जी.एस.मेश्राम,
श्री. नवीनकुमार पेठे
(सदस्य, महाविद्यालयीन विकास समिती),
व्हि.व्हि. खांडेकर, डॉ. टोपरे.

रा.से.यो. स्वयंसेवकांनीमहाविद्यालयास एकूण १८ महापुरुषांचे फोटो भेट देताना स्वयंसेवक व विचारमंचावर उपस्थित मान्यवर.
(दि.१४-८-२०१७)





प्लॅस्टिक निर्मूलन रॅली व वन्यजीव सप्ताहामध्ये सहभागी स्वयंसेवकांना वनविभागाकडून प्रमाणपत्र स्वीकारताना स्वयंसेवक

रा.से.यो. विभागाद्वारे आयोजित खुले कारागृह, मोर्शी येथे बंदीजनांना राखी बांधताना स्वयंसेविका



# क्षणचित्रे : भारतीय महाविद्यालय, मोर्शी



भूगोल विभाग, भा.म.वि.मोर्शी चे एकूण ९ विद्यार्थी मेळघाट व्याघ्र प्रकल्प येथे आयोजित आंतरराष्ट्रीय पर्यासत्रात सहभागी होऊन महाविद्यालयाचे प्रतिनिधित्व केले.



महाविद्यालयातील भूगोल विभागाच्या विद्यार्थ्यांची शैक्षणिक सहल



भूगोल विभाग, कार्स अमरावती आणि निसर्ग मित्र मंडळ भूगोल विभाग, भा.म.वि. मोर्शी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'एक दिवसीय निसर्ग भ्रमंती' आयोजन मेळघाट व्याघ्र प्रकल्पातील कलालकुंड व बकादरी येथे करण्यात आले होते.



बसस्थान मोर्शी येथे स्वच्छता शपथ घेताना रा.से.यो. स्वयंसेवक

# भारतीय महाविद्यालय, मोर्शी



**कैलाश दाभोडे**
अखिल भारतीय बेसबॉल आंतरविद्यापीठ स्पर्धेमध्ये
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या संघामध्ये
सहभाग. (सत्र : २०१७-१८)



**कु. दिव्या गोपाळराव खरबडे** (बी.ए.भाग-१)
प्रेरणा-२०१७
राज्यस्तरीय नेतृत्व प्रशिक्षण शिबीराकरिता निवड .
उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव विद्यापीठ चमूमध्ये सहभाग.
(दि.१६ ऑगस्ट ते २१ ऑगस्ट २०१७)



**चेतन जी. वलीवकर** (बी.कॉम.भाग-१)
आव्हान-२०१८
आपत्ती व्यवस्थापन राज्यस्तरीय प्रशिक्षण शिबीराकरिता निवड
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद
(दि.२५ मे ते ०३ जून २०१८)



**कु. प्रणिता डी. बोरकर** (बी.ए.भाग-१)
आव्हान-२०१८
आपत्ती व्यवस्थापन राज्यस्तरीय प्रशिक्षण शिबीराकरिता निवड
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद
(दि.२५ मे ते ०३ जून २०१८)

# मराठी विभाग



# आजची तरुणाई आणि सोशल मिडिया

कु. अर्पिता दि. बेलसरे, बी.ए. भाग३

आज अशी एकही व्यक्ती नाही जी सोशल मिडियाला ओळखत नाही, कारण वर्तमान परिस्थितीत संवादाचे सर्वात सोपे माध्यम म्हणजेच सोशल मिडिया... ! सोशल मिडियाच्या माध्यमातून आपण अगदी क्षणार्धात जगातील कोणत्याही ठिकाणी असलेल्या व्यक्तिपर्यंत इंटरनेटचा वापर करुन आपले विचार, फोटोज व्हिडीओ व माहिती तात्काळ पाठवू शकतो. असे असले तरी सध्याच्या स्थितीत सोशल मिडियामुळे शांतता आणि स्थैर्य धोक्यात आले आहे. सामाजिक अस्थिरता जाणवू लागली आहे. सामाजिक व वैयक्तिक समस्या निराकरण, शिक्षण किंवा थोडीशी करमणूक असा उद्देश जर ठेवला तर काही चुकीचे नाही, परंतु त्या व्यतिरिक्त तासनतास जर चॅटिंग, व्हिडीओ बघत बसण्याच्या सवयीमुळे मात्र अनेकांनी आपली मानसिकता, स्थिरता गमावली आहे. सोशल मिडिया ही काही वैश्विक समस्या नाही, परंतु तिचा अतिरेक प्रत्येक व्यक्ति साठी नुकसानदायक ठरु शकतो. आजच्या तरुणाईकडे बघितले तर हातात मोबाईल त्यावर सोशल मिडिया आणि दोनशे अडीचशे रुपयांचा डाटा असला की महिनाभर सर्व काही विसरुन सोशल मिडिया चालवणाऱ्या तरुणाईला सर्वच गोष्टींचा विसर पडला आहे. एक काळ असा होता की आपण पत्र लिहून पोस्टामार्फत पाठवत होतो व पोस्टमन ते पत्र सबंधित पत्यावर पोहचवत असे. हे पत्र पाठविण्यासाठी आणि पत्राचे उत्तर मिळवण्यासाठी साधारणत: १५ ते२० दिवसांचा कालावधी लागत होता. या संपूर्ण प्रक्रियेत वेळेचा अपव्यय होणे त्याचबरोबर आपला निरोप पोहचविण्यासाठी ही खूप वेळ लागत होता. परंतु काळानुसार जग तंत्रज्ञानाच्या माध्यमातून क्रांतीकडे वाटचाल करत आहे. यात सिंहाचा वाटा सोशल मिडियाचा आहे. सोशल मिडियाच्या फेसबुक, ट्विटर, ऑर्कुट, इंस्टाग्राम, व्हॉट्सॲप अशा या लोकप्रिय साधनांच्या माध्यमातून जगातील परिचित – अपरिचीत विविध लोक एकमेकांना जोडले गेले आहेत. तरुण पिढीच्या जीवनाचा अविभाज्य घटक बनल्याने हीच युवाशक्ती आपले मते, विचार जगातील कानाकोपऱ्यात पोहचवित आहेत.



भारतात सुमारे ६० ते ७० टक्के युवक असून सर्वांमध्ये सोशल मिडिया ची क्रेझ दिवसेदिवस वाढतच आहे. राजकारण, समाजकारण, विविध उपक्रम, जाहिरात इत्यादी सर्वच गोष्टींसाठी सोशल मिडियाचा १०० टक्के वापर होत असून त्याचा आपण जेवढा फायदा घेतो तेवढेच गंभीर दुष्परिणामही समाजाला बघावयास मिळत आहेत. अलीकडेच पिंपळनेर (ता.साक्री) जवळील राईनपाडा या खेडेगावात केवळ मुले चोरणारी टोळी असल्याच्या संशयावरुन सोलापूर जिल्ह्यातील ५ भिक्षुकांना अफवेमुळे आपला जीव गमवावा लागला हा सर्वात मोठा दुष्परिणाम म्हणावा लागेल. 'अति तेथे माती' या म्हणीप्रमाणे सोशल मिडियाचे दुष्परिणाम घातक ठरत आहे. हे उदाहरण आजच्या तरुणाईला

# शेतकऱ्यांचे आत्मकथन

कु. किरण डी. कंगाले, बी.ए. भाग २

प्रस्तावना : शेती कसणारा तो शेतकरी. शेतकरी हा ग्राम व्यवस्था आणि कृषी समाजरचनेचा कणा आहे. 'गावगाडा' कार त्रि.ना आत्रे, यांना दर्शविण्याचे आणि काळी वहीतीला आणण्याचे, श्रेय कुणबी यांना देतात. त्यांच्या मते, खेळणे म्हणजे जमिनीची मशागत करणे आणि खेडुन म्हणजे जमिन कसणारा. असा प्रत्यक्ष जमिन कसणारा मालक असो वा कुळ, मिरासदार असो वा बटाईदार. प्रत्यक्ष जमिन कसणारा म्हणजे शेतकरी होय.

शेतात येणाऱ्या पिकांच्या उत्पन्नावरुन शेतकऱ्याची उपजिवीका चालतो. शेती हा फार पूरातन काळापासून चालत आलेली आहे. तिचा उगम आदिमानवाच्या विचारातुन आणि स्त्रियांच्या तानखडतंत्रातून झाला. भारतात जास्तीत जास्त लोक ग्रामीण भागात शेती करतात. आपल्या भारतात पुर्वीपासून सखोल शेती केली जाते. म्हणुन भारताला 'कृषि प्रधान' देश म्हटले जाते. मान्सूनवर आधारित शेती ही एक नैसर्गिक जीवनपध्दती आहे.

**जगाचा पोशिंदा म्हणून खरी ओळख :-**

रात्र-दिवस काबाडकष्ट करुन शेतकरी अन्नधान्य पिकवतात. भारतातील अर्थ व्यवस्था देखील शेती उद्योगाशी निगडीत आहे. या सगळ्या चर्चेतुन एक गोष्ट नकीच समजली की, शेतकऱ्यांना पर्यावरणाचे महत्त्व माहित नाही असे निश्चितच नाही. पूर्वी शेतीचे मर्यादित प्रमाण आणि पध्दती यामुळे पर्यावरणाचे महत्त्व नसावे. परंतु काळाच्या ओघात शेतीपध्दतीच्या बदलता कल आणि वाढते प्रमाण बघता सक्रिय संवर्धन व्हायला हवे असे दिसते. माती आणि पाणी सुदृढ ठेवणे शेतीला उपकारकच आहे आणि ते आपल्याच हातात आहे. ही जाणीव जागृती करणे हाच या लेखामागचा मूळ उद्देश !



सर्वांना लागणारे अन्नधान्य शेतकरी पिकवतो. म्हणून त्याला जगाचा पोशिंदा म्हटल्या जाते. कृषी प्रधान देशात शेती व शेतकऱ्यांना सन्मानाचा दर्जा दिला जावा. त्यांच्या प्रति कृतज्ञता व्यक्त व्हावी. म्हणुन शेतकऱ्यांच्या सन्मानार्थ महाराष्ट्रात 'थेट शेतकऱ्यांच्या बांधावर' ही अभिनव मोहिम शेतकरीपुत्र प्रसिध्द साहित्यिक एकनाथ पवार सुरु झाली आणि ही एक प्रथा पर्व म्हणून पुढे येण्यास सुरुवात झाली.

**पहिले शेतकरी 'मुख्यमंत्री' ते शेतकरी कैवारी :-**

कृषि प्रधान देश आणि कृषि प्रधान महाराष्ट्र म्हणून आपल्या देशाची व महाराष्ट्राची ओळख आहे. देशाचा कणाच शेती व शेतकरी आहे. शेतकरी म्हणजे शेतात राबराब राबणारा. शेती करणारा वर्ग देशाच्या स्वातंत्र्य प्राप्तीनंतर व भाषावार प्रांत रचनेनुसार राज्य स्थापना झाली. त्यानुसार महाराष्ट्र राज्याची देखील सन १९६० मध्ये विदर्भ, मराठवाडा मिळुन निर्मिती झाली. याच महाराष्ट्रातून देशाला वसंतराव नाईक यांच्या रुपाने पहिला शेतकरी मुख्यमंत्री मिळाला. वसंतराव नाईक हे हाडाचे प्रगतीशिल शेतकरी होते. राज्यात सर्वाधिक काळ

तंतोतंत लागू पडते. अगदी लहान मुलांपासून वृध्दांपर्यंत सर्वच मोबाईलचा वापर करतात. परंतु साधारणत: १८ ते ४० वयोगटातील तरुणाई सोशल मिडियाच्या आहारी गेल्याचे दिसून येते. दिवस रात्र इंटरनेटचा वापर करुन, फोटो, माहिती, व्हिडीओ इंटरनेटवर शेअर करतात. अनेकदा तरुणांकडून समाजविरोधी माहिती विविध साईट्सवर टाकली जाते. ज्यामुळे समाजात तेढ निर्माण होवून दंगली, जाळपोळ, लुटमारी, खुन अशा भयानक घटनाही घडत असतात. या गोष्टी होवु नये म्हणून तरुणांनी विविध तत्वांचा व नियमांचा उपयोग करुन गरजेपुरता सोशल मिडीयाचा वापर केला पाहिजे व समाज विरोधी घटना घडणार नाही याची काळजी आवर्जून घेतली पाहीजे.

केव्हाही प्रायव्हसी सेंटिंग्ज योग्य प्रकारे सेट करुन नंतरच आपले फोटो किंवा मेसेज शेअर केले पाहिजेत. एखादी पोस्ट नको असल्यास ती काढून टाकली जावु शकते. मेसेज शेअर किंवा लाईक करताना आपण काही चुकीचे पाठवत नाही ना .. ? याचे भान आपणच राखले पाहिजे कारण अर्धवट ज्ञान नेहमी घातक असते. काहीवेळा पटकन माहिती शेअर करण्याच्या नादात चुकीची माहिती शेअर केली जाते. हा सोशल मिडियाचा सर्वात मोठा दुष्परिणाम आहे. तो तरुण वर्गाने लक्षात घेतला पाहिजे. सोशल मिडियाचे आरोग्यावरील दुष्परिणाम ही बघावयास मिळतात. सोशल मिडियाचा अतिवापर केल्याने आपल्याला थकवा येतो. त्यामुळे तणाव, हृदयविकार यासारख्या आरोग्याच्या समस्या कमी वयात तरुणांमध्ये दिसू लागल्या आहेत. सोशल मिडियाच्या वापरामुळे तरुणाई एकटेपणाशी जवळीक साधत आहे. त्याचवेळी कुटुंबियांमधला संवाद कमी होत असल्याचे चित्र दिसते. तरुणांमध्ये चिडचिड, नैराश्य, क्रोध, एकटेपणा यासारख्या अनियंत्रित, अविचारी गोष्टी समाजात घडत आहेत आणि जेव्हा अशावेळी मदतीची गरज असते तेव्हा सोशल मिडियाशी जुडलेली तरुणांना कामात येत नसतात.

जो पर्यंत आपल्या फेसबुक वरील पोस्टला मोठ्या प्रमाणात लाईक मिळत नाहीत तोपर्यंत त्यांचे समाधान होत नाही आणि अपेक्षित लाईक्स मिळाले नाही तर, त्यांच्या मनात 'त्या' मित्रांबद्दल नकारात्मक विचार घर करु लागतात. मुळात त्या गोष्टीला काहीच महत्त्व नसून सुध्दा तरुणाई डिप्रेशन मध्ये जाते. अशाप्रकारे सोशल मिडियाचे चांगले आणि वाईट असे दोन्ही परिणाम पाहावयास मिळतात. त्यामुळे आपण योग्य ती काळजी घेवुनच सोशल मिडियाचा वापर केला पाहीजे.

****

# आयुष्य

आयुष्य हे विधात्याच्या वहितील पान असतं
रिकामं तर रिकामं, लिहिलं तर छान असतं
शेवटचं पान मृत्यू अन् पहिलं पान जन्म असतं
मधली पाने आपण भरायची कारण
ते आपलंच कर्म असतं
होणाऱ्या चुकांना टाळायचं असतं
कुठलंच पान कधी गाळायच नसतं
चुक झाली तरी फाडून फेकायचं नसतं
कारण त्यातूनच आपल्याला पुढे शिकायचं असतं
नाती जपण्यात मजा आहे
बंध आयुष्याचे विणण्यात मजा आहे
जुळलेले सुर गाण्यात मजा आहे
येताना एकटे आलो तरी
सर्वांचे होवुन जाण्यात मजा आहे
नशीब कोणी दुसरं लिहित नसतं
आपलं नशीब आपल्याच हाती असतं
येताना काही आणायचे नसतं
जाताना काही न्यायचे नसतं
मग हे आयुष्य तरी कोणासाठी जगायचं असतं
याच प्रश्नाचे उत्तर शोधण्यासाठी जन्माला यायचं असतं

**– सुनिल कि. मसराम, एम.ए. भाग २**

****

# निसर्ग

डोंगरातुनी नदी वाहते,
पाऊस राजा सरसर येते
मोर पिसारा फुलवित बसते।।धृ।।
पावसामध्ये मुले भिजली
हिरवी ओली पाने फुटली
पाखरे सारी गाऊ लागली ।।१।।

हिरवे हिरवे रान सारे
थंडे थंडे सुटले वारे
गारा पाऊस पडले सारे ।।२।।

**– कु. काजल ठाकरे**
**बी.ए. भाग २**

****

# शेतकऱ्यांचे आत्मकथन

कु. किरण डी. कंगाले, बी.ए. भाग २

**प्रस्तावना :** शेती कसणारा तो शेतकरी, शेतकरी हा ग्राम व्यवस्था आणि कृषी समाजरचनेचा कणा आहे. 'गांवगाडा' कार त्रि.ना आत्रे, 'गाव वसविण्याचे आणि काळी वहीतींला आणण्याचे, श्रेय कुणबी यांना देतात. त्यांच्या मते, खेळणे म्हणजे जमिनीची मशागत करणे आणि खेडुन म्हणजे जमिन कसणारा. असा प्रत्यक्ष जमिन कसणारा मालक असो वा कुळ, मिरासदार असो वा बटाईदार. प्रत्यक्ष जमिन कसणारा म्हणजे शेतकरी होय.

शेतात येणाऱ्या पिकांच्या उत्पन्नावरुन शेतकऱ्याची उपजिवीका चालते. शेती हा फार पूरातन काळापासून चालत आलेली आहे. तिचा उगम आदिमानवाच्या विचारातुन आणि स्त्रियांच्या लागवडतंत्रातून झाला. भारतात जास्तीत जास्त लोक ग्रामीण भागात शेती करतात. आपल्या भारतात पुर्वीपासून सखोल शेती केली जाते. म्हणुन भारताला 'कृषि प्रधान' देश म्हटले जाते. मान्सूनवर आधारित शेती ही एक नैसर्गिक जीवनपध्दती आहे.

**जगाचा पोशिंदा म्हणून खरी ओळख :-**

रात्र-दिवस काबाडकष्ट करुन शेतकरी अन्नधान्य पिकवतात. भारतातील अर्थ व्यवस्था देखील शेती उद्योगाशी निगडीत आहे. या सगळ्या चर्चेतुन एक गाष्ट नक्कीच समजली की, शेतकऱ्यांना पर्यावरणाचे महत्त्व माहित नाही असे निश्चितच नाही. पूर्वी शेतीचे मर्यादित प्रमाण आणि पध्दती यामुळे पर्यावरणाचे महत्त्व नसावे. परंतु काळाच्या ओघात शेतीपध्दतीच्या बदलता कल आणि वाढते प्रमाण बघता सक्रिय संवर्धन व्हायला हवे असे दिसते. माती आणि पाणी सुदृढ ठेवणे शेतीला



उपकारकच आहे आणि ते आपल्याच हातात आहे. ही जाणीव जागृती करणे हाच या लेखामागचा मूळ उद्देश !

सर्वांना लागणारे अन्नधान्य शेतकरी पिकवतो. म्हणून त्याला जगाचा पोशिंदा म्हटल्या जाते. कृषी प्रधान देशात शेती व शेतकऱ्यांना सन्मानाचा दर्जा दिला जावा. त्यांच्या प्रति कृतज्ञता व्यक्त व्हावी. निष्ठेने शेतकऱ्यांच्या सन्मानार्थ महाराष्ट्रात 'थेट शेतकऱ्यांच्या बांधावर' ही अभिनव मोहिम शेतकरीपुत्र प्रसिध्द साहित्यिक एकनाथ पवार सुरु झाली आणि ही एक प्रथा पर्व म्हणून पुढे येण्यास सुरुवात झाली.

**पहिले शेतकरी 'मुख्यमंत्री' ते शेतकरी कैवारी :-**

कृषि प्रधान देश आणि कृषि प्रधान महाराष्ट्र म्हणून आपल्या देशाची व महाराष्ट्राची ओळख आहे. देशाचा कणाच शेती व शेतकरी आहे. शेतकरी म्हणजे शेतात राबराब राबणारा. शेती कसणारा वर्ग देशाच्या स्वातंत्र्य प्राप्तीनंतर व भाषावार प्रांत रचनेनुसार राज्य स्थापना झाली. त्यानुसार महाराष्ट्र राज्याची देखील सन १९६० मध्ये विदर्भ, मराठवाडा मिळुन निर्मिती झाली. याच महाराष्ट्रातून देशाला वसंतराव नाईक यांच्या रुपाने पहिला शेतकरी मुख्यमंत्री मिळाला. वसंतराव नाईक हे हाडाचे प्रगतीशिल शेतकरी होते. राज्यात सर्वाधिक काळ

मुख्यमंत्री म्हणून राहण्याचा मान त्यांनाच मिळाला. यामागे त्यांची शेती व शेतकरी यांच्या प्रति असलेली निष्ठा आणि लोककल्याणकारी धोरणांची उभारणी हे कारणीभूत असल्याचे मानेल जाते. हरितक्रांती, श्वेतक्रांती वसंतराव नाईक यांनी घडवून आणली. शेतकरी समृध्द व सन्मानाने जगावा यावर त्यांचा अधिक भर होता शेतकरी कल्याणकारी धोरणांचा महामेद म्हणून ओळख असली तरी शेतकरी कष्टकरी वर्ग त्यांना आपला कैवारी मानतात. महाराष्ट्र शासन कृषी प्रधान असणाऱ्या महाराष्ट्राचा पावन पूर्व म्हणून माणला जाणारा 'कृषि दिन' हा दिवस हरितक्रांती व श्वेत क्रांतीचे जनक वसंतराव नाईक यांची जयंती म्हणून सर्वत्र साजरा केला जातो.

**शेतकऱ्यांना लागणाऱ्या मुलभूत गोष्टी :-**

शेतकऱ्याला शेती करण्यासाठी लागणाऱ्या गोष्टींमध्ये प्रथम ''सुपीक''जमिन आणि नंतर ''पाणी'' लागते. शेतीला मुबलक पाणी असेल तरच शेती करणे शक्य आहे. तिसरी आवश्यक गोष्ट म्हणजे ''मनुष्यबळ', हे असले की, शेतकरी शेतातील पिकांची निगा राखु शकतो. चौथे म्हणजे शेती करताना लागणारा खर्च पूर्ण करण्यासाठी लागणारा 'पैसा' (भांडवल) आणि शेवटी जेथे तो त्याचा उत्पादित शेतमाल विकता ती ''बाजारपेठ''. शेतकऱ्यांसाठी त्यांची शेतीच सर्व काही असते. त्यांच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह आणि जगातील अन्य उद्योग करणारे लोक हे कळत न कळत या शेतकऱ्यांवर अवलंबून असतात.

**शेतकऱ्यावर येणारी संकटे :-**

शेती करताना शेतकऱ्याला बेमोसमी पाऊस, ओला दुष्काळ, कोरडा दुष्काळ, बाजारपेठेतील बाजारभावात होणारी घसरण, शेतीसाठी सावकाराकडून किंवा बँक इ. कडून घेतलेली कर्ज परतफेडीची मुदत निर्यातीतील होणारे शासकीय बदल अशा अचानक येणाऱ्या अनेक संकटांचा सामना करावा लागतो. हवामानात अचानक होणाऱ्या बदलांमुळे शेतातील पिकांचे नुकसान होते. हजारो रुपये खर्च करुन शेतकरी आपला शेतकाल तयार करतो त्याची काळजी घेतो, पण त्याच्या कष्टाला दर वेळी फळ मिळतेच असे नाही. तसेच शेतकऱ्यांसमोर हमी भावाची समस्या आहे.

**शेतकऱ्यांचे मित्र :-**

गाय, बैल,म्हैस, साप, फुलपाखरे, मधमाशा, कोंबड्या, शेळ्या, बेडूक, रेडा, गांडुळ असे अनेक प्राणी शेतकऱ्याचे मित्र असतात. सर्व पक्षी शेतातील धान्य खाऊन फस्त करतात अशी एक गैरसमजुत आहे . काही पक्षी शेतातील धान्य खात नसुन पिकाची काढणी झाल्यावर शेतात पडलेले दाणे टिपतात. निसर्गातील नियंत्रण आणि सरपटणाऱ्या प्राण्यांचे संतुलन राखण्याचे काम हे पक्षी करतात.

पिकांचे नुकसान करतात म्हणून अमेरिकेतील लोकांनी 'केरोलविना पॅरकीट' या पोपटाच्या सुंदर प्रजातिचा वंशच संपवून टाकला माओच्या आदेशानंतर चिनी नागरिकांनी लाखो चिमण्यांची कत्तल केली. त्यांचा परिणाम शेतीवर झाल्याने चिनला उपासमारीचा सामना करावा लागतो. पिकाचे उत्पादन न झाल्याने लाखो लोक मृत्युमुखी पडले. शेवटी चिन सरकारला रशियातुन चिमण्या आयात कराव्या लागल्या. महाराष्ट्रातील शेती व शेतकरी यांचा इतिहास लिहिणे, अभ्यासणे आणि जतन करणे आवश्यक आहे.

****

## मैत्रिचा वृक्ष

वाटलं नव्हतं मला,
असं काही घडेल
आपल्या मैत्रीचा वृक्ष,
असा कोलमडून पडेल
याच मैत्रीच कधीकाळी,
मधाचा गोडवा होता
त्या दिवसात रोजचं,
दिवाळी पाडवा होता.
जेव्हा रडत होतो तेव्हा,
मैत्रीनेच हसवलं
नुकतेच हसायला शिकलो,
आणि पुन्हा मैत्रीनेच रडवलं
चुक तुझी ही नसावी,
किंवा माझी ही नसावी
रडून रडून शेवटी,
डोळ्यातलं पाणी आटलं
वाटले नव्हते मला,
असं काही घडेल.
आपल्या मैत्रिचा वृक्ष,
असा कोलमडून पडेल

– कु. काजल ठाकरे
बी.ए. भाग २

# राजर्षी शाहु वसा आणि वारसा

कु. पल्लवी सा. गवई, बी.ए. भाग ३

इतिहासात जमा होवुन केवळ संशोधकांसाठी फक्त उरलेले 'राजे' भारतात असंख्य होवुन गेले. असे राजे महाराष्ट्रातही बरेच होते. त्यांची जागा इतिहासात होती म्हणून भारतीय जनतेने 'राजेशाही' नाहीशी केली आणि 'लोकशाही' आणली. परंतू ज्यांनी 'इतिहास' घडविला जे आजच्या वर्तमानातही शिल्लक आहेत आणि भविष्य घडविण्याच्या कार्यात सुध्दा जे अजून सहभागी आहेत असे राजे महाराष्ट्रात दोनच. एक स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज आणि दुसरे कर्ते समाजसुधारक राजर्षी शाहु महाराज.

''झाले बहू परि यासम हेच''

इतिहासाची पाने उजळविणाऱ्यार, वर्तमानातही विचारात घेणे भाग पडत असणाऱ्या आणि भविष्य घडविण्यातही सहभागी असणाऱ्या या महामानवात असे काय होते की, ज्यामुळे राजेशाहीच्या जमान्यात होवुन गेलेल्या या दोन राजांना लोकशाहीतही असे अद्वितीय स्थान मिळाले आहे ? राजे असून सुध्दा त्यांनी रयतेचा केलेला विचार, रयतेसाठी केलेले व्यवहार आणि त्यांच्या समकालीनांपेक्षा कितीतरी दुरदृष्टी ठेवून गाजवलेले कर्तृत्व या गोष्टीमुळे त्यांना हे स्थान मिळाले आहे. रयत म्हणजे अर्थातच बहुसंख्या प्रजा. आजच्या भाषेत बहुजनसमाज आणि त्यातील दीनदुबळे, मागासलेले विभाग, रयतेची कणव आणि रयतेचा विचार. प्रत्येक व्यवहारात केंद्रस्थानी रयत. जे काही करायचे ते रयतेसाठी ही या महापुरुषांची समान सुत्रे होती.

रयतेची बाजु घेवुन शाहू राजांनी वरिष्ठ वर्णाशी संघर्ष केला होता. त्यासाठी खोटीनाटी टिका व प्रत्यक्ष त्रास सहन केला होता. असा संघर्ष करणाऱ्यांच्या संघर्षात शाहु महाराज सहभागी झाले होते.

''विद्येत मागासलेल्या वर्गाच्या ''जाहिर सभांमधून शाहू महाराजांनी भाषणे करुन जागृती निर्माण केली होती. उत्तर प्रदेशातील 'कुरमी' समाज परिषदेत आणि डॉ. आंबेडकरांबरोबर 'अस्पृश्य वर्गाच्या मानगाव परिषदेत मार्गदर्शन केले होते. निराश्रीत सोमवंशीय समाजच्या सभा, अखिल भारतीय बहिष्कृत समाजपरिषद, अखिल भारतीय 'अस्पृश्य परिषद' कर्नाटक ब्राह्मणेत्तर परिषद, ज्ञानवर्धक सभा या आणि अशा नावांच्या व्यासपीठावरुन शाहू महाराजांनी समाजातील त्या त्या विभागांशी जवळीक साधली होती.



राजर्षी शाहू : वसा आणि वारसा –

या सभा आणि संस्थांची नावे त्यांचे स्वरुप आणि कार्ये स्पष्ट करणारी आहेत. या सभा, संस्था आणि परिषदा कुणाच्या होत्या आणि कशासाठी होत्या हे त्यांच्या नावावरुन अगदी स्पष्ट होते. आजच्यासारची फसवी नावे धारक करण्याची पध्दत त्या काळात आली नव्हती. शाहू महाराजांनी सामाजाच्या कोणत्या विभागासाठी कार्य केले हे स्पष्ट आहे.

त्यांचे कार्य अपूरे आहे :–

शाहू महाराज आणि तत्सम इतरांनी केलेले कार्य अजुन पूर्ण व्हायचे आहे. आज ही 'रयत' दुबळी आणि पडित – शोषितच आहे. आजही बहुसंख्य प्रजा, बहुजन समाज दीनदुबळे दलित आणि शोषित यांची अवस्था शोषनियच आहे. आजही विषमता आहे. वरच्या वर्णाचे आणि वरच्या वर्गाचे शोषण कार्य आजही सुरुच आहे. 'वरच्यांच्या' या शोषणाविरुध्द तळचे समाज आजही संघर्ष करीत आहेत आणि म्हणूनच शाहू महाराजांचा विचार आणि त्यांचा व्यवहार आजही मार्गदर्शक

आहे त्यांच्या विचारांची आजही गरज आहे. त्यांच्या विचारांची ही गरज रयते ला आहे. 'अस्पृश्यांना' आहे, विद्येत मागासलेल्यांना आहे, निराश्रितांना, बहिष्कृतांना, बहुजनांना आहे.

विचित्र वास्तव :- परंतु आज एक विचित्र दृश्य पाहायला मिळते. आजच्या रयतेला छळणारे आजचे नवे राजे सुध्दा जोराजोराने 'जय शिवाजी' जय शाहू' असे म्हणतात आणि आजच्या समाजातील तळचे बहुजन आणि रयतसुध्दा शिवाजी महाराज की जय, शाहू महाराज की जय असे म्हणते हा काय प्रकार आहे? छळणारे ही तेच म्हणतात आणि छळले जाणारे ही तेच म्हणतात हे काय चालले आहे? वरिष्ठ वर्णाचे समाज विभागही शाहू महाराज की जय म्हणतात (ते तर अगदी जोरजोराने म्हणतात)आणि कनिष्ठ वर्णाचे समाज विभागही तेच म्हणतात हा प्रकार विचित्र वाटत नाही काय ?

ज्यांच्या हितासाठी आजचे राज्य चालविले जाते ते समाज विभाग आणि लोकशाही असून सुध्दा जे अजूनही वंचित राहीले आहेत या दोघांनीही एकच विचार स्वीकारला आहे काय ? वरचे आणि तळचे हे भेद नाहीसे झाले आहेत काय गरीब आणि श्रीमंत हे भेद संपले आहेत काय? वर्गभेद नष्ट झाले आहेत काय? वर्णव्यवस्था संपुष्टात आली आहे काय? वरच्या आणि खालच्या दोन्ही वर्गाना आणि दोन्ही वर्णाना एकदम एकाच वेळी शाहू महाराज इतके कसे काय प्रिय झाले आहेत? वरिष्ठ वर्गाना आणि कनिष्ठ वर्गाना शाहू महाराजांना एकदम एवढा पुळका कसा काय आला?

महामानवांच्या नावाचा जयजयकार करत 'पुढारी' म्हणून मिरवणारे आप्त सामाजिक व राजकीय क्षेत्रात प्रतिष्ठीत झाले आहेत. महापुरुषांचे विचार फोटो अनेक दिवाणखाण्यांची शोभा वाढवत आहे. पण महामानवांचे विचार काय होते त्यांचा लढा कुणासाठी, कोणत्या मूल्यांसाठी होता हे मात्र फारसे माहित नसते. राजर्षी शाहू महाराजांचे लोकोत्तर कार्यही याच प्रकारामुळे दुर्लक्षित राहीले आहे. आज खास मराठे म्हणवणारे शाहू राजे आमचे म्हणतात तर जातिअंताचा लढा लढविणारे मुलनिवासी बहुजनही शाहु राजांना आपला राजा म्हणतात. (सदर लेख मृदगंध भाग२ या पाठ्यपुस्तकातील, राजर्षी साहु 'वसा आणि वारसा' या लेखना आधारे लिहीलेला आहे)

---

# स्त्री भ्रुण हत्या

-कु. पुनम रं. खंडारे, बी.ए.भाग २



मुलगी नको म्हणून जन्माला यायच्या आतच तिला मारण्याचं पाप करण्याचा हा प्रकार अत्यंत घृणास्पद आहे. त्याला जबाबदार असणाऱ्यांनी विचार करायला हवा. ग्रामीण भागामध्ये हा प्रकार अधिक होता. परंतू मागच्या काही दिवसात प्रकाशात आलेल्या माहितीनुसार शहरी भागात सुशिक्षित लोकांकडूनही हा प्रकार होत असल्याचे पुढे आले म्हणूनच हा विषय आणखी गंभीर होत चाललाय कारण मुलगी नको, मुलगाच हवा ही मानसिकता सगळीकडे घर करत चालल्याचं दिसून येते. त्यामुळे शहर असो की गाव सुरक्षित असो अडाणी या सर्व स्तरातुन मुलगी नको हा विचार नष्ट होणं गरजेच आहे. स्त्री भ्रुण हत्या रोखण्यासाठी अनेक सामाजिक संस्था काम करत आहेत. तसेच प्रसुतीपुर्व व गर्भलिंग निदान प्रतिबंध कायदाही आहेत. पण कायदाच्या पळवाटा तसच घरातुन वंशाचा दिवा हवा म्हणून होणारे हट्ट यामुळे अनेक ठिकाणी स्त्री भ्रुण हत्या केली जाते. हे थांबवायचे असेल तर त्याची सुरुवात घरातुनच व्हायला हवी. जो पर्यंत मुलगी नको फक्त मुलगाच हवा ही मानसिकता बदलत नाही तोपर्यंत हा प्रकार थांबणे शक्य नाही. स्त्री भ्रुण हत्या रोखण्यासाठी लोकांच्या मानसिकतेत बदल होणं गरजेंच आहे. सर्वांना मैत्रिण हवी, बायको हवी, आई हवी पण मुलगी का नको? मुलीला जन्माला येवु दिले जात नसेल तर आई, बायको, किंवा बहिण कुठून येणार याचा विचार होण गरजेचे आहे. त्यामुळेच लेक वाचवा असे म्हणण्याची वेळ आपल्यावर आली.

स्त्री भ्रुण हत्या का होतात याचे उत्तर खर तर समाजाच्या मानसिकतेत दडले आहे. आई वडिलांना मुलगी नकोशी असते असे नाही, पण मुलगी म्हणजे खर्च असे समीकरण कुठेतरी मनात पक्के बसले आहे. जन्माला आल्यापासून तिच्या हुंड्यासाठी तजवीज करावी लागणार असे पालकांना वाटते. स्त्रीला दुय्यम वागणुक द्यायची सुरुवात लहानपणापासुन होते आरोग्य, पुरेसा आहार, उच्च शिक्षण याबाबीत मुलींना डावलेले जाते. प्रगतीकडे वाटचाल करणाऱ्या महाराष्ट्रात आज मुलींचे प्रमाण दिवसेंदिवस कमी होत आहे ही चिंतेची बाब आहे. आज मुलगी जन्माला येण्याचा हक्कच हिरावून घेतला जात आहे. आधुनिक तंत्रज्ञानाचा दुरुपयोग करुन उमलण्याआधी या कळ्या खुडल्या जात आहे. पुरोगामी महाराष्ट्राच्या दृष्टिने ही बाबा अतिशय गंभीर आहे. पण केवळ कायदे करुन हा प्रश्न सुटत नाही तर समाजाची मानसिकता बदलणे ही तितकेच महत्त्वाचे आहे.

# आधुनिक काळातील शेती पध्दती

कु. साजीया शेर अली शाहा, बी.ए. भाग १

भारतातील अर्थव्यवस्थेत लक्षणिय योगदान देणारी शेती व्यवस्था ही अत्यंत उपयुक्त आहे.

*** भारतातील शेती क्षेत्र भौगोलिक स्थितीनुसार भिन्न आहे:-**

भारताच्या भौगोलिक स्थानामुळे काही भागात वेगवेगळे हवामान असते अशा प्रकारचे हवामान प्रत्येक क्षेत्राच्या शेती उत्पादनास वेगवेगळ्या पध्दतीने प्रभावित करते. भारताच्या शेतीची एक विस्तृत पार्श्वभुमी आहे जी कमीत कमी १० हजार वर्षापूर्वीची आहे. सध्या जगात भारताताचा कृषी उत्पादनात दुसरा क्रमांक आहे. २००७ मध्ये शेती आणि इतर उद्योंगानी भारताच्या कृषी उत्पादनात जीडीपीच्या १६% दरापेक्षा अधिक उत्पादन केले. देशाच्या जीडीपीच्या दरामध्ये कृषीच्या योगदानात सतत घट झाल्यानंतरही देशातील सर्वात मोठा उद्योग आणि देशाच्या सामाजिक आर्थिक विकासात शेती महत्त्वाची भूमिका बजावते. गहु, तांदूळ, कापूस, रेशीम, भुईमुंग आणि इतर उत्पादन करणारा जागातील भारत हा दुसऱ्या क्रमांकाचा देश आहे. भाज्या आणि फळे यांचे हे सर्वात मोठे उत्पादन येथे होते. भाज्या आणि फळे यांचे हे सर्वात मोठे कापनीयंत्र देखील आहे. जे अनुक्रमे ८.६ % आणि १०.९% एकुण उत्पादन दर्शवते. भारतात उत्पादित होणारे मुख्य फळ आंबा, पपई, चिकू आणि केळी आहेत. जगात भारतामध्ये सर्वात जास्त पशुधन असून ते २८१ दक्षलक्ष इतके आहे.

*** शेती व्यवस्थेवरील हवामानाचा प्रभाव :-**

भारतातील प्रत्येक प्रदेशामध्ये विशिष्ट माती आणि हवामान आहे. जे विशिष्ट प्रकाराच्या शेतीाठीच योग्य आहे. भारताच्या पश्चिम भागामध्ये बऱ्याच ठिकाणी दरवर्षी ५० से.मी. पेक्षा कमी पाऊस पडतो, म्हणून शेतीव्यवस्था ही पिकाची लागवड करण्यास प्रतिबंधित असते. ज्यामुळे दुष्काळ पडतात आणि बहुतेक शेतकरी एका पिकासाठी प्रतिबंधीत असतात.




गुजरात, राजस्थान, दक्षिण पंजाब आणि उत्तर महाराष्ट्रामध्ये असे वातावरण असल्यामुळे शेतकरी ज्वारी, बाजरी आणि वाटाण्यासारखे उपयुक्त पिकांचे उत्पादन घेतो. याउलट भारताच्या पूर्वेकडील बाजूस सरासरी १००-२०० से.मी. पावसाचे सिंचन केलेले आहे म्हणून या प्रदेशांमध्ये पिकांमध्ये दुप्पट वाढ करण्याची क्षमता आहे. पश्चिम किनारपट्टी बंगाल, बिहारचे काही भाग उत्तर प्रदेश आणि आसाम ह्या भागामध्ये असे वातावरण आहे आणि यामुळेच तेथील शेतकरी तांदुळ, उस, ताग अशी बरीच पिके घेतात.

भारतात तीन वेगवेगळ्या प्रकारचे पीक घेतले जातात. भारतात प्रत्येक पिक त्यांच्या प्रकारानुसार वेगवेगळ्या हंगामात घेतले जाते. खरीब पिक पासवाळ्याच्या सुरुवाती पासून ते हिवाळ्याच्या सुरुवातीपर्यंत , जुन ते नोव्हेंबर पर्यंत घेतले जातात. त्यामध्ये तांदुळ, मका, बाजरी, भुईमुग आणि उडीद हि पिके समाविष्ट होतात.

*** सिंचन शेती :-**

नद्या, जलाशये आणि विहिरी यांच्या द्वारे शेतीमध्ये पाणी करवून सिंचन व्यवस्थेच्या सहाय्याने पिकांची लागवड होते तेव्हा सिंचन शेती होते. गेल्या शतकात, भारताची लोकसंख्या तिपटीने वाढती आहे. वाढती लोकसंख्या आणि त्याच बरोबर अन्नाची मागणी वाढल्याने शेती उत्पादनासाठी पाणी आवश्यक आहे. पुढच्या दोन दशकात अन्नधान्याचे उत्पादन ५० टक्क्यापेक्षा जास्त वाढवण्यासाठी आणि भारतातील टिकावु शेतीच्या उद्दीष्टात पोहचण्याच्या प्रयत्नांना पाणी आवश्यक भूमिका

बजावणार आहे. असे निदर्शनास आले की, भारतात शेती उत्पादनातील वाढ सिंचनामुळे होत आहे. सन १९५० मध्ये सिंचनाखालील शेतीचे क्षेत्र २२.६ दशलक्ष हेक्टरवरून १९९० च्या दरम्यान सुमारे १३५० मोठ्या आणि मध्यम आकाराचे सिंचन कार्य सुरु झाले आणि त्यापैकी सुमारे ८५० कार्य पूर्ण झाले.

*** सिंचन समस्या :-**

निधी आणि तांत्रिक कौशल्य यांचा कमी पुरवठा असल्यामुळे इंदिरा गांधी कालवा प्रकल्पासह अनेक प्रकल्प मंद गतीनी पुढे गेले १९८० ते १९९० च्या दशकाच्या सुरुवातीलस पंजाबमध्ये हरियाणा आणि राजस्थान या राज्यांनी मोठ्या प्रमाणावर पाण्याचे हस्तांतरण केले. सिंचनाची समस्या कमी करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या स्त्रोतांची भुजल पातळी सुध्दा कमी झाली आहे.

*** भारतात सिंचन भूगोल :-**

मौसमी किंवा कमी पर्जन्यमानाच्या ठिकाणी पिकाच्या लागवडीसाठी सिंचन शेती फार महत्त्वाची आहे. पश्चिम, उत्तर प्रदेश, पंजाब, हरियाणा, बिहारचे काही भाग, उडीसा, आंध्रप्रदेश, तामिळनाडू, कर्नाटक आणि इतर ठिकाणी सिंचन शेती करून एका पेक्षा जास्त पिके घेतात. सिंचन शेती करून तांदूळ, गहू आणि तंबाखू सारखी पिके मोठ्या प्रमाणावर घेतली जावू शकते.

*** लागवड करणे :-**

पिकात फेरबदल करणे हा शेतीचा उपजीविकेचा एक प्रकार आहे. मातीचा पोत क्षमता, कीटक आणि तण यामुळे शेतीची उत्पादन क्षमता कमी होते. शेतीला पिक न घेता तापवले की, जमिनीचा भूभाग तापतो आणि त्यामुळे शेतजमीन भूभाग पुन्हा पिक घेण्यासाठी तयार होते. ताग, माईन, बटाटे ही पिके घेतली जातात. अशा प्रकारच्या पिकांची लागवड पूर्व उत्तर-पूर्व भागात डोंगराळ प्रदेशांवर आणि आसाम मेघालय, नागालँड, मणिपूर, त्रिपूरा, मिझोराम, अरुणाचल प्रदेशासारख्या वन क्षेत्रामध्ये प्रामुख्याने करतात. शेतीला पिक घेता तापवले की, जमिनीचा भूभाग तापतो आणि त्यामुळे शेतजमीन पून्हा पिक घेण्यासाठी तयार होते. पावसाळ्यात तांदूळ, भाजीपाला, भात, गहू, लहान बाजरी, मुळा हि पिके आणि पालेभाज्या यासारखी पिके घेतली जातात. ईशान्य भारतातील शेतीच्या ८५% पिकांची लागवड करावयाची आहे. सलग एकच पिकाची लागवड केल्यामुळे जमिनीला नैसर्गिक स्थितीत येण्यासाठी पुरेसावेळ मिळत नाही. यामुळे पर्यावरणाची लवचिकता मोडली जाते आणि जमिनीचा पोत खालावतो.

****

# शिक्षणाची गत

रात्रदिवस कपडे शिवून,
मूलास घडविणारी आई
निर्मात्यांना यापुढे चित्रपटातून
दाखविता येणार नाही
मोळीवाली अन् पोळीवालीनेही
यापुढे स्वप्न पाहू नये उद्याचे
जन्मताच हुशार असलेल्या
लेकुरांच्या उज्वल भविष्याचे
त्यांच्या शिक्षणाची ती
होवु शकणार नाही हाती
कारण भरमसाठ फी पुढे
ती पडणारच आहे कमी
गरीबांनी शिकूच नये,
अशीच तयार झाली नीती
गरीबांचे शिक्षण मग
घेईलचं कसं गती
सुमार बुध्दीमता अन् बेसुमार मालमत्ता
असलेल्या यापुढे शिकतील
खरंच ते डॉक्टर इंजिनिअर
देशाचा काय विकास करतील
इंजिनीअर करती चुराडा
यंत्र, तंत्र व धनाचा
डॉक्टर मंडळी तर
विश्वास नसेल कुणाचा
कसला आला विकास
ही तर अधोगतीची नांदी
बसलेल्या वृक्षावरच कुऱ्हाड,
चालविणाऱ्या शेख चिल्लिची फांदी

– साक्षी प्र. नाखले
बी.ए. भाग २

****

# छत्रपती शिवाजी महाराज जीवन व कार्य

कु. राधिका सं. काळमेघ, बी.ए. भाग २

महाराष्ट्रातील मराठ्यांच्या राज्याचे संस्थापक आणि पहिले अभिषिक्त छत्रपती यांचा जन्म मराठवाड्यातील भोसल या वतनदार घराण्यातील मालोजीचे पुत्र शहाजी आणि सिंदखेडकर जाधवराव यांच्या कन्या जिजाबाई या दांपत्यापोटी –शिवनेरी किल्ल्यावर झाला. त्यांचा जन्म तिथीविषयी एकमत नाही. मराठी बखरींच्या आधारावरुन त्यांचा जन्म १६२७ मध्ये झाला. पण नेवे शकावली, कवींद्र परमानंद यांचे शिवभारत आणि राजस्थानात उपलब्ध झालेल्या जन्मपत्रिका या विश्वसनीय साधनांवरुन फाल्गुन वद्य तृतीया शके १५५१ म्हणजे १९ फेब्रुवारी १६३० ही तारीख बहुतेक इतिहास संशोधकांनी आणि आता महाराष्ट्र शासनानेही निश्चित केली आहे.

शिवाजी महाराजांचे पूर्वज चितोडच्या सिसोदीया घराण्यातील होते अशी लौकिक समजून आहे हे घराणे दक्षिणेतील होयसळ वंशातील ओ असेही संशोधन पुढे झाले आहे. मालोजी हे या घराण्यातील पहिले कर्तबगार पुरुष त्यांना शहाजी व शरीफजी असे दोन मुलं होते. मालोजी हे निजामशाहीतील एक कर्तबगार सरदार होते. मालोजी व त्यांचे बंधु विठोजी यांच्याकडे औरंगाबादजवळचे वेरूळ, कन्नड व देव्हाडी हे परगणे मुकास म्हणून होते. शहाजी पाच वर्षाचे असतांना मालोजी मरण पावले त्यांच्या नावाची जहागिर शहाजींच्या नावाने राहीली निजामशाहीच्या दरबारातील खंडागळेच्या हत्तीच्या प्रकरणावरुन शहाजी व लखुजी जाधव यांच्यात वितुष्ट आले. ते पुढे कायम राहीले शहार्जीनी १६२० पासून निजामशाहीच्या बाजूने आदीलशाही विरुध्द लढ्यात सुरुवात केली होती. पण १६२४ मध्ये भातवडीच्या लढाईस सुरुवात केली पराक्रम करुनही त्यांचा सन्मान झाला नाही म्हणून ते आंदीलशाहीस मिळाले पण इब्राहीम आदीलशाहाच्या मृत्युनंतर ते पुन्हा निजामशाहीत आले.



शिवाजी महाराजांचे बालपण शिवनेरी माहुली व पुणे येथे गेलेले दिसते. बंगलोरसाही ते काही काळ राहीले शिवाजी आणि जिजाबाई यांच्याकडे महाराष्ट्रातील जहागिरीची व्यवस्था सोपवून शहाजी राजांनी त्यांची पुण्याला रवानगी केली. जहागिरीची प्रत्यक्ष व्यवस्था पाहण्यासाठी शहाजींनी त्यांची पुण्याला दादोजी तथा दादाजी कोंडदेव आणि काही विश्वासू सरदार यांची नेमणूक केली. जिजाबाईचा देशाभिमान, कर्तरीपना आणि कठीण प्रसंगातून निभाऊन जाण्यासाठी लागणारे धैर्य, या त्यांच्या गुणांच्या तालमीत शिवाजी राजे तयार झाले. त्यांच्या शिकवणीतून शिवाजीराजांना स्वराज्यस्थापनेची स्फूर्ती मिळाली. आपल्या जहागिरीच्या संरक्षणासाठी गड, किल्ले आपल्या ताब्यात असले पाहिजेत ही जाणीव त्यांना बालवयापासून झाली.

दादोजी कोंडदेव यांच्या मृत्युनंतर शिवाजी महाराजांनी प्रत्यक्ष कारभार हाती घेतला. त्यांनी गड आणि किल्ले आपल्या ताब्यात घेण्यासाठी अनेक मोहीमा आखून यशस्वीरित्या पार पाडल्या या कामात त्यांना आपल्या मातोश्रीचे आशीर्वाद होतेच.

शिवाजी महाराजांनी आपल्या उपक्रमाची सुरुवात सावधपणे केली. १६८१ मध्ये आणि

सक्वारबाई शाहुंच्या कारकीर्दीत मरण पावल्या. महाराजांनी पुण्याच्या परीसरातील मोकळ्या टेकड्या, पडके आणि तोरण कील्ला, प्रचंडगड महाराजांनी हस्तगत केला. महाराजांना येवुन मिळालेल्या अनुयायांत पुढे प्रसिध्दीस आलेली कान्होजी जेथे नेताजी पालकर, समकालीन कागदपत्रांनुसार नेतोजी पालकर, तानाजी मालुसरे, येसाजी कंक, बाजीप्रभु देशपांडे, बाजी पासलकर इ. नावे आढळून येतात. भोरजवळ रोहीडेश्वरासमोर स्वराज्यनिष्ठेची शपथ घेतल्याची कथा ही याच सुमारास असावी. जी स्थळे आपण घेतली ती विजापूर राज्यातील सुरक्षितता कायम राहावी या हेतूनेच अशी भूमिका महाराजांनी घेतली. विजापूर दरबारनेही सुरुवातीस महाराजांच्या या चळवळीकडे फारसे लक्ष दिले नाही. पण महाराजांनी कोडाण्याच्या (सिंहगडाच्या) कील्लेदाराला आपलेसे करुन तो आपल्या ताब्यात घेतला. त्यावेळी मुहमद आदीलशहाचे डोळे उघडले. महाराजांच्या विरुध्द विजापूरचे सैन्य चालुन गेले. दक्षिणेत विजापूरच्या सैन्यात शहाजीराजे हे अधिकारी म्हणून जिजीच्या कील्ल्यासमोर तळ देवुन होते. त्यांच्यावर फीतुरीचा आरोप ठेवण्यात येवुन त्यांना कैद करण्यात आले (१६४८) आणि त्यांना विजापूरात आणण्यात आले. येथे येवुन विजापुरचे सैन्य उधळून लावले. (१६४८ अखेर) सैन्याची इतर भागातील आक्रमणेही परतवण्यात आली. शहाची महाराजांना काय शिक्षा होईल. याची काळजी महाराज आणि जिजाबाई यांना पडली. त्यावेळी दक्षिणचा मोगल सुभेदार म्हणून शाहजहानचा मुलगा मुरादबख्श हा औरंगाबाद येथे कारभार पहात होता. त्याच्याशी संपर्क साधण्याचा आणि त्याच्या मार्फत विजापूरवर दडपण आणण्याचा प्रयत्न महाराजांनी केला. कोंडाण्याचा कील्ला परत द्यावा ही अट आदीलशहाने घातली. कील्ला परत देण्यास महाराज नाखूश होते. तथापि सोनोपंत डबीर याने शिवाजी महाराजांची समजुत घातली सिंहगडचा कील्ला आदीलशहाकडे परत करण्यात आला. त्यानंतर शहाजींची सुटका होवुन (१६४९) त्यांची बंगलोरला सन्मानाने रवानगी करण्यात आली.

या मोहिमेत महाराजांच्या विरुध्द लढणाऱ्या विजापुरच्या सैन्यात फलटणकर, निंबाळकर, घाटगे, बल्लाळ, हैबतराव ही मंडळी होती. त्यावेळी महाराजांच्या सैन्यात गोदाजी जगताप, भिमाजी बाप, संभाजी काटे, शिवाजी इंगले, भिकाजी चोर व त्याचा भाऊ भैरव चोर इ. निष्ठावान मंडळी होती. पुरंदरच्या पायथ्याशी झालेल्या लढाईत बाजी कान्होजी जेथे याने पराक्रमाची शौर्य केली. म्हणून शिवाजी महाराजांनी त्याला सर्जेराव ही पदवी दीली. याच लढाईत मुसे खोऱ्याचा देशमुख बाजी पासलकर हा कामी आला. मावळातील वतनदार मंडळी ही महाराजाच्या कार्याकडे कशी ओढली जावु लागली हे या मोहीमेवरुन दिसून येते.

पुढील सहा वर्षात शिवाजी महाराजांनी जहागिरीचा सगळा बंदोबस्त आपल्याकडे घेतला. पुणे, सुपे, इंदापूर, चाकण ही या जहागिरीतील प्रमुख स्थळे १६५४ च्या सुमारास महाराजांनी पुरंदरचा किल्ला महादजी निळकंठराव किल्लेदार यांच्या मुलांकडून हस्तगत केला आणि पुणे प्रांताची सुरक्षितता मजबूत केली. पूढे महाराजांनी पुरंदरचा किल्ला महादजी आणि पुणे प्रांताची सुरक्षितता मजबुत केली. पुढे महाराजांनी जावळीवर स्वारी केली.

छत्रपती शिवाजी महाराज हे अद्वितीय योध्दा म्हणून महाराज जगभर परिचित आहे. त्यांनी गनिमी काव्याचा प्रभावी उपयोग केला. महाराजांनी देशात प्रथम नौसेनेची स्थापना केली. अनेक गड, कील्ले उभारले. जातपात, धर्म यापेक्षा त्यांनी आपल्या राज्यकारभारात कतृत्वाला महत्त्व दिले. महाराजांच्या राज्यात महीलांना सन्मानाची वागणूक दिली जात असे.

****



## चारोळी

किर्तनातून केले जनप्रबोधन, स्वच्छतेचा दिला ज्यांनी मंत्र!
माणसात देवुनी देवाचे दर्शन, जगण्याचे दिले नवे तंत्र!!

–कु. वैष्णवी जा. इवनाते, बी.ए. भाग २

# संत तुकाराम महाराज

दिपक प्र. झाडे, बी.ए. भाग ३

संत तुकाराम प्रापंचिक जीवनात आपत्तीचे खुप तडाखे सहन करावे लागले. खुप दुःखे भोगावी लागली. पण अशा परिस्थितीमध्ये त्यांनी डोंगरावर उपासना चालु केली आणि स्वतःचे खुप सारे अंभग रचले. चिरंतनाचा शोध घेत असतांना त्यांना साक्षात्कार झाला आणि तेथेच परमब्रम्हास्वरुप श्रीविठ्ठल त्यांना भेटला असे मानले जाते. संत तुकाराम साक्षात्कारी व निर्भीड लोककवी होते.

**जे का रंजले गांजले। त्यासी म्हणे जो आपुले।।**
**तोची साधु ओळखावा। देव तेथेच जाणावा।।**

अशा प्रकारचे अभंग संत तुकारामांनी जनसामान्याना सांगुण ईश्वर भक्तीचा सुगम असा सोपा मार्ग दाखवून दिला. १७ व्या शतकामध्ये सामाजिक प्रबोधनाचे मुहुर्त मेढ रोवणारे सुधारक संत म्हणून तुकाराम महाराजांचा उल्लेख करावा लागेल. संत तुकारामांनी समाजातील अंधश्रध्दा दुर करुन प्रबोधन करण्याचे काम केले. भागवत सांप्रदायाचा कळस होण्याचे महान भाग्य संत तुकारामांना लाभले. महाराष्ट्राच्या हृदयात अभंग रुपाने ते स्थिरावले आहेत. अभंगासोबत त्यांनी गवळणीही रचल्या. त्यांच्या काव्यातील गोडवा व भाषेची रसाळता अतुलनीय आहे.



संत तुकारामांची अभंगाची गाथा अखंड ज्ञानाचा स्त्रोत म्हणून जनसामान्यांच्या मुखात कायम आहे. संत तुकाराम महाराज खऱ्या अर्थाने समाजसुधारक आहेत. त्यांनी त्यांच्या साहित्यामधून समाजातील भोळ्या समजुती, अंधश्रध्दा नष्ट करण्याचा प्रयत्न केला आणि ज्यामध्ये ते यशस्वी ठरले. त्यांचे अभंग मानवी जीवनाला उपकारक ठरले. जगाचा संसार सुरळीत चालविण्याठी संत तुकाराम यांनी आपल्या संसारातील सुख-दुःखांचा त्याग केला. त्यांनी आपल्या अभंगवाणीने अखंड मानवजातीचा उद्धार केला आहे. संत तुकाराम महाराज हे संसारी असून सुध्दा त्यांनी आपले आयुष्य परमार्थाकडे वळवले. समाजामध्ये कोणीही गरिब असू नये अशी त्यांची धारणा होती. लौकीक अर्थाने संत तुकाराम हे ८ व्या पिढीतील नायक ठरले. हे ज्ञानेश्वराने रचलेल्या भक्ती चळवळीचा खऱ्या अर्थाने कळसास नेण्याचे काम हे संत तुकारामानी केलेला आहे.

**संत तुकाराम आणि शिवाजी महाराजांची भेट :-**

संत तुकारामांच्या जीवनाची ही कहानी आहे. ते महाराष्ट्रात राहत असतानाचं शिवाजी महाराजांनी त्यांना मौल्यवान वस्तु पाठविली. त्यात हिरे, मोती, सोने आणि बरेच कपडे समाविष्ट होते. पण संत तुकाराम सर्व मोल्यवान वस्तु परत पाठवून म्हटले - महाराजा हे सर्व माझ्यासाठी निरर्थक आहे. माझ्यासाठी सोने आणि पृथ्वी यांच्यात काही फरक नाही कारण या देवाने मला त्याचे दर्शन दिले असल्याने मी आपोआपच तिन्ही जगाचा स्वामी झालो आहे. मी या सर्व निरुपयोगी वस्तू परत देतो. जेव्हा हा संदेश महाराज शिवाजीकडे पोहचला. तेव्हा मी संतांला भेटण्यासाठी महाराज शिवाजीचे मन विचलीत झाले आणि त्याच वेळी ते भेटायला निघून गेले.

*** संत तुकारामांचे चमत्कारी जीवन :-**

तुकारामांनी भगवतांच्या भक्ती बरोबरच मराठी मध्ये अभंगाची निर्मिती केली. एकदा रामेश्वर भट्ट नावाच्या एका ब्राम्हणाने संत तुकारामांना त्यांच्या निर्मीतीचा

गठ्ठा बनवून इंद्रायणी नदीत फेकण्यास सांगितला तुकाराम दयाळू वृत्तीने आपल्या सर्व पोथ्यांना नदीत टाकले. थोड्या वेळात संत तुकारामांना याबद्दल वाईट वाटले ते भगवान विठ्ठल मंदिरात गेले आणि रडू लागले. आणि तेरा दिवसांपासून भूकेलेले, तहानलेले तुकाराम मंदिरासमोर पडले होते. संत तुकारामाची ही अवस्था पाहून विठ्ठल भगवान स्वत: हजर झाले आणि म्हणाले की, ''तुकारामां तुझी पुस्तके नदीबाहेर पडलेली आहेत. तुझी पुस्तके साभाळा'' आणि तेच घडले आणि तुकारामाला स्वत:ची पुस्तके मिळाली.

संत तुकारामाच्या संपूर्ण आयुष्याबद्दल जाणून घेतल्यावर असे कळते की दृष्टही संतासोबत येथे स्थिर होतात. पण संतांच्या भक्तीसमोर त्याच्यातील एकही सुटत नाही. भगवंताच्या आचरणात विरघळलेले संत सांसारिक लोकांच्या कल्याणासाठी वा पृथ्वीवर जन्म घेतात.

सन १६४९ मध्ये संत तुकाराम विठ्ठल मंदिरात कीर्तन करत असतांना अदृश्य झाले. संत तुकारामजीची पालखी आषाढी एकादशीच्या दिवशी ते पंढरपूर येथे नेली जाते.

****

---

# अनाथांची आई सिंधुताई सपकाळ

प्रतिक वहिले, एम.ए. भाग २

'अनाथांची आई' म्हणून सिंधुताई सपकाळ संपूर्ण महाराष्ट्राला परिचित आहे. त्यांचा जन्म १४ नोव्हेंबर १९४७ रोजी वर्धा जिल्ह्यातील नवरगाव येथे झाला. त्याचे वडील अभिमान साठे यांनी त्यांचा विवाह कमी वयातच श्रीहरी सपकाळ यांच्याशी लावून दिला. परंतु पतीच्या सोबत झालेल्या वादामुळे सिंधुताई यांना वयाच्या २० व्या वर्षी त्यांच्या पतीने त्यांचा त्याग केला, पण त्या खचल्या नाहीत. सासरच्या मंडळीकडून सिंधूताईचे खूप हाल झाले. त्या गरोदर असतांना पतीने त्यांना घराबाहेर काढले. त्या गायीच्या गोठ्यात राहू लागल्या. त्या गोठ्यातच त्यांनी एक मुलीस जन्म दिला. आत्महत्येचा विचार त्यांच्या मनात आला होता. पण बाळ मोठ्याने रडल्याने त्यांच्यातील आई परतली अन् अनाथ मुलांसाठी काम करण्याचे त्यांनी ठरविले. स्वत:च्या मुलीला त्यांनी दगडूशेठ हलवाई ट्रस्टकडे सांभाळ करण्यासाठी सोपविले. त्यानंतर त्यांनी अनाथ मुला-मुलींचा सांभाळ करण्यासाठी स्वत:ला वाहून घेतले.



**सिंधुताईंनी अनाथांच्या मुलाच्या संगोपनासाठी पुढील संस्था उभ्या केल्या :-**

१) सन्मती बालनिकेतन , हडपसर, पूणे
२) ममता बालसदन, सासवड, पूणे
३) माई आश्रम, चिखलदरा, अमरावती
४) गंगाधरबाबा छात्रालय, गुहा, जि. नगर

त्यांच्या संस्थेत असणाऱ्या सर्वच मुलामुलींना सरकारचे अनुदान मिळत नाही म्हणून त्या महाराष्ट्रभर भटकंती करतात. स्वत:च्या जीवनाचे अनुभव सांगतात व आर्थिक मदत मागतात. ''मी १०० सुनांची व १५० जावयांची सासू आहे, असे त्या गमतीने व्याख्यानात सांगतात ''मी सिंधुताई सपकाळ'' या नावाचा चित्रपट निघाला आहे. लंडनमधील ५४ व्या चित्रपट महोत्सवासाठी त्या चित्रपटाची निवड झाली होती.

सिंधुताईना २०१० मध्ये महाराष्ट्र शासनाने अहिल्याबाई होळकर पुरस्कार दिला. विविध संस्था व संघटनांनी त्यांना आतापर्यंत २७५ पेक्षा जास्त पुरस्कार दिले आहेत. त्यांचे एक प्रसिध्द आत्मचरित्र 'मी वनवासी' हे सुध्दा खूप प्रेरणादायी आहे. असा सिंधुताई सपकाळ यांचा जीवनप्रवास प्रेरणादाई आहे.

# निसर्ग आणि माणूस

कु. मयुरी ज. हुड, बी.ए. भाग ३

**लेखकाचे निवेदन :–** पदव्युत्तर वर्गात शिकत असतांना मी मुलांसाठी जगाचा इतिहास लिहिला – तीन खंडात. त्यापैकी अर्वाचिन कालाचा इतिहास सांगणाऱ्या खंडाला मी शीर्षक दिले. 'प्रगत मानव' अठराव्या, एकोणिसाव्या व विसाव्या शतकातील मानवाच्या इतिहास सांगायाचा तर या शिवाय दुरे शीर्षक देणे मला अशक्य वाटले. पुढे निसर्ग-निरीक्षण आणि त्या अनूषंगाने वाचन सुरु केल्यावर गेल्या दोनशे वर्षात माणसाने, विशेषतः युरोप व अमेरिकेतील लोकांनी सकारण किंवा अकारण, निव्वळ मौजेखातर केलेला पशु–पक्षांच्या हत्यंच्या तपशील कळ्ला, त्यावरुन १९६३–६४ मध्ये मी केलेले अर्वाचीन मानाचे 'प्रगत मानव' हे नामाभिमान जास्तच समर्पक वाटू लागले.

मात्र १९७९ च्या आसपास भारतातली परिस्थिती अशी होती की, पशु–पक्षाची बाजू घेवून बोलणे ही श्रीमंती चैन समजली जात होती. माणसाला वाचवायचं सोडून हे वाघाला आधी वाचवायला निघालेत. यांच्या श्रीमंती शौकासाठी आणि चैनीसाठी यांना असंख्य आणि वाघ–सिंह हवेत मग गरीब लोग देशोधडीला लागले तरी यांना पर्वा नाही असा हेटाळणीला त्यावेळी निसर्गप्रेमाला तोंडू शकत नव्हतो. वाघ वाचला तर माणसाचेही अनेक फायदे होती, ही कारणमिमांसा प्रचारात यायला वेळ लागला. अलीकडे पाण्याची टंचाई जशी जास्त जाणवू लागली आहे तेस जंगणे वाचली तरच पाण्याचे प्रवाह टिकवतील, वाहते राहतील. अशी पुरवणी वरील कारणमिमासेला जोडण्यात आली आहे. तरीही वरील टीकले पूर्ण खंडन यामुळे होत नाही हे उघड आहे.



१९७० ते १९८० या काळात काही निसर्गप्रसंगी मग असा शोध घेण्याचा प्रयत्न केला की, निसर्गावर आक्रमण मुख्यतः कोण करतं ? त्यापासून खरा फायदा होतो तरी कोणाचा ? अनेक उदाहरणांनी त्यांनी असं दाखवून दिलं की, निसर्गावरील आक्रमणाला मोठे उद्योगच जाबाबदार आहेत आणि सरकार किंवा शासन त्यांना अनेक सवलती देवून या आक्रमणला उत्तेजन देत आहेत. अनेक ठिकाणी जंगलानी व्यवस्था पूर्वी लोकांच्या हातात होती. ती सरकारने स्वतःच्या सोयी आहेत की नाहीत, ते साठविण्यासाठी काही प्रक्रिया करावी लागते का ? तिला खर्च किती येतो. या गोष्टीवर अवलंबून राहील. शेतकऱ्याला त्यांच्या इतर गरजा जर स्वतःच्या शेतातूनच भागविता येत असतील तर शिलकी उत्पन्नाचा फायदा त्याला जास्त मिळू शकेल. आपल्याकडील परापंरागत शेतीमध्ये कडबा, इतर चारा, थोडेफार जळण व इमारती लाकूड, शेतकरी स्वतःच्या शेतातून मिळवीत असे. मात्र यासाठी शेतीचा आकार लहान असून चालणार नाही. तो जितका मोठा, तितका या इतर गरजा भागविण्यास वाव जास्त. टी. बेलिस स्मिथ या लेखकाने १८२० सालातील इंग्लंडमधल्या एकाशेताचे असे उदाहरण दिले आहे या शेताचा आकार ४६० हेक्टर (सुमारे १००० एकर) एवढा होता. शेतकऱ्याचे कुटूंब बार्ली व गहू ही प्रमुख पिके शेताचा काही भाग कुरण जाई लेंड्याचा खत म्हणून वापर होई. शेतकाच्या क्षेत्रातच तळे, ओली कुरणे, दलदल असे भाग होते. त्यावर मेंढ्या चरत. त्यांची लोकर विकली जाई. लेंड्याचा खत म्हणून वापर होई. शेताच्या क्षेत्रातच तळे, ओली माणसे यांना पुरेसे अन्न, जळण, चारा अशा वस्तू पुरवू शकत असे. (टी.बेलिस स्मिथ) बॅकालॉजी ऑफ ॲग्रिकल्चरल सिस्टिम्स, केब्रिज युनिव्हर्सिटी १९९०,४थी आवृत्ती.

अ नि १ वा य

शेतकऱ्याला ज्या बाकीच्या गरजा आहेत त्या जूबाजूला निसर्गातून विनामूल्य भागत समजतील. तरीही शेतीच्या उत्पादनावरील त्याच्या कुटूंबाचा भार कमी हाई आणि शेतात शिलकी उत्पन्न दिसू शकेल.

चिन, भारत, इजिप्त यामधिल प्राचीन मानवी समाजानी नेमकी हीच गोष्ट साध्य केली होती. चीनमध्ये प्राण्याचीच नव्हे तर माणसांची विष्ठाही खत म्हणून वापरुन जमिनीतून काढून घेतलेला अन्नांश तिला परत करण्याचा जास्तीत जास्त प्रयत्न करण्यात येई. भारतात शेतकऱ्याच्या जळण चारा, शेतकामाचे व इतर मारती लाकूड यांच्या गरजा आसपासच्या जंगलातून विनामूल्य पुरविल्या जात. इजिप्तमध्ये नाईल नदीचा सुपीक गाळ आणि उतारावरुन विनाखर्च वाहत येणारे पाणी यावर एवढे उत्पादन निघे की, प्राचीन काळात सारे रोमन साम्राज्य त्याचा उपभोग घेवून शके. या निसर्गाच्या आधारावरच शेतीसारखा बेभरवंशाचा अस्थिर धंदा माणूस शेकडो वर्षे करत आहे.

'निसर्ग आणि मानव' यांच्या संदर्भात गुरुदेवांकडून काही ऐकावे म्हणून ठरवल्याप्रमाणे लेलेशास्त्री, सुधाकर डॉ. मूर्ती याच्या समवेत काही मान्यवर मंडळी देखील उपस्थित होती. सर्वांनी गुरुदेवांना साष्टांग प्रणिपात केला. गुरुदेवांनी सर्वांवर आपला दृष्टिपेक्षा टाकला.

डॉ. मूर्ती म्हणाले, ''गुरुदेव ! निसर्ग आणि मानव यांच्यातील नाते जाणण्याची आम्हाला जिज्ञासा आहे.

गुरुदेव म्हणाले, भुवनव्यवस्था जाणल्याविना आपणाला 'निसर्ग आणि मानव' याचे नाते कळणार नाही'

भुवनव्यवस्था म्हणजे जगतव्यवस्था ! भवुनव्यवस्था याचा अर्थ निसर्ग दैवी सृष्टी,'मानवसृष्टी' आणि तिर्थक सृष्टी' ही तीनही भुवनव्यवस्थेची अंगे आहेत. ''दैवीसृष्टी'' आणि ''मानवसृष्टी'' ह्या परस्पर पोषक व पुरक आहेत. —(संकलित लेख)

---

# ऑनलाईन अभ्यास पध्दती

**कु. साक्षी संजयराव ठाकरे, बी.ए. भाग–२**

प्रस्तावना : ऑनलाईन अभ्यासाला सोप्या शब्दांत इंटरनेट आधिरित शिक्षण पध्दती म्हणता येईल. कोरोना व्हायरसमुळे सरकारने सर्व शाळा आणि शैक्षणिक संस्था अनिश्चित काळासाठी बंद केल्या, तेव्हा भारतासह अनेक देशांमध्ये ऑनलाईन शिक्षणाला प्रोत्साहन देण्यात आले. आज प्रत्येक मुलाकडे इंटरनेट उपलब्ध असल्याने ते शिक्षणाचे लोकप्रिय माध्यमही बनले आहे. या माध्यमातून शिक्षक देशाच्या आणि जगाच्या कोणत्याही कानाकोपऱ्यात बसलेला आपल्या विद्यार्थीशी इंटरनेटच्या माध्यमातुन संवाद साधू शकतात.

*** ऑनलाईन शिक्षण म्हणजे काय ?**

सोप्या भाषेत ऑनलाईन शिक्षण ही एक प्रणाली आहे. ज्याद्वारे विद्यार्थी स्वत:च्या घरातुन इंटरनेट आणि संगणक, लॅबटॉप, स्मार्टफोन आणि टॅब्लेट यांसारख्या इलेक्ट्रानिक उपकरणांद्वारे शिक्षण घेवु शकतात.या नव्या शिक्षण पध्दतीत अंतर आणि वेळ यांचे अडथळे पूर्णपणे दूर झाले आहेत. विद्यार्थी त्यांना हवे तिथे बसुन ऑनलाईन किंवा रेकॉर्ड केलेल्या व्याख्यानाच्या मदतीने अभ्यास करु शकतात. १९९३ पासुन ऑनलाईन शिक्षणाला कायदेशीर दर्जा देण्यात आला.



*** ऑनलाईन शिक्षण प्रणालीतील अडचणी आणि शक्यता :–**

आतापर्यंत ऑनलाईन शिक्षण प्रणाली बाल्यावस्थेत असून, या प्रणालीमध्ये येणाऱ्या अडचणी ओळखता याव्यात, यासाठी तिची फारशी अंमलबजावणी झालेली नाही. परंतु अनेक मोठ्या आणि मुलभुत कारणांमुळे आजही सर्वच मुले या पध्दतीचा लाभ घेवु शकत नाहीत. ज्या मध्ये पहिली समस्या म्हणजे हायस्पीड इंटरनेटचा अभाव, आजही दुर्गम भागात इंटरनेटचा स्पीड एवढा नाही की ऑनलाईन क्लासला उपस्थित राहता येईल. दुसरी समस्या इलेक्ट्रॉनिक उपकरणांशी संबंधित आहे. मध्यम आणि निम्न कुटुंबातील मुलांना स्मार्ट फोन वगैरे दिले जात नाहीत किंवा कुटुंबाची आर्थिक परिस्थिती ही खर्च भागवण्या इतकी नाही.

*** ऑनलाईन शिक्षणाचे अनेक फायदे :–**

घरबसल्या अभ्यासाच्या सोयीमुळे फायदे दिसुन येतात. विविध प्रकारचे हवामानख परिस्थिती , गृहिणी किंवा अपंगत्व यासारख्या अडचणींचा शिक्षणावर परिणाम होत नाही. नियमीत वाहतुकीचा अडथळा दुर होवुन बराच वेळ आणि खर्च ही वाचतो. शाळेची संसाधनेही वाचली आहे. अभ्यासपूर्व औपचारिकतेत घालवलेला वेळ वाचु शकतो.डिजिटल डेटा सहजपणे सेंट केला जावु शकतो, ज्यामुळे पूर्वी दिलेले लेक्चर कधीही पुन्हा वापरता येवु शकते.

*** ऑनलाईन शिक्षणाचे तोटे :–**

आजच्या काळात ऑनलाईन शिक्षण माध्यमाचे महत्त्व काय? त्याच्या शक्यता, आव्हाने आणि फायदे आपण आतापर्यंत जाणुन घेतले. एकीकडे या पध्दतीचे अनेक फायदे आहेत तर दुसरीकडे अनेक दुष्परिणाम ही समोर येत आहेत. खाली दिलेल्या मुद्यांच्या मदतीने या शिकवण्याच्या पध्दतीचे तोटे देखील जाणुन घेऊया. सर्व मुलं सारखी नसतात, त्यांच्यात विविधता असते. म्हणून स्क्रिन वाचणे किंवा पाहणे इतके सोपे नाही किंवा ऑनलाईनचा अति वापरही मुलांच्या आरोग्यच्या दृष्टीने घातक आहे.

# डॉ. पंजाबराव देशमुख यांचे कार्य आणि कर्तव्य

कु. पल्लवी कि. मुंडे बी.ए. भाग ३

भारतातील शेतकरी क्रांतीचे जनक म्हणून ओळखले जाणारे डॉ. पंजाबराव देशमुख यांचा भारताच्या विकासामध्ये मोलाचा वाटा आहे. भाऊसाहेबांनी कृषी क्षेत्रामध्ये जे योगदान दिले त्यामुळे आज कृषी क्षेत्रामध्ये बरीच सुधारणा पहायला मिळाली. भाऊसाहेब हे एक समाज सेवक आणि राजकारणी होते आणि शेतकरी बांधवांसाठी भाऊसाहेबांनी केलेले कार्य तर अवाक्याबाहेर आहे. भाऊसाहेब हे भारतीय शेतकऱ्यांचे नेते होते.

डॉ. पंजाबराव देशमुख यांचा जन्म पापळ या अमरावती जिल्ह्यातील छोट्याशा गावात झाला आहे. २७ डिसेंबर इ.स. १८९८ रोजी पंजाबराव देशमुख यांनी एक क्षत्रिय मराठा कुटुंबामध्ये जन्म घेतला. पंजाबराव यांचा मूळ आडनाव कदम असं होत. भाऊसाहेब हे पंजाबराव देशमुख यांचे टोपन नाव होते. घराची आर्थिक परिस्थिती अतिशय खालावलेली होती. तरीही पंजाबराव देशमुख यांनी शिक्षण घेण्याचा निर्णय घेतला. गावातल्याच शाळेमध्ये पंजाबराव देशमुख यांचे प्राथमिक शिक्षण पूर्ण झाले. पुढील शिक्षणासाठी ते कारंजा लाड आणि सोनगाव येथे गेले. नंतर अमरावती मधील हिंदू हायस्कुल आणि पुण्यातील फर्ग्युसन महाविद्यालयात पंजाबराव देशमुख यांनी त्यांचे पुढील शिक्षण पूर्ण केले.



त्याकाळी भारतामध्ये उच्च शिक्षण उपलब्ध नसल्याने पंजाबराव देशमुख यांना उच्चशिक्षणासाठी इंग्लडला जावे लागले. परंतु त्यांच्या घरची परिस्थिती इतकी ही चांगली नव्हती की ते इंग्लंडला अभ्यासासाठी जावु शकतील परंतु कसेबसे त्यांनी पैसे जमा केले आणि इंग्लड गाठले. उच्चशिक्षणासाठी पंजाबराव देशमुख यांनी इंग्लड तर गाठले परंतू, तिकडच्या बदललेल्या वेळा, हवामान नवीन माणसे या सगळ्यांशीच त्यांना मिळतंजुळत करवून घ्यायची गरज होती.

पंजाबराव देशमुख यांनी संस्कृत मध्ये पदवी मिळवली. पंजाबराव देशमुख यांच्याकडे बॅरिस्टरची पदवी देखील आहे. वैदिक साहित्यामधील धर्मातील मूळ विकास यावर त्यांनी डॉक्टरेट ही पदवी मिळाली. इसवी सन १९२४ मध्ये पंजाबराव देशमुख यांचा विवाह सुवर्ण समाजातील विमल वैद्य यांच्याशी झाला हा विवाह एक आंतरजातीय विवाह ठरला.

डॉ. पंजाबराव देशमुख सामाजिक कार्यकर्ते होते. समाजाची सेवा करुन समाजामध्ये प्रबोधन घडवून आणण्याचे काम केले. पंजाबराव देशमुख यांनी अस्पृश्यांना योग्य ती वागणूक मिळावी म्हणून संपूर्ण आयुष्यभर लढा दिला. अमरावतीच्या अंबाबाई मंदिरामध्ये अस्पृश्यांना प्रवेश दिला जात नव्हता. यासाठी १८ ऑगस्ट १९२८ रोजी डॉ. पंजाबराव देशमुख यांनी सत्याग्रह सुरु केला. त्याकाळी उच्च नीच, जातिभेद अस्पृश्यांना मिळणारी गैर वागणूक, उच्चवर्णीय व कृष्णवर्णीय यांवर होणारा भेदभाव या सगळ्या गोष्टी फार चालायच्या आणि ह्याच गोष्टींना आळा घालण्याचं काम डॉ. पंजाबराव देशमुख करत होते. अस्पृश्यांना मंदिरामध्ये प्रवेश मिळू नये म्हणून उच्चवर्णीयांनी निषेध केला होता. परंतू डॉ. पंजाबराव देशमुख यांनी सत्याग्रह सुरु केला. या सत्याग्रहामध्ये भीमराव आंबेडकर यांचा पाठिंबा डॉ. पंजाबराव देशमुख यांना मिळाला या कार्यामध्ये डॉ. पंजाबराव देशमुख यशस्वी ठरले.

मंदिराच्या व्यवस्थापनाने अस्पृश्यांना मंदिरात प्रवेश दिला. त्या वेळी अस्पृश्यांना दिली जाणारी वागणूक अतिशय चुकीची होती.

आपल्या महाराष्ट्रामध्ये शिक्षणाच रोपट पेरण्याचे काम डॉ. पंजाबराव देशमुख यांनी केले. डॉ. पंजाबराव देशमुख यांनी इस १९३१ मध्ये अमरावती येथे शिवाजी एज्युकेशन सोसायटी स्थापन केली. ही संस्था महाराष्ट्रातील दुसऱ्या क्रमांकाची शिक्षण संस्था ठरली आहे. या संस्थेमध्ये २४ पदवी महाविद्यालय तर ५४ इंटरमीडिएट महाविद्यालय आहे. याशिवाय ७५ महाविद्यालय, ३५ वसतीगृह समाविष्ट आहेत. इस. १९२६ मध्ये गरीब होतकरु विद्यार्थ्यांसाठी श्रध्दानंद वसतीगृह स्थापन केल. डॉ. पंजाबराव देशमुख यांनी अनेक शैक्षणिक संस्था स्थापन केल्या इ.स. १९५० मध्ये पुण्यामध्ये डॉ. पंजाबराव देशमुख यांनी लोक विद्यापीठ स्थापन केल इ.स. १९५६ मध्ये डॉ. पंजाबराव देशमुख यांनी अखील भारतीय दलित महासंघाची स्थापना केली.

भारत हा कृषीप्रधान देश आहे. भारतामध्ये ७५% लोक कृषी क्षेत्रावर अवलंबून आहेत. शेतकरी शेतात राबतो, घाम गाळतो म्हणूनच सुखाचे दोन घास आपल्याला सर्वांच्या पोटात जातात ही जाणीव डॉ. पंजाबराव देशमुख यांनी संपूर्ण समाजाला करुन दिली आहे. ७ फेब्रुवारी १९५५ रोजी डॉ. पंजाबराव देशमुख यांनी भारत कृषक समाजाची स्थापना केली. शेतकऱ्यांना मुबलक ज्ञान मिळावं . म्हणून कृषी विद्यापीठ निर्माण करुन दिले. इ.स. १९२७ मध्ये डॉ. पंजाबराव देशमुख यांनी शेतकरी समाजाला चालना देण्यासाठी महाराष्ट्र केसरी नावाच मराठी वृत्तपत्र सुरु केले. शेतकऱ्यांच्या डोक्यावर असणारा कर्जाचा डोंगर कमी व्हावा म्हणून डॉ. पंजाबराव देशमुख यांनी १९३३ मध्ये कर्जमाफी अधिनियम मंजूर करण्यामध्ये खूप मोठे योगदान दिले आहे. इ.स. १९२७ मध्ये शेतकरी संघाची स्थापना केली इ.स. १९५५ मध्ये राष्ट्रीय कृषी सहकारी खरेदी व विक्री महासंघ स्थापन केलं. ११ डिसेंबर १९५९ ते फेब्रुवारी१९६० या दरम्यान डॉ. पंजाबराव देशमुख यांनी भव्यदिव्य जागतिक कृषी प्रदर्शन नवी दिल्ली येथे आयोजित केले.

डॉ. पंजाबराव देशमुख हे स्वतंत्र्यलढा मध्ये समाविष्ट झाले आणि लोकसभेसाठी चक्क तीन वेळा त्यांची निवड करण्यात आली. इ.स. १९३६ मध्ये डॉ. पंजाबराव देशमुख शिक्षण मंत्री झाले स्वतंत्र्य भारताचे पहिले कृषिमंत्री म्हणून पंडित जवाहरलाल नेहरु यांनी डॉ. पंजाबराव देशमुख यांची निवड केली.

इ.स. १९५२ ते १९६२ पर्यंत डॉ. पंजाबराव देशमुख यांनी केंद्रीय मंत्रीमंडळात भारताचे पहिले कृषीमंत्री म्हणून अतिशय निष्ठेने व जबाबदारीने सेवा दिली. इ.स. १९५२, १९५७ आणि १९६२ असे तिन वेळा डॉ. पंजाबराव देशमुख यांची लोकसभेवर निवड झाली आहे. इ.स. १९३२ मध्ये हिंदू देवस्थान प्रॉपर्टी विधेयक आणले गेले. याच प्रमुख उद्दीष्ट होत ते देवस्थानी मालमत्ता शासनाच्या ताब्यात घ्यावी आणि विधायक काम व्हावे. प्राथमिक शिक्षण संघटना डॉ. पंजाबराव देशमुख यांनी शिक्षणाबद्दल फारच हेवा वाटायचा शिक्षण हे सर्वांनीच घेतले पाहिजे अशी त्यांची इच्छा होती आणि म्हणूनच प्राथमिक शिक्षकांच्या समस्या सोडवण्यासाठी त्यांच्यामध्ये काही अडचण येवु नये म्हणून त्यांनी ही संघटना स्थापन केली. ''भूतकाळ विसरा, तलवार विसरा, जातिभेद पुरा, सेवाभाव धरा'' हे डॉ. पंजाबराव देशमुख यांचे ब्रीदवाक्य होते.

****

# बाबांचा संदेश

संदेश बाबांचा ध्यानी धरा
तुम्ही सघंटित व्हा, संघर्ष करा...
अति कष्ट करुनी घ्या शीक्षण
तेच करील तुमचे रक्षण
जगण्यास सुलभ तो मार्ग खरा
तुम्ही सघंटित व्हा, संघर्ष करा...
धनवान असो की संपन्न धनी
येथे उच्च नसो वानिच कुणी
उधळुन जुन्या त्या परंपरा
तुम्ही सघंटित व्हा, संघर्ष करा...
हाती घेवुन एकीचा झेंडा निळा
बंधुभावाने लावु गळ्याला गळा
सुकलेल्या बागेत लावु आशेचा झरा
तुम्ही सघंटित व्हा, संघर्ष करा...
अहंकाराची घालवुया स्वार्थी नशा
समता ममतेने जिंकुया दाहीदिशा
पुढेचे धोके ओळखुन
आतातरी सावरा
तुम्ही सघंटित व्हा, संघर्ष करा...

- अंकीता सं. लेंडे, बी.कॉम भाग-३

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर

कु. कोमल जगताप, बी.ए. भाग २

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १४ ऑक्टोबर १९५६ साली नागपूरात मुक्कामी आपल्या लक्षावधी अनुयायांसह बुध्द धम्माची जी दिक्षा घेतली त्या ऐतिहासिक घटनेस आता ६० वर्षे पूर्ण होत आहेत. धम्म स्वीकारामुळे बौध्द समाजाचा स्वाभिमान जागा होवुन त्यांच्यात एक मुलगामी परिवर्तन आले. माणसे शिकु लागली. नोकऱ्याचाकऱ्यात प्रवेश करु लागली, उचपदद्स्थ होवु लागली. बौध्द समाज लिहु लागला व त्याने लिहिलेले साहित्य जागतिक स्तरावर दखलपात्र ठरु लागले. मुलत: मी पण माणूस आहे व मलाही इतरासारखीच मान सन्मानाची वागणुक मिळाली पाहिजे ही भारवना बौध्द समाजात निर्माण झाली. पण प्रारंभीच्या काळी धम्म स्वीकारामुळे बौध्द समाजात जी एक नवविचाराची क्रांतदर्शी लाट आली होती ती आता काहीशी मंदावत आपला प्रवास परिवर्तनाकडून स्थितीवादाकडे सुरु झालेला दिसतो व ही बाब चिंताजनकच आहे.

डॉ. बाबासाहेबांनी दिक्षाभुमीवरुन बौध्द समाजास दिलेला बुध्द हा विपश्यना ध्यान, समाधी करणारा. बुध्द नसुन तो समाजक्रांतीचे तत्वज्ञान सांगणारा बुध्द आहे. त्यांचा बुध्द हा गुढवादी नसुन तो बुध्दवादी प्रगतशिल आणि समाजनिर्मितीचा भाष्यकरी आहे. बाबांच्या बुध्दास कर्मकांड मान्य नाही. तो समाजनिर्मीतीचा भाष्यकार आहे. बाबांच्या बुध्दास कर्मकांड मान्य नाही तो इहवादी आहे. समतावादी दृष्टीकोन निर्माण करणारा बुध्द समाजाला जातीमुक्त, शोषणमुक्त करणारा बुध्द आहे. पण बाबासाहेबांच्या या परिवर्तनवादी बुध्दाचा विसर पडून बौध्द समाजातील सुस्थापितांचा एक मोठा वर्ग आज विपश्याना म्हणजे बौध्दधम्म होय. असे मानुन डोळे मिटुन विचारशुन्य अवस्थेत बसून ध्यान करु लागला आहे. या सुस्थिर बौध्दाची अंधानुकरण 'नाहीरे' वर्गातील आहे. विपश्यनेचा खरा अर्थ विपश्यना म्हणजेच विशेष दृष्टी असा आहे. बाबासाहेबांनी सामाजिक समातेचा जो देदीप्यमान इतिहास घडविला तो विपश्यना करुन नाही. महात्मा फुलेंनी जी ग्रंथनिमिर्ती केली तो डोळे मिटुन केला नाही.

प्रत्येकाने सामाजिक ऋण फेडले पाहिजे असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सांगुन ठेवले. पण बौध्द मध्यम वर्गीयांना याचाच नेमका सोयवादी विसर पडला कालचा क्रमाजिवी समाजशिक्षण आणि नोकऱ्यामुळे मध्यम जरी म्हणत असला तरी या वर्गाचा राहिलेला नाही. 'बहुजन हिताय, बहुजन सुखाय' या ऐवजी 'स्वहिताय, स्वसुखाय' ही त्यांची घोषणा झाली. राखीव जागांमुळे या वर्गाला व्यवस्थेत एक हक्काची जागा मिळाली. प्रस्थापित व्यवस्थेचा हा वर्ग एक भाग झाल्यामूळे व्यवस्था परिवर्तनाशी त्यांचा संबंधच तुटला. त्यांचे व्यवस्थेशी कुठलेच भांडण राहिले नाही. धम्म परिषदातून भाग घेवून आपण एक धम्म कार्यच करीत आहोत असे लटके समाधान



मिळविण्यात धन्यता माणतो. गावोगाव भरणाऱ्या या धम्म परिषदांचा कर्मकांड वगळता माणसाचा जिवन – मरणाचा बुनियादी प्रश्नांशी काही संबं असतो असे नाही. जागतिकीकरणाची समस्या दलित समाजाचे सामाजिक शैक्षणिक, आर्थिक, प्रश्न, दलित शेतमजुर, भुमीहिनांच्या समस्या, सामाजिक सामजस्य आदि समाजाला भेडसावणाऱ्या ज्वलंत सामाजिक प्रश्नाची चर्चाच परिषदातुन होत नाही. बुध्दास वर्ग शोषण जातीमुक्त बुध्दवादी समाज हवा होता.

या अनुषंगाने धम्मपरिषदातुन चर्चा का होवु नये? पण तो होत नाही समाजात आता हुंडा प्रथा बोकाळत आहे.

बाबासाहेबांची जयंती म्हणजे विचारांचा जागर न ठरता नाचण्या-गाण्याचा उत्सव ठरत आहे. बाबासाहेबांच्या अस्थींचीही मिरवणुक निघत आहे. स्वर्गलोक, पुर्नजन्म, आत्मा, नाकारणाऱ्या बाबासाहेबांच्या आत्म्यास शांती लाभावी म्हणून ६ डिसेंबला परित्राण पाठावी होत आहेत. या सर्व प्रकारांना आंबेडकरवादी बौध्द धम्म संस्कृती म्हणता येईल काय याचा प्रत्येकाने अंतर्मुख होवुन विचार केलेला बरा !

धम्म चळवळीला ही जी ग्लानी आली आहे ती थांबविण्याची जबाबदारी अर्थातच भिख्खु संघाची आहे. बुध्दने समाज परिवर्तनासाठीच भिख्खु संघाची स्थाना केली होती. बाबासाहेबांनी म्हटले धम्मवर जर काही संकट आले तर भिख्खूंना जबाबदार धरावे लागेल. हे भिख्खु लोकांना ज्ञान देता आपला वेळ ध्यानात व आळसात घालवितात पुरातन काळातील भिख्खुंचा सेवाभाव हा आदर्श होता. तक्षशिला व नालंदा विश्वविद्यालयांची त्यांनी स्थापना केली. आपले सम्माजनीय भिख्खू बाबासाहेबांनी सांगितले.

****

---

# महात्मा ज्योतिबा फुले

**–मधुबाला बु. वरडे, बी.ए. भाग २**

महात्मा ज्योतिबा फुले यांचे पूर्ण नाव ज्योतिराव गोविंदराव फुले असे आहे. ते महात्मा फुले या नावाने प्रसिध्द आहेत. ते एक मराठी लेखक, विचारवंत आणि समाजसुधारक होते. महात्मा फुले यांचा जन्म ११ एप्रिल १८२७ रोजी झाला. त्यांचे मुळ गाव सातारा जिल्ह्यातील कटगुण होते. त्यांच्या वडीलांचे नाव गोविंदराव आणि आईचे नाव चिमनाबाई होते. ज्योतिराव केवळ नऊ महिन्याचे असतांना त्यांच्या आईचे निधन झाले. वयाच्या तेराव्या वर्षी सावित्रीबाई यांच्या त्यांचा विवाह झाला. प्राथमिक शिक्षणानंतर काही काळ त्यांनी भाजी विक्रीचा व्यवसाय केला. १८४२ मध्ये प्राथमिक शिक्षणासाठी स्कॉटीश मिशन हायस्कुलमध्ये त्यांनी प्रवेश घेतला. ते अभ्यासात खुप हुशार आणि अतिशय तल्लख बुध्दीचे असल्यामुळे पाच – सहा वर्षातच त्यांनी अभ्यासक्रम पूर्ण केला.

ते आपला अभ्यास मन लावुन करत असत. परिक्षेत त्यांना पहिल्या श्रेणीच गुण मिळत असत. शाळेतील शिस्तप्रीय हुशार, विद्यार्थी म्हणून त्यांचा नावलौकिक होता. सावित्रिबाईंना ख्रिचन यांनी लग्नापूर्वी दिलेले एक पुस्तक त्या सासरी घेऊन आल्या होत्या. त्यावरून जोतिरावांना एक नवा मार्ग सापडला. तेव्हा त्यांनी स्वत: शिकून सावित्रीबाईंना शिकवले.

विद्येविना मती गेली, मती विना नीती गेली,<br>
नीती विना गति गेली, गति विना वित्त गेले<br>
वित्तविना शुद्र खचले, इतके अनर्थ एका अविद्येने केले

महात्मा फुले यांच्या ओळी शिक्षणाचे महत्त्व पटवून देण्यासाठी प्रसिध्द आहेत. समाजातील अज्ञान, दारिद्रय आणि जाती भेद पाहुन त्यांनी सामाजिक परिस्थिती सुधारण्याचा प्रयत्न केला. १८४८ साली पुण्यामध्ये बुधवार पेठेतील भिडे वाड्यात त्यांनी मुलींची पहिली शाळा काढली आणि शिक्षिकेची जबाबदारी सावित्रीबाईंवर सोपवली . त्यांनी लिहीलेल्या "शेतकऱ्याचा आसूड" या पुस्तकातुन महाराष्ट्रातील शेतकऱ्याची दूर्दशा आणि दारिद्र्याची वास्तवता लिहीली आहेत. नीती हाच मानवी जीनाचा आधार आहे हा विचार ज्योतिरावांनी मांडला. माणसाने गुण्यागोविंदाने रहावे असे त्यांचे मत होते.

२४ सप्टेंबर १८७३ साली महात्मा ज्योतीराव फुले यांनी सत्याशोधक समाजाची स्थापना केली. समाजातील विषमता नष्ट करुन तळागातील समाजापर्यंत शिक्षण पोहचविणे हे सत्यशोधक समाजाचे ध्येय होते. २८ नोव्हें. १८९० साली ज्योतिरावांचा मृत्यु झाला. जनतेने त्यांना महात्मा ही पदवी बहाल केली आहे. स्वतंत्रपणे फक्त स्त्रीयांसाठी शाळा काढणारे महात्मा फुले हे पहिले भारतीय होते.



# ताराबाई शिंदे यांचे जीवनचरित्र

कु. श्रुती दि. ढोले, बी.ए. भाग २

ताराबाई शिंदे यांचा जन्म इ.स. १८५० साली व मृत्यु इ.स. १९१० मध्ये झाला. ह्या महाराष्ट्राच्या एक स्त्रियवादी लेखिका व सत्यशोधक समाजाच्या कार्यकर्त्या होत्या. १८८२ साली प्रसिध्द झालेल्या स्त्री-पुरुष तुलना या पुस्तकाच्या त्या लेखिका होत्या.

ताराबाई ह्या बुलडाणा येथील रहिवासी होत्या. त्यांचे वडील बापुजी हरी शिंदे हे एक जमीनदार होते. ते सत्यशोधक समाजाचे सभासद होते. ताराबाई शिंदे यांचे भाऊ, रामचंद्र हरि शिंदे, ज्योतिबांच्या कॉन्ट्रक्टिंग कंपनीत भागीदार होते. त्यामुळे ताराबाईच्या घरात सुरवातीपासूनच स्त्री-पुरुष समानतेचे वातावरण होते. शिक्षणाने त्यांचे व्यक्तिमत्व विकसीत झाले होते. त्या मराठी, संस्कृत तसेच इंग्रजी शिकल्या, शिक्षणामुळे त्यांना वाचनाची आवड होती. स्त्री असुनही घोडा चालवायला शिकल्या.

ताराबाई शेतीच्या कामात लक्ष घालीत तसेच कोर्टाचीही कामे करत ताराबाई स्वभावाने तापट होत्या. ताराबाईना लग्न करण्याची इच्छा नव्हती. पण १९ व्या शतकात मराठा समाजातील, शेतकरी कुटुंबातील स्त्रीला लग्न न करता जीवन जगणे शक्य नव्हते आणि विवाह सुध्दा वडील माणसाच्या सांगण्यानूसार करावा लागे. त्यांचे लग्न एका सर्व सामान्य माणसाबरोबर झाले. परंतु त्यांचा संसार सुखाचा झाला नाही. मुलबाळ होवुनही त्या संसारात रमल्या नाही.

स्त्रियांमध्ये जसे दुर्गूण असतात तसेच पुरुषांमध्येही ते काठोकाठ भरलेले आहेत. हे एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात स्पष्टपणे मांडण्याचे धैर्य दाखवणारी आणि त्यासंबंधीचा जाब समाजाला विचारणारी धडाडीची स्त्री अशी ओळख असणारी होती. किमान हजार वर्षे परंपरेने चालत आलेल्या समाज व्यवस्थेला कारणमिमांसा विचारण्याचे धैर्य दाखवणारी एकोणिसाव्या शतकातील बंडखोर स्त्री म्हणजे ताराबाई शिंदे. त्यांचे वडील महात्मा फुले यांचे सहकारी हाते ते जहाल मतवादी होते. महसूल खात्यात उपायुक्त पदावर ते काम करीत होते.

ताराबाई ही त्यांची एकुलती एक मुलगी पुरोगामी विचारांच्या या मुलीला त्यांनी मराठी बरोबर संस्कृत आणि इंग्रजी भाषाही शिकवल्या होत्या. ताराबाई या अतिशय बुध्दीमान बहुश्रुत, वादकुशल, स्त्रियांच्या दु:खाविषयी अत्यंत आस्था आणि कळवळा बाळगणाऱ्या होत्या. महात्मा फुले यांचे विचार त्या स्वतः आचरणात आणत असत. ताराबाईचे विवाहविषयक मत विचारात न घेता त्यांच्या वडीलांनी ताराबाईचे लग्न अत्यंत सामान्य पुरुषाबरोबर घरजाव लावून दिले. ताराबाईच्या वाचन दांडगे होते. समकालीन वृत्तपत्रे, नियतकालिके, वैचारिक निबंध, ग्रंथ, संत कवियत्रींच्या रचना, पंडिती काव्य, महात्मा फुले आणि विष्णूशास्त्री चिपळुणकरांचे लेखन यांचा त्यांना अभ्यास होता. प्रतिष्ठित जमीनदार मराठा कुटुंबात त्या जन्माला आलेल्या आणि वाढलेल्या असल्यामुळे अश्या कुटुंबातील चालीरीती त्यांना चांगल्या माहित होत्या.

वडीलांच्या नोकरीमुळे कार्यालयीन कामकाजाच्या वेळा, कामाच्या पद्धती, स्वरुप, वरीष्ठ कनिष्ठांचे परस्परांशी असणारे नाते, परस्परांशी चालणाऱ्या कारवाया, खरेखोटे व्यवहार, माणसातील हेवेदावे, लोभ, मत्सर हे सारे त्यांना जवळुन पाहीले होते. त्या अनुभवाचे प्रतिबिंब त्यांच्या लेखनात उमटलेले दिसते. ताराबाईची क्षमता आणि योग्यता महात्मा फुले यांना यथार्थपणे जाणवली होती. त्यांच्या बुध्दीची तीक्ष्णता आणि अभिव्यक्तिची सहजता त्यांनी ओळखली होती आणि म्हणूनच महात्मा फुले यांच्या 'सत्सार' या अनियतकालिकांच्या दुसऱ्या अंकात ताराबाईचे मनापासून कौतुक झाले. ताराबाईनी स्वतः शेत जमीनीचे व्यवहार लक्षपूर्वक आणि कर्तबगारीने पाहीले होते. असं ताराबाई शिंदे यांचे व्यक्तिमत्त्व स्त्रियांसाठी प्रेरणादाई आहे.



# मराठी कवितांमधला निसर्ग !

मंगेश एम. खंडारे, बी.ए. भाग ३

साहित्य-संगीत-कला यांची आवड व गती असणाऱ्या माणसांच्या कार्यात निसर्ग निसर्गतःच डोकावतो. अगदी आपल्यासारखा सामान्य शहरी माणसालाही त्याचे अप्रूप आहे. म्हणून आपल्या मराठी कवितांमधून भेटणारा निसर्ग या लेखातून उलगडण्याचा प्रयत्न आहे.

'दिवाळी' म्हणजे सणांची राणी आणि दुधात साखर म्हणजे त्याबरोबर येणारं आल्हाददायक हवामान ! श्रेष्ठ कवी बा.भ. बोरकरांच्या काही शेवटच्या कवितांपैकी ही कविता या कार्तिकातल्या रम्य रात्रींना अक्षरशः डोळ्यासमोर आणून ठेवते. ते म्हणतात.

'समुद्र बिलोरी ऐना... सृष्टीला पाचवा म्हैना...वाकले माडांचे माथे.. चांदणे पाण्यात न्हाते.... आकाशदिवे लावीत आली... कार्तिक नौमीची रैना... या सुंदर शब्दांबदद्ल अजून काही लिहिणं म्हणजे अरसिकताचा ह्या शारद सुंदर चंदेरी राती म्हणजे चंद्रकलेची वाढणारी विरणारी शोभा निरभ्र आकाशात पाहायची संधी ! शारदशोभा येते-जाते आणि गुलाबी थंडीच रुपांतर गारण्यात होतं. 'माघाची थंडी अंगावर काटा आणते ती इथे देशावर असामी-असामी मधे पुलं म्हणतात, तसे मुंबईला मात्र ऋतु दोनचं... उन्हाळा नि पावसाळा. पण त्यांचे आवडते कवी बा.सी मर्ढेकर मुंबईच्या हिवाळ्यातील पहाट आपल्याला अशी दाखवतात.

''न्हालेल्या जणू गर्भवतीचया सोज्वल मोहकतेने बंदर'' मुंबापुरीचे उजळत येई माधामधली प्रभात सुंदर सचेतनांचा दुरुप शीतल अचेतनांचा अवास कोवळा हवेत जाती मिसहून दोन्ही पितात सारे गोड हिवाळा !'' यानंतरचे हेमंत-शिशिर फारसे भाव खाऊन जात नाहीत पण गदिमांच्या काव्यप्रतिमेला तेही वर्ज्य नाहीत. सुंदरश्या वसंतापर्यंत तेच आपल्याला घेवुन जाणार असतात. ''हेमंती तर नुसली हिरवळ, शिशिर करीया शरीर। दुर्बळ पुन्हा वसंती डोलू लागे प्रेमांकित केतू... जीवलगा कधी रे येसील तू ''निसर्गपक्षी'' हा सुजाता दामोदर भाटकर यांचा ललित लेख संग्रह आहे. गोमंतकिय मराठी नियतकालिकांतून त्यांचे हे लेखन वेगवेगळ्या वेळी प्रसिध्द झालेले असले तरी पुस्तकरुपाने ते पहिल्यांदाच प्रसिध्द होत आहे. हिरवळ आणि पाण्याने नटलेल्या विविध रंगरुपरुचींनी समृध्द असलेली फळे आणि रंगरुपाच्या विविध छटांनी नटलेली फुले यांनी बहरलेल्या गोव्याच्या मातीत लेखिकेचं आजवरचे आयुष्य गेले. गोव्याच्या मातीत रुजलेल्या आणि वाढलेल्या झोडेझुडपे, वेली यांचे सौंदर्य डोळ्यांत साठवित लेखिका लहानाची मोठी झाली. या विविध झाडाझुडपांच्या अंगा खाद्यावर खेळणारे, घरटी बांधून वस्ती करणारे तऱ्हेतऱ्हेचे लहानमोठे पक्षी, त्यांचे चित्रविचित्र आवाज, ज्यांचे अंडी,त्यांच्या पिलांचा जन्म आणि त्यांचे उडायला शिकणे अशा गोष्टींनी लेखिकेचे कुतूहल पूर्ण आणि चिकित्सक मन सतत भारले गेले. या भारलेपणातून तिच्या मनाला जे सौंर्द जाणवले. विविध कोनांतून आपल्या भोवतालचा निसर्ग तिला जसा आढळला त्याचे तिने केलेले शब्दबध्द रुप म्हणजेच हे ललित लेख लहानपणापासून कुतूहलाचा विषय असलेला गोव्याचा निसर्ग, पाणी-पक्षी - झाडे झुडपे - वेली इत्यादी त्याचा विविध घटकांतून समजून घ्यायचा, वाढत्या वयाला उमगलेले त्या निसर्गाचे सौंदर्य आकळून घेतांना त्याच्याशी असलेले आपले नाते ही उलगडून पहायचे असा लेखिकेचा सतत चालू असलेला प्रयत्न आहे. या प्रयत्नालाच या विविध लेखांतून व्यक्त रुप मिळाले आहे.

''माझे मन निसर्गात प्राण्यांत आणि झाडांत रमणारे आहे''. असे मितू मितू पोपट' या लेखात लेखिका म्हणते म्हणूनच हे 'निसर्गाच्या काव्याचे रमणीय सर्ग' ती एका विलक्षण अंतरिच्या ओढीने समरसून पाहाते. या संग्रहातील विविध लेखांतून येणाऱ्या तऱ्हेतऱ्हेच्या वेली, वृक्ष, वेगवेगळे पक्षी, विविध प्रकारचे लहानमोठे जीव प्राणी यांच्या नावांची केवळ नोंद जरी वाचकाने केली. तरी त्याच्या मनासमोर आपल्या भोवतालच्या निसर्गाच्या सौंदर्याची समृध्द तिळा उघडते. गोव्यातील निसर्गाचे हे विविधरंगी सौंदर्य पाहून तो थक्क होतो.

पण मनुष्य आता खुप प्रगत झाला आहे. त्याच्या कडे सगळे काही आहे पण तो आता निसर्गाला विसरला असे काहीसे म्हणता येईल. वेगवेगळे ऋतु, प्राणी, वनस्पती, नद्या, नाले, झरे, पर्वतरांगा, पाऊस, अशा शेकडो गोष्टी या निसर्गात आहे. निसर्गाचे रक्षण करणे गरजेचे आहे. तो आपला एक आयुष्यभराचा सोबती आहे. (संकलित लेख)



# लोकमान्य टिळकांचे केसरीतील लेख

योगीता आर. सलामे, बी.ए. भाग २

काव्येतिहास संग्रहाची जी अवस्था झाली व त्याच्या पूर्वार्धाची जी होत आहे तीच त्याच्या ह्या 'उत्तर भागा' ची ही होईल. हे मराठ्यांच्या इतिहासाचा व भाषेचा अभिमान बाळगणाऱ्या प्रत्येक गृहस्थाने लति ठेविले पाहीजे. मराठ्याच्या इतिहासात महत्त्वाचे कोणते भाग आहेत व त्यापासून आम्हांस कोणता उपयोग होण्यासारखा आहे. हा इतिहास राष्ट्राचा आहे का व्यक्तीचा आहे, मराठ्यांनी जे पराक्रम केले ते धर्मप्रेरणेने केले किंवा स्वातंत्र्य संपादण्याकरीता केले, जे गुण अव्वल मराठेशाहीत महाराष्ट्रात दिसत होते ते आता लुप्तप्राय झाले की काय . कोणत्या प्रसंगातून कशा युक्तीने आम्ही आपली सुटका केली आमच्या राष्ट्राची उन्नति होण्यास कोण कारणीभूत झाले. त्या काय काय युक्त्या योजाव्या लागल्या आणि ज्यांनी या कामी आपल्या देशबांधवाचे हित लक्षात न आणता अडर्थळे आणिले त्यांचे निवारण कसे करावे. लागले. किंबहुना दीड पावणदोनशे वर्षापर्यंत महाराष्ट्रातच नव्हे , तर सर्व हिंदुस्थानभर आमच्या वीरांनी जो पराक्रम गाजविला त्याचे मूळ बीज व साधने कोणती व पर्यवसान काय झाले याची सकारण, सशास्त्र व मार्मिक माहिती करुन घेवुन त्या वरुन आमच्या भावी स्थितीसंबंधाने काही अनुमान करीता येण्याजोगे असल्यास ते करावे. निदान या इतिहासावरुन जेवढा बोध घेण्यासारखा असेल तेवढा लोकास करुन द्यावा अशी इच्छा अलीकडे पुष्कळास होवु लागली आहे. हे ज्याने गेल्या दोन चार वर्षातील महाराष्ट्र देशातील चळवळीचे व इतिहास ग्रंथाचे अवलोकन केले असेल त्यास तेव्हाच कळून येईल. मराठ्यांचा इतिहसाची जी अभिरुचि अव्वल इंग्रजीत फक्त इंग्रज लोकातच आढळून येत होती. परंतु अलीकडे कै. विष्णुशास्त्री चिपळुणकर यांनी महाराष्ट्रातील लोकांच्या विचारसरणीस जे वळण लाविले त्यामुळे आपल्या इतिहासाबद्दलची आस्था व अभिमान ही विशेष जागृत होवुन त्याची फळे ही आपल्या नजरेस येवु लागली आहेत. व यातीलच भारवर्ष हे एक फळ होय. या मासिक पुस्तकाच्या चौसष्ट पृष्ठापैकी चोवीस पानें जुन्या बखरी, ऐतिहासिक पत्रें, यादी यांच्या प्रकाशनार्थ देण्याचा मासिक पुस्तककर्त्याचा हेतु आहे. बाकी आठ पाने पत्रव्यवहाराकरिता, व बत्तीस पाने वाङ.मयात्मक किंवा ऐतिहासिक स्वतंत्र निबंधाकरीता राखून ठेविली आहेत. पहिल्या दोन अंकास 'मराठ्याच्या इतिहासाची सामुग्री' व 'ऋग्वेद' हे दोन विषयक आलेले चांगले आहेत, तथापि भारतवर्षासारखे पुस्तक होईल तितके ऐतिहासिक बखरी, जुने कागद किंवा निबंध यांच्या प्रकाशानार्थच चालावे असे आमचे मत असल्यामुळे ऋग्वेदासारख्या विषयांवरील निबंधाचा संग्रह या पुस्तकात न झाल्यास त्या पासून पुस्तकाची योग्यता काही कमी होईल असे आम्हास वाटत नाही. काव्येतिहास संग्रहात, मराठी कविता, संस्कृत काव्ये आणि महाराष्ट्र इतिहास या इतर प्रांतांत तेथील भाषावृध्दीविषयी जे प्रयत्न चालले आहेत तितकेही मराठी भाषेसंबंधाने महाराष्ट्रात नाहीत ही मोठी दु:खाची गोष्ट आहे.

जी मराठी भाषा एके काळी महाराष्ट्रातच काय पण म्हैसूर, कर्नाटक, हैद्राबाद, गुजराथ, बडोदे, माळवा, मध्यप्रात वैगरे दुरच्या प्रातांतूनही राजकीय भाषा म्हणून प्रचलित होती, ती आता त्या ठिकाणाहून हुसकून खुद्द महाराष्ट्रातही परकी होवु पहात आहे. ही गोष्ट महाराष्ट्रात भाषेच्या पुत्रास अत्यंत लाजिरवाणी आहे. सरकारी बुक-कमिटी क्रमिक पूस्तकात फेरफार करुन लागताच "बुध्दि ऱ्हस्व असावी की दीर्घ असावी, 'पाणी' सानु-सासिक की साधेच लिहावे, 'विद्यान' याचा पाय मोडावा की न मोडावा, वगैरे व्याकरण वाद करण्यास जी मंडळी एकदम पुढे सरसावली त्यांनीच मराठीची खरी अभिवृध्दी करण्याकरिता आजपर्यंत काय प्रयत्न आहे व पुढे काय करण्यास तयार आहेत याचा ही खुलासा केल्यास बरे पडेल. बंगालात बंगाली बोलणारे निदान चार साडेचार कोटी लोक आहेत. तेथे शेकडो ग्रंथ निघत आहे बंकिमचंद्रासारखे कादंबरीकार, रविंद्रासारखे आधुनिक कवी व हितवादी सारखी ३५/४० हजारांनी खपणारी वर्तमानपत्रे निजपत आहेत. गुजराथी ज्ञानप्रसारक मंडळी आणि गायकवाड - प्रभुति गुजराथेंतील राजे लोक गुजराथी भाषेला आज कित्येक वर्षे उत्तेजन देत आहेत. उर्दूकरीता निदान हैद्राबादचे निजाम सरकार व अलिगड लखनौं येथील मुसलमान जातीने खटपट करीत आहेत. हिंदी भाषेच्या अभिवृध्द्यर्थ नागरी-प्रचारिणी-सभा नावाची सस्था बनारस येथे स्थापन होवुन भाषा सेवेचे कार्य चालु आहे.



(संकलित लेख)

# पर्यावरणावर प्रदूषणाचे दुष्परिणाम

कु. निकीता रा. मेश्राम, बी.ए. भाग २

आज पर्यावरण प्रदुषणाची समस्या केवळ भारतापुरती मर्यादित नसून ही समस्या संपूर्ण विश्वाला भेडसावत आहे. आज प्रत्येक आई -वडिलांनी आपल्या मुलांना प्रदुषणाचे विविध प्रकार, प्रदुषणाची कारण त्यावरचे उपाय याविषयी अवगत करायला हवे. आज आपण रहातो त्या जगाची सर्वात मोठी समस्या प्रदुषण ही झाली आहे. आपल्या आसपास जे घाणीचे साम्राज्य पसरले आहे त्यातुन हे प्रदुषण जन्मास येते. या प्रदुषणाच्या विळख्यात केवळ मनुष्य प्राणी अडकलाच असे नव्हे तर समस्त जीवजंतु आणि जीवसृष्टी याच्या दुष्परिणामांचा सामना करते आहे. गेल्या काही दशकांमध्ये प्रदुषणाचे प्रमाण इतके वाढले आहे की मानवी जीवनच संकटात सापडले आहे. या समस्येवर गांभिर्याने विचार केला गेला नाही तर तो दिवस दुर नाही जेव्हा दररोज प्रदुषणामुळे कुणा न कुणाचा मृत्यु होईल आणि एक दिवस या जगाचे अस्तित्वच नामशेष होईल. जेव्हा दुषित तत्व प्रकृतिच्या परिघात प्रवेश करतात आणि पर्यावरणाला हानी पोहोचवतात त्यामुळे नैसर्गिक संतुलन पूर्णतः बिघडुन मनुष्याला शुध्द वायु, शुध्द पाणी आणि शांत वातावरण मिळत नाही तेव्हा त्याला प्रदुषण अस म्हटले जाते. या प्रदुषणामुळे अनेक गंभीर समस्या जन्म घेतात. याचा दुष्परिणाम केवळ आपल्या दैनंदिन जीवनावरच होतो असे नव्हे, तर अनेक गंभीर आजार प्रदुषणामुळे निर्माण होतात. ग्लोबल वार्मिंग सारखी समस्या यातुनच निर्माण झाली आहे. आज मनुष्य आपल्या सुखासीन जीवनाकरता अनेक आरामदायक, सुखसुविधा देणाऱ्या उपकरणांचा वापर करतो आहे. परंतु त्यामुळे निसर्गाचे संतुलन ढासळते आहे आणि प्रदूषण आपल्या घरणसिमेपर्यंत पाहोचले आहे. आजच्या विज्ञान तंत्रज्ञानाच्या विकासामुळे मानवी क्षमतेत मोठ्या प्रमाणात वाढ झाली असून मनुष्य या उपकरणांच्या सुखसुविधेत गुरफटला गेला आहे. त्याला या क्षणिक सुख देणाऱ्या उपकरणांची इतकी सवय झाली आहे की, याच्याशिवाय तो आपल्या आयुष्याची कल्पना देखील करु शकत नाही. परंतु या मानव निर्मित उपकरणांमुळे निसर्गाची अपरिमित हानी होत असुन प्रदुषणाची समस्या निरंतर वाढते आहे. त्यामुळे आज या प्रदुषणाच्या समस्येवर



अंकुश निर्माण करण्याची आणि समाजाचे लक्ष याकडे केंद्रीत करण्याची नितांत आवश्यकता आहे. स्वच्छ शुध्द वातावरणात राहिल्याने केवळ मनुष्य स्वस्थ समाजाची देखील निर्मीती होते. शुध्द वातावरण म्हणजे प्रदूषणरहित वातावरण आहे. आपण सर्वजन मिळून जो वर वातावरण स्वच्छ ठेवण्याचा प्रयत्न करणार नाही, तोपर्यंत केवळ अस्वच्छता आणि प्रदुषण पसरत राहील. वाढत्या प्रदुषणावर नियंत्रण मिळविण्यासाठी यांचे दुष्परिणाम आणि त्यापासुन वाचण्याचे उपाय याविषयी समजुन घेणे अत्यंत आवश्यक आहे. तेव्हाच या प्रदूषणाच्या समस्येवर आळा बसु शकेल. आज पूर्ण पृथ्वीवर वायु प्रदूषणाची गंभीर समस्या निर्माण झाली आहे. वायु प्रदूषणामुळे मानवाला शुध्द हवा मिळत नाही आणि परिणामी दमा, अस्थमा सारख्या श्वसना संबंधीत अनेक आजारांचा त्याला सामना करावा लागतो. वास्तविक जेव्हा आपल्या वायुमंडलात जैविक, रासायनिक, सुक्ष्म असे अनेक तऱ्हेचे विषारी पदार्थ प्रवेश करतात तेव्हा त्याला वायु प्रदुषण असं म्हटल्या जातं. या दुषित तत्वामुळे वायु दुषित होतो. आपल्या वायुमंडलात एका निश्चित मात्रेत अनेक गॅस असतात पण तेव्हा दुषित तत्व या वायुमंडलात प्रवेश करतात तेव्हा या गॅसचे संतुलन बिघडते आणि त्यामुळे वायुप्रदुषण होण्यास सुरुवात होते. वाढते औद्योगिकीरण अनियंत्रित लोकसंख्या, कमी होत जाणारे जंगल आणि वाहनांचा अत्याधिक वापर यामुळे वायुप्रदुषणाची समस्या सतत वाढत आहे.

जल प्रदूषण ही आजच्या युगाची सर्वात मोठी समस्या झाली आहे. त्याचा विपरीत परिणाम मनुष्याच्या आरोग्यावर होवु लागला आहे. पिण्याचे जलस्त्रोत प्रदूषित होत आहे. प्रदुषणाच्या समस्येवर वेळीच नियंत्रण मिळवता आले नाही तर येणाऱ्या काळात फार मोठी किंमत आपल्याला चुकवावी लागेल. त्यामुळे वेळ असता सजग सावध लोकांमध्ये जागरुकता निर्माण करण्याची आवश्यकता आहे. ठिकाठिकाणी शिबीराचे आयोजन करुन लोकांना एकत्र करुन जास्तीत जास्त झाडे लावण्यासाठी प्रोत्साहीत करा. वातावरणात स्वच्छता ठेवा. कोणत्याही प्रकारचे प्रदुषण असो ते हानिकारकच असते. त्यामुळे प्रदुषणाच्या समस्येवर चिंतन करण्याची आवश्यकता आहे आणि हे तेव्हाच संभव होईल जेव्हा संपूर्ण समाज एकजुटीने पर्यावर स्वच्छ ठेवण्याचा संकल्प करेल आणि जास्त वृक्ष लागवड करुन आपल्या पृथ्वीला हिरवीगार करेल.

# स्वराज्य संस्थापिका: राष्ट्रमाता जिजाऊ

साक्षी दि. वासनकर, बी.ए. भाग ३

सिंदखेड राजा येथील लखूजीराव जाधव आणि म्हाळसाबाई यांच्या पोटी दि. १२ जानेवारी १५९८ रोजी एक कन्यारत्न जन्माला आले. त्या कन्येचे नाव जिजाबाई असे ठेवले होते. लखूजी जाधव हे निजामशाहीमध्ये जहांगीरदार होते तर त्यांचे चार पुत्र म्हणजेच जिजामातेचे भाऊ दत्ताजी, अटालोजी, रावोजी, बहादुरजी हे देखील निजामशाहीमध्ये सरदार होते. अशा शौर्यवान घराण्यात जिजाबाई यांचे संगोपन झाले. त्यामुळे मुलगी असूनही त्यांना शस्त्र आणि शास्त्राचे देखील शिक्षण देण्यात आले होते. त्यामुळे जिजाबाईमध्ये बालवयापासूनच राजकीय महत्त्वकांक्षा होती. माँ जिजाऊ मध्ये करारीपणा,आत्मविश्वास, करुणा, मुत्सदिपणा, तीव्र आत्मसंयम, कणखर मनोवृत्ती, तल्लख बुध्दीमत्ता, निस्वार्थ वृत्ती, स्वाभिमानी, मानवतावादी, विज्ञानवादी, परिवर्तनवादी विचार अशा अनेक गुणांचा जीवीत संगम होता. पूढे जिजाबाईचा विवाह देवगिरीचे मालुजी भोसले यांचे पुत्र शहाजीराजे यांच्याशी १६०५ साली झाला. या काळात स्त्रियांना कोणत्याही प्रकारचे स्वातंत्र्य नव्हते. तेव्हा कोणताही निर्णय घेण्याचा अधिकार नव्हता. तिला केवळ स्वत:चे मत व्यक्त करण्याचा अधिकार नव्हता. तिला केवळ चुल आणि मुल यामध्येच गुरफटून ठेवले गेले होते. असा काळात ही वीरमाता मात्र या देशातील अन्याय व अत्याचार मातीत गाडण्याचे स्वप्न पाहत होती. देशात राजकीय आणि धार्मिक गुलामगिरीने धुमाकुळ मचवला होता. त्यामुळे येथे माणसांना माणूस म्हणून जगण्याचा अधिकारच उरला नव्हता. या भिषण परिस्थितीचे अवलोकन करुन जिजाबाई वाटायचे की, या दोन्ही गुलामीचा मुकाबला करुन आपणच येथील माणसांना गुलामगीरीतून मुक्त करावे. शहाजी राजे व लखूजीराजे यांना एकत्र आणून मुघल सत्तेला शह देण्याची योजना जिजाबाई आखत होत्या. परंतु दुर्दैवाने लखूजी राजांना विश्वासघाताने गमावल्यानंतर खचून न जाता जिजाऊ मोठ्या जिद्दीने पूढे मार्गक्रमण करीत होत्या. शहाजीराज्यांच्या खांद्याला खांदा देवून स्वराज्याचे स्वप्न पूर्ण होवू शकले नाही. पण स्वराज्यातील सर्वसामान्य रयतेच्या जीवनातील दु:ख संपवून त्यांच्या चेहऱ्यावर समाधानाचे व आनंदाचे हास्य निर्माण करण्यासाठी अहोरात्र कष्ट करुन त्यासाठी स्वत:च्या मुलांना अनेकवेळा जिवघेण्या प्रसंगाला सामोरे जाण्याचे बळ देवून आदर्श संस्कारांच्या व भक्कम प्रेरणेच्या बळावरच शिवरायांचा ता. ६ जून १६७४ रोजी राज्यभिषेक करुन घेतला आण या महाराष्ट्रात स्वराज्य निर्माण केले.



प्रत्येक घरात शिवाजी निर्माण करु शकतो. वीरपत्नी, विरकन्या, वीरमाता, वीरआजी अशा अनेक भूमिका यशस्वीपणे पेलणारी वीरांगणा, वीरनायिका म्हणजेच राष्ट्रमाता जिजाऊ म्हणूनच आज जिजाऊचे विचार या देशात प्रत्येक घरात शिवाजी निर्माण करु शकतो. त्यासाठी आमच्या आजच्या मातांनी हा विचार अंगीकारावा. तो आत्मसात करुन त्या विचारानुसार आपली वाटचाल करावी. त्यांचा विचा जिवंत ठेवणे हेच खऱ्या अर्थाने या मातेसाठी अभिवादन ठरेल. बहुजन समाजांना जोडण्याचे काम जिजाऊंचीच प्रेरणा घेवुन आज मराठा सेवा संघ डॉ. पुरोषोत्तम खेडेकर साहेबांच्या नेतृत्वाखाली कार्यरत आहे. वेगवेगळ्या जाती धर्मातील विचार एकत्र करीत बहुजन समाजाला जोडण्याचे काम मागील ३० वर्षापासून सुरु आहे. जिजाऊंच्या समाधीस्थळी दरवर्षी ता. १७ जून रोजी राज्यभारतील मावळे एकत्र येवून ते जिजाऊंना नमन करतात. जिजाऊ वंदना गातात आणि जिजांऊंची प्रेरणा घेतात. जिजाऊचा स्मृतीदिन त्यानिमित्य त्यांना विनम्र अभिवादन .... !

# मोबाईलच व्यसन

कु. ऋतुजा ग. कावल, बी.ए. भाग ३

हल्ली मोबाईल चे वाढते प्रमाण लहानांपासून मोठ्यांपर्यंत सगळ्यांनाच वेड लावले. या मोबाईल ने अगदी चिमुरडी मुले पण मोठ्या शिताफिने मोबाईल वापरतात. काहींना खुपच गमंत वाटते. ईवले ईवले हात कसे पटापट हा मोबाईल वापरतात म्हणून आणि इथेच ही मोठी माणसे चुकतात छोट्यांना वाटत की आपले कौतुक करतात म्हणजे आपण नक्कीच काहीतरी खास करत आहेत. पण त्याचे होणारे तोटे त्याचे काय हो ? कधी विचार केला का ? काय भयानक परिणाम होतो तो ? लहान मूल रडायला लागले की मोबाईल दिला जातो त्यामुळे ते लगेच गप्प होते आणि आपण म्हणतो जाउदे ५ मिनिटाने काय फरक पडणार आहे बघु देत पण त्याची सवय लागली की ही काही मिनिट्स कसे तासात बदलत जातात कळंत नाही. हल्ली बऱ्याच लहान मुलांना चष्मा लागतो. किती चुकीचे आहे बरं पालक परत तिथे पण कौतुक करतात अशीच फ्रेम घेऊ, छान दिसायला हवे अन यावर काय बोलव कळत नाही. बर लहान मुलांची अक्कल काय हो? आपल्या फ्रेंड सारखा चष्मा हवा म्हणून पण हट्ट करतात आणि कोणी सल्ला दिला एवढा मोबाईल बरा नाही तर परत उत्तर ठरले असते, आहे त्यांच्या शाळेत एक तास हे ॲप दाखवत. शिकवत असतात. आम्हाला शाळेत सांगितले आहे ते ॲप घ्यायला. यामुळे त्याला सवयच झाली, अन् दिला नाही ना फोन तर त्याने टिव्ही च फोडला आमचा ! आणि ५-६ मोबाईल चक्क वरुन खाली फेकून दिले. (आता ही बाब कौतुक करायची आहे का ?) पण हल्ली सगळीकडे नको त्या गोष्टींची कौतुक जास्त होतात आणि खरच हा अतिरिक्त वापर खरच थांबायला हवा.

आता मोठ्या माणसांच्या बाबतीत ही असे घडते की, मोबाईल हातात नसेल तर करमत नाही. मोबाईलचे फायदे पण आहेतच. त्यामुळे आपण जवळच्या माणसांशी बोलु शकतो, संबंध जपून राहतात, रस्ता शोधायला मदत होते. कोणाचे काही अडत नाही, अजून बरेच काही. पण कोणत्याही गोष्टीचा अतिवापर झाला की ते व्यसन बनून जाते. गेट टूगेदरच्या नावाखाली लोक जमत असतात आणि मग सारखे फोटो काढतात. कशाला तर व्हॉटॲप स्टेटससाठी एकाने केले म्हणून दुसरा करतो आणि व्यसन वाढत जाते. घरात माणसं एकत्र नावाला असतात हो, जेवण करतात, अंघोळ करतांना अगदी सगळी कडे तो हवा. सर्व जग हातात आल्य,



मोबाईल मुळे, पण घरा घरातील संवाद नाहीसा होत चालला आहे. गप्पांची जागा आता चॅट ने घेतली आहे, रस्ता दाखवणारा मॅप आहे, कारण आमच्याकडे नवनवीन ॲप आहेत आता पत्र कोणी पाठवत नाही कारण काम करायला व्हाट्ॲप आहे.

मैदान ओस पडलेत कारण सर्व खेळ खेळायला मोबाईल आहे. बसल्या जागी सर्व करता येते. कशाला करायची मेहनत ? तरुण मुले यांना तर मोबाईल म्हणजे जीव की प्राण. कारण जे नको म्हटले जाते ते सर्व मोबाईल वापरुन लगेच समजते. त्याचा फायदा होतो पण नुकसान पण होतेच. त्यांच्यासाठी ही माया नगरीच सहज ओढत जाते आणि नको ते होवुन बसते, कितीतरी भयंकर गेम ज्यांनी अनेक लोकांना आत्महत्या करण्यासाठी भाग पडले. खरच खुपच विचित्र दुनिया जर व्यसन लागले तर आणि त्याला योग्य समजते त्याचा विचार साठी सुवर्ण संधी असतात या मोबाईल मध्ये, कॅमेरा आल्यापासून नुसता फोटोचा दिखावा. असं सगळी कडे सुरु आसतो. अरे ज्या आठवणी मनात साठवण्यात मजा आहे ती कशात नाही. मोबाईल खराब झाल्या की गेल्या सर्व आठवणी पण मनाचे तसे नसते हो. असे एकुण काय मोबाईल ची सवय सगळ्यांना असतेच युक्त त्याचे व्यसन होवुन देवु नका. एवढच बाकी काय हो सगळ्यां सारखे आपण ! बरोबर की नाही, कारण मोबाईल नसता तर इतरां सोबत ऐक्टीव्ह राहणे, कनेक्ट राहणे पण झाले नसते आणि जेव्हा सुचत तेव्हा आपला हा मित्र मोबाईल हो हवंच ना.

# माझी न राहिले मी
## तृप्ती नवारे

प्रिती भिमराव घोरपडे, बी.ए. भाग १

'साहित्य विहारच्या' (नागपूर) प्रत्येक कार्यक्रमात अतिशय उत्साहाने हजेरी लावणारी व सहभाग घेणारी एक नव्या दमाची, नव्या पिढीची तडफदार कवयित्री म्हणुन तृप्ती नवारे यांच्याशी माझी ओळख झाली. प्रत्येक सादरीकरणानंतर ''माझी कविता कशी वाटली सर ? '' अस अतिशय विनम्रतेन मला विचारणाऱ्या तृप्ती नवारे माझ्या अधिक लक्षात राहिल्या ते त्यांच्या लेखन सातत्यामुळे, लेखन वैविध्यामुळे शिवाय एक पत्नी, सुन, गृहीणी, आई आणि नोकरी करणारी स्त्री अशी विविध आघाड्या सांभाळत त्यांनी आपल लेखन जोपासल आहे याचे मला विशेष कौतुक वाटत. अशा अनेक आघाड्या सांभाळत लिहिल्या राहणाऱ्या किती तरी स्त्रिया आहेत. मात्र तृप्ती नवारे ह्यांच लेखन जरा वेगळं हटके आहे. अस मला नेहमी वाटत आल आहे. मी त्यांच्या कविता वाचल्या आहेत. (कविता संग्रह 'मन' आणि काय सांगते कविता) अतियस हळव्या भावविभोर करणाऱ्या, सकारात्मकतेकडे नेणाऱ्या त्यांच्या कविता मला नेहमीच आवडल्या आहेत. त्यांच्या कवितांमध्ये एक प्रकारच आश्वासन असतं अस मला वाटतं.

विविध वृत्तपत्रातुन प्रसिध्द होणारे त्यांचे ललित लेखन सुद्धा एक वेगळा आनंद व अनुभव देणार असतं. परवा त्यांच्या लेखाचे हस्तलिखित घेवुन त्या माझ्याकडे आल्या आणि म्हणाल्या, ''सर लेख संग्रह काढतेय-'माझी न राहिले मी' २६ लेख आहेत. तुमची प्रस्तावना हवीय' त्यांना नाही म्हणणं मला शक्यच नव्हत कारण दोन हाती एक म्हणजे त्यांच्या लेखनाबद्दल मला वाटणारी उत्सुकता व आत्मीयता आणि दुसर म्हणजे त्याच्या लाघवी व विनम्र स्वभाव.

तृप्ती नवारे ह्यांचे संगळे लेख मी वाचले आणि लक्षात आल की हे एक आगळ वेगळ रसायन आहे. त्यांच लेखन बहुढंगी, बहुपेडी, बहु आयामी आहे. त्यात जीवनावर भाष्य आहे. जीवनाचे तत्वज्ञान आहे, जीवनाकडे बघण्याचा दृष्टिकाने आहे. विजगीषा आहे, जीवनाचा आस्वाद घेण आहे, सौंदर्याचा आस्वाद घेण आहे, आदर्शाच्या प्रास्थापनेची आस आहे, सकारात्मकता आहे, प्रयोगशीलता आहे, आशावाद आहे, लेखन दोन प्रकारे करता येत. प्रवाहाचा एक भाग बनुन किंवा प्रवाहाच्या बाहेर राहुन तृप्ती नवारे जेव्हा प्रवाहाचा एक भाग होवुन लिहीतात तेव्हा ते थेट जीवनाला भिडणारे साहित्य असतं म्हणून त्यांचं विशेष स्वागत.

साहित्यात त्या लेखकाचे व्यक्तित्व प्रतिबिंबीत होण अपरिहार्य असतं. तिथ फारस खाजगी अस काही असत नाही. लेखक ओपन बुक म्हणून स्वत:ला पेश करत असतो. जे नव्हे तर घेत जाती एकावेळी ती स्वत:शी व त्याच्या अभिव्यक्तिशी जितका प्रामाणिक राहून लेखन करतो. तितकं त्यांचे लेखन जिवंत आणि प्रत्ययकारी होत. तृप्ती नवारे यांच्या लेखामध्ये मला हे गुणविशेष आढळले. त्यांच्या लेखनातले मला नेहमी जाणवणारे आणखी एक वैशिष्ठ ज्याचं मला नेहमी कौतुक वाटत आलेले आहे. त्याचे लेखन हुकुमी आहे म्हणत काळ, वेळ, प्रसंग पाहुन त्यावर तत्काळ समर्पक व नेमके लिहीणे हे फार कमी लेखकांना साध्य होत. आपल्याला कशावर कोणावर लिहायचं आहे, प्रसंग कोणता, कसा आहे याच भान ठेवुन त्या लिहितात. महत्त्वाचं म्हणजे असं असुनही त्यांच चिंतन सखोल व पुरेस गंभीर आहे. मला असंही वाटतं की प्रत्येक लेखक लिहिण्यापूर्वी स्वत:ला प्रश्न विचारत असावा नव्हे, विचारायला हवा की तो का लिहितो ? कारण लेखन कृती ही जशी एक व्यवहारात्मक कृती असते. तशी ती एक जबाबदार नैतिक निवड पण असते. लेखकाला ज्याप्रमाणे काही सांगायच असतं, त्याचप्रमाणे त्याला काही तरी बदलाच्या, परिवर्तनाच्या अपेक्षेने, तळमळीने घडत असतांना दिसते. म्हणून त्या त्यांच्या हा लेखनाप्रती पुरेशा गंभीर आहेत असं मी म्हणतो. तृप्ती स्वत: एक शिक्षिका आहेत आणि त्या हाडाच्या शिक्षिका आहेत याचा प्रत्यय त्यांच्या लेखनात जागोजागी येतो. कारण उगवत्या पिढीला जीवन शिक्षण देतो तो खरा शिक्षक असतो आणि मला वाटत त्या हे पवित्र कार्य अतिशय चांगल्या प्रकारे करतात. एक शिक्षिका म्हणून आणि एक लेखिका म्हणून विद्यार्थ्यांमध्ये आणि आपल्या सहकार्यामध्ये प्रिय असणार तृप्ती नवारे या लेखिकेने दोन लेख लिहिले आहे. पु.ल. देशपांडे यांच्या जन्मशताब्दी वर्षा निमित्तचा लेख माझी न राहिले मी, असे लेख त्यांनी लिहिले आहे. माझी आवडती लेखिका तृप्ती नवारे.

(संकलित लेख)

****

# माझा महाराष्ट्र

कु. रुपीका अ. केचे, बी.ए. भाग ३

'मी मराठी ! माझा महाराष्ट्र !' ही माझी प्रिय व अभिमानाची स्थाने आहेत आणि त्यामुळे मी कुठेही असलो तरी माझ्या महाराष्ट्राला मी विसरु शकत नाही. हीच प्रत्येक मराठी माणसाची स्थिती असते. म्हणूनच आज जगाच्या पाठीवर विविध ठिकाणी अगदी अमेरिका आस्ट्रेलियातही मराठी मंडळींची संमेलने साजरी होतात. मला खात्री आहे की, जेव्हा केव्हा चंद्रावर आणि मंगळावर माणसे वस्ती करु लागतील तेव्हा तेथे ही मराठी माणसे आपली संमेलने साजरी करतील.

माझा महाराष्ट्र भारताच्या मध्यभागी आहे. भारतातील इतर काही राज्य महाराष्ट्रापेक्षा आकाराने मोठी आहेत. पण महाराष्ट्र मोठा महान ठरला तो त्याच्या गुणामुळेच महाराष्ट्राला प्रत्येक बाबतीत परंपरा आहे. महाराष्ट्राला 'दगडांचा देश, कणखर देश' असे गौरवतात. भारतातील इतर राज्यांइतकी सुपीक जमीन लाभली नसली तरी येथिल कष्टाळु शेतकऱ्यांशी मराठी माणसाला अन्न कधीही कमी पडू दिले नाही. सतत कष्ट करीत राहणाऱ्या या मराठी माणसांच्या गरजाही फार मर्यादीत आहेत. त्यामुळे मिळेल ती चटणी – भाकरी खाऊन ही खुश राहाणारा हा मराठी माणुस अतिथीला आपल्यातील भाकरी मोडुन देतो. त्यामुळे महाराष्ट्रात चारी बाजुंनी इतर राज्यांतील माणसे आली ती महाराष्ट्राचीच झाली. आता महाराष्ट्रात राहणारा आणि मराठी बोलणारा प्रत्येकपण 'महाराष्ट्रीय' मानल्या जातो. म्हणून तर महाराष्ट्राची राजधानी मुंबई ही आज संपुर्ण भारताचे प्रतिक झाली आहे.

महाराष्ट्रात गंगा, ब्रम्हपुत्रेसारख्या प्रचंड नद्या नसल्या तरी गोदा, भीमा, कृष्णा, कोयना आणि इतर अनेक नद्यांनी महाराष्ट्र भुमी सदैव सुफलीत केली. महाराष्ट्राला कोणतीही गोष्ट अगदी सहजगत्या प्राप्त झालेली नाही. १ मे १९६० ला महाराष्ट्र राज्य स्थापन झाले, पण त्यासाठी महाराष्ट्राला फार मोठा लढा द्यावा लागला. त्यानंतर कोयने च्या व लातुरच्या भुकंपांनी महाराष्ट्राला मोठे हादरे दिले. पण अशा सर्व संकटाला महाराष्ट्राने खंबिरपणे तोंड दिले. प्रत्येक संकाटावर मात करीत महाराष्ट्र अधिकाअधिक पुढे गेला.

महाराष्ट्र ही रत्नांची खाण आहे. श्री शिवरायांनी 'स्वराज्याची' कल्पना याचा महाराष्ट्रात रुजवली. पराक्रमात महाराष्ट्र केव्हाही मागे पडला नाही. भारतीय स्वातंत्र्याच्या लढ्यात लोकमान्य टिळक, स्वातंत्र्यवीर सावकर अशा महाराष्ट्रातील अनेक नेत्यांनी आपली कामगिरी पार पाडली. सामाजिक क्षेत्रात तर महाराष्ट्रात महात्मा फुले, महर्षी कर्वे, डॉ. आंबेडकर यांनी एवढी महान कामगिरी पार पाडली. सामाजिक क्षेत्रात तर महाराष्ट्राला महात्मा फुले, महर्षी कर्वे संताची व साहित्यिकांची फार मोठी परंपरा लाभली आहे. कला व इतर क्षेत्रांतही महाराष्ट्र आपली कामगिरी बजावत राहिला. अजिंठा, वेरुळची लेणी आजही सर्वांचे लक्ष वेधुन घेतात. एकविसाव्या शतकात आज 'सॉफ्टवेअर' च्या क्षेत्रात मराठी युवक अग्रेसर आहेत.

महाराष्ट्राने आपले नाव सदैव सार्थ ठरवले आहे आणि त्यामुळे जगाच्या पाठीवर कुठेही मराठी माणुस असेल तरी तो अभिमानाने मराठी मातीच्या टिळा लावतो आणि अभिमानाने म्हणतो.

'बहु असोत सुंदर संपन्न की महान
प्रिय अमुचा एक महाराष्ट्र देश हा'

****

# जीवनात नाती

जीवनात नाती तशी अनेकच असतात
पण ती जपणारी लोक फाच कमीच असतात।
काही नाती असतात रक्ताची, तर काही ह्रदयाची ।
काही नाती असतात जन्मो–जन्मीची, तर काही काही क्षणापुरताची ।
काही नाती बसतात केसासारखी न तुटणारी
पण वेळ आलीच तर वाकणारी।
काही नाती असतात लांबुनच आपले म्हणणारी
जवळ गेल्यावर मात्र दुर करणारी।
काही नाती असतात पैसाने विकत घेता येणारी
तर काही प्रेमाने आपलेसे करणारी।
काही नाती असतात न जोडता सुध्दा ऐकणारी
तर काही जोडून सुध्दा तुटणारी ।।

– कु. वैभवी ऊ. होले, बी.ए. भाग २

# मराठी भाषेची कैफियत

कु. साक्षी ज्ञा. गायकवाड, बी.ए. भाग १

मी मराठी भाषा, तुमची मातृभाषा म्हणजे आईच. तरीही तुम्हाला 'प्रेमपूर्वक आशीर्वाद' म्हणू की तुम्हाला आता परकेच आहात म्हणू, 'स.न.वि.वि. असे त्रयस्थासारखे म्हणू ? की घारतल्या म्हाताऱ्या माणसाला अडगळीच्या खोलीत ढकलून द्यावे तसेच तुम्ही मला केले आहे. म्हणून तुम्हाला कोपरापासूनच दोन्ही हात जोडून नमस्कार करु? काय करु हो ? मला काही कळेनासे झाले आहे. मन उदविग्न झाले हो निराशेने ग्रासलेले आहे त्या दिवसाच्या घटनेने तर दु:खाचा कडेलोट झाला. संतापाचा स्फोट झाला. कारण एका शाळेत मराठी बोलल्याबद्दल शिक्षकांनी मुलांना छडीने मारले. एक–दोन नव्हे, तर तब्बल अठ्ठाविस मुलानां मारले ! अंगावर वळ उठेपर्यत ! ही एखादी कल्पित किंवा खूप प्राचीन काळातील घटना नव्हे, ही घटना आहे, अगदी कालपरवाची. बुधवार, दिनांक ९ जुलै २०१४ रोजीची पुणे या विद्येच्या माहेरघरातली! अरे, काय चाललेय हे ? काय करताय ? कुठे चालला आहात? याचे काय परिणाम होणार आहेत आणि पुढे काय भोगावे लागणार आहे, हे ठाऊक आहे का तुम्हाला? तुमचे माझ्यावरचे प्रेम कमी कमी होत चालले आहे इतकेच नव्हे, तर तुम्हाला आता माझी लाज वाटू लागली आहे. शाळेतल्या मुलाला जशी स्वत:च्या अशिक्षित आईला शाळेत न्यायला लाज वाटते. तशी तुम्हांला माझी लाज वाटते. तुम्हांला इग्रजीत बोलता येणे गौरवास्पद वाटते. माठीत बोलणे मागासलेपणाचे वाटते. दरवाजावर नावाची पाटी लावायची झाली: तरी तुम्ही ती इंग्रजीतच लावता. सहीसुदूधा इंग्रजीत करतात.

